


म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय
दा. क्र. १५९६
BVBK-0401596

वाचनालय
बा.वा.
१५१६
३।५।८४



# फास्टर फेणेची काश्मिरी करामत

भा. रा. भागवत

बा. क्र. १५१६ ३।५।८४
विभाग बा.वा.
BVBK-0401596

उत्कर्ष प्रकाशन
पुणे ४.

प्रकाशक :
सौ. सविता जोशी
उत्कर्ष प्रकाशन,
रेणुका अपार्टमेन्ट
डेक्कन जिमखाना
पुणे ४

किंमत १५ रुपये

© भा. रा. भागवत

प्रथमावृत्ती : १९८२

मुद्रक :
रवि बेहेरे
रविराज प्रिंटरी,
६३४ बुधवार पेठ,
पुणे २

काश्मीरची सफर
करून आलेल्या
चिनूस

| | |
|---|---|
| बन्या नारळ फोडतो | १ |
| ' मैने ' चे रहस्य | २२ |
| मालीवर संकट | ३६ |
| फसलेला पाठलाग | ५१ |
| पत्ता लागला | ७४ |
| पिस्तुलावर मात | ८७ |
| आता मात्र खराच साप भेटला | ९५ |
| फास्टर फेणेचा आपटबार | ११२ |
| अन्वरचा अनावर विक्रम | १२६ |
| शेवट गोड... क्रीम केक | १४७ |

१५२६ - ३१५८४

# १. बन्या नारळ फोडतो !

"ब-ब-ब-ब-बन्या, ऊठ ! तुझी खिड आली !"

मालीने दिलेल्या कोपरखळीने बनेश ऊर्फ फास्टर फेणे खडबडून जागा झाला.

" माले, कशाला ग एवढ्या काळोख्या रात्री उठवलंस मला ? " तो कुरकुरला.

" काळोखी रात्र ? " माली म्हणाली. " डोळे उघड. बाहेर चांगलं उजाडलंय बघ."

बन्याने डोळे चोळीत पाहिले. बाहेर बर्फाच्छादित डोंगरांच्या कडा चमचम करीत होत्या खऱ्या. पूर्व क्षितिजाला गुलाबी छटा चढलेली होती. फिकीच, पण बर्फाला चकाकी द्यायला ती पुरेशी होती.

बन्या आता चांगलाच जागा झाला होता. तो म्हणाला, " माझी खिड काय म्हणालीस ? "

" तुझीच ! " मालीने हसून उत्तर दिले. " बन्याल खिडीत आलोत आपण. "

" वा रे ज्योक ! " बन्या पुटपुटला, " आणि खरं नाव मुळी बनिहाल आहे. "

माली हसली. बन्याचीच खिड, कारण फास्टर फेणे ती गाजवणार आहे असे वेडेवाकडे भाकीत तर त्या पोरीला

जाणवले नव्हते ? किडकिडीत पण तुडतुडीत फास्टर फेणेची ओळख तुम्हाला नव्याने करून द्यायला नकोच. ही माली म्हणजे फास्टर फेणेची मामेबहीण. पुण्यात कसवा पेठेत राहणारे बन्याचे एक गुलहौशी मामा तुम्हाला ऐकून माहीत आहेत; त्यांची मुलगी मामा-मामींनी ही काश्मीर ट्रिप काढली तेव्हा बन्यालाही त्यांनी बरोबर घेतले होते पण एका अटीवर " तिथं नॉर्मल मुलासारखं वागायचं. रणगाडे, चिनी हेर अन् पॅराशूटच्या गोष्टी करायच्या नाहीत."

आणि माली म्हणाली होती, "बाबा, युद्ध केव्हाच संपलं. आता रणगाडा नि पॅराशूटच्या गोष्टी कशाला हव्यात ? "

गंमत अशी की युद्ध संपले तरी हेरगिरी संपत नसते; त्याला बन्या काय करणार ? आणि रणगाडे, पॅराशूट म्हणाल तर त्यातल्या फिफ्टी पर्सेंट गोष्टी टळणार नाहीत असा जर विधिसंकेतच असेल तर त्याला तरी बन्या काय करणार ? बन्याचा तुम्ही हात धराल एक वेळ – नाही, दहा वेळ– पण ब्रह्मदेवाचा हात कुणी धरला आहे ?

म्हणून मामाच्या अटीवर फास्टर फेणेने नुसते ओठ उघडून 'ट्रॉक्' केले. तो काहीच बोलला नाही, तेव्हा मौनं संमतिलक्षणम् म्हणून मामांना त्याचा तो होकार मानणे भाग पडले होते. शिवाय मालीनेही आपल्याकडून एक अट घातली होती. ती म्हणजे 'बन्या इज ए मस्ट.' तिच्या मते बन्या नाही तर ती ट्रिप कसली ?

मामा त्यावर गंभीर तोंडाने म्हणाले होते, " खरं आहे तुझं म्हणणं. हा बन्या प्रत्येक ट्रिप सार्थ करतो यात शंका

नाही. तुला ‘ टु ट्रिप ’ या क्रियापदाचा अर्थ माहीत आहे माले ? ”

“ नाही. ”

“ कशाला तरी अडखळून पडणं. ” मामा गालांतल्या गालांत हसून म्हणाले. “ हा पोरगा बरोबर असला की आपण कुठेतरी ठेचा खाल्ल्याशिवाय राहणार नाही असं मला नक्की वाटतं ! ” मग जरा थांबून ते पुढे म्हणाले होते, “ ठीक आहे–बन्याला घेऊ आपण बरोबर. कारण मेजवानीत काय किंवा सफरीत काय, ठेचा खाणं ईज ए मस्ट. त्याशिवाय मजा नाही !–क्यौ ? ”

आणि मामासाहेबांच्या ढिसाळ ज्योकवर मामींनी नाक मुरडले असले तरी माली मनमुराद हसली होती.

एवंच, बन्या ऊर्फ फास्टर फेणे सहलीत सामील झाला होता.

पठाणकोटहून काल सकाळी निघालेली बस संबंध दिवस अन् अर्धी रात्र प्रवास करून, कितीतरी नद्या नि दऱ्या ओलांडून पाच-सात हजार फूट उंचीच्या पर्वतराजीत शिरली आणि मग चढ-उतार करीत ठेचकाळत श्रीनगरच्या वाटेला लागली. पोटात घेतलेल्या उतारूंची ती अक्षरशः हाडे घुसळीत होती. बन्यासारखे काही सुखी जीव सोडले तर अद्यापि कुणाचा डोळ्याला डोळा लागला नव्हता. मध्येच ही बया गिअर बदलून चिकार फरफराट करी आणि मागच्या नळीतून जेट विमानासारखा धूर सोडीत सहा हजार फूट उंच चढे, तेव्हा आतले प्रवासी ओठ दाबून जीव मुठीत धरून बसत. मध्येच ती शेकडो फूट खाली घसरणीला लागली की पोटात

उठलेला गोळा कुणीतरी फसकन् काढला अन् पोकळी निर्माण केली आहे असा त्यांना भास होई. पठाणकोटहून निघताना दूर दिसणारे डोंगर किती साजरे होते ! अन् आता तेच किती उग्र बनले आहेत असे वाटे. त्या डोंगरांचे केव्हाच पहाड अन् पहाडांचे पर्वत बनले होते. डावीकडे पांढऱ्या-शुभ्र बर्फाने न्हालेल्या त्यांच्या रांगा मध्येच हिरवळीची ओढणी घेऊन खड्या होत्या, तर उजवीकडे... छे ! तिकडे बघण्याचीच सोय नव्हती. कारण हजारो फूट खोलीची दरी तिथे तुमचा घास घेण्यासाठी आ वासून बसली होती, आकाशातून भुरूभुरू हिमवृष्टी चालूच होती. दिवस हिवाळ्याचे, आणि इथे डोंगरघाटाततर थंडी कडाक्याची होती. सारे उतारू गुरगुटून जागत बसले होते.

बस पहाडाच्या कडेकडेने जात होती. वाट भलती अरुंद नि धोक्याची होती. ड्रायव्हरचे सर्व कसब इथे पणाला लागत होते. खरे म्हणजे या भयंकर घाटातून मोटारींना रात्री जाण्याची परवानगीच नसे. जम्मूला किंवा खुदला त्यांना मुक्कामच करावा लागे. आणि तरी या ड्रायव्हरबुवांनी हे जवरे धाडस करून रात्रीच गाडी कशी दामटली हे एक कोडेच होते कदाचित् श्रीनगर गाठण्याची त्यालाच घाई असेल किंवा कदाचित् दुसऱ्या कुणाला घाई असेल आणि त्याने याला मिंधे केले असेल.

बन्याने स्वेटरची कॉलर चिमटीत घट्ट दाबून धरली अन् मफलरमध्ये लपेटलेलें डोके हलकेच खिडकीबाहेर काढले.

"फुश्श !" तो मान एकदम आत ओढीत म्हणाला, "बर्फ पडतच आहे की."

"मग काय तर? ते चांदण्यात चमकणारे ठिपके म्हणजे हिमपुंजकेच आहेत."

"बायनॉक्युलर काय झाला?" बन्याने वापल्या वाळकुडया हाताने बाकावर चाचपल्यासारखे केले. शेजारच्या गिड्ड्या दणकट इसमाला तो गुरगुरत म्हणाला, "अहो, जरा सरकून बसा."

पण तो माणूस ढिम्म. जागचा हलला नाही. त्यामुळे बन्याचे त्याच्याबद्दलचे मत आणखीनच वाईट झाले. का कुणास ठाऊक, हा माणूस बन्याला पहिल्यापासूनच आवडला नव्हता. शेवटी बरेच चाचपल्यावर मामांची दुर्बीण बन्याला त्या गृहस्थाच्या मांडीखालीच मिळाली. ती चटकन् उचलून त्याने डोळ्याना लावली आणि तो खिडकीबाहेर पाहू लागला

माली म्हणाली, " रात्रीचं काय दिसणार तुला त्यातून? तो माणूसही मघाशी दुर्बिणीतून पाहात होता. मला वाटलं, तुला त्याने ती परत दिली असणार!"

बराच वेळ बन्या ती हिमपुंजांची बरसात दुर्बिणीतून पाहात होता.

मालीदेखील चुपचापपणे फिक्या चांदण्यातली ही भुरभुर बघत राहिली.

मध्येच बन्याने डोळे वटारले होते. तो उद्गारला, "माले! तो पांढरा पुंज फार मोठा होता!"

"मग?"

"त्याचा आकारही निराळा होता. ते बर्फ नव्हतं. मी दुर्बिणीतून पाहिलं तरी मला स्पष्ट दिसलं असं नाही.

तरी पण मला वाटतं  तो आकार कसा वाटला सांगू ?"

"कसा ?"

"पॅराशूटसारखा."

"चल– काहीतरीच !"

"बन्या–बन्या–" इतका वेळ पेंगत असलेल्या मामांनाही तो शब्द तेवढा नेमका टिपला. चिंतेचा सूर काढीत ते म्हणाले, "तू काय कबूल केलं होतंस ?"

"तुम्ही लक्ष देऊ नका हो त्याच्याकडे !" मामी म्हणाल्या. 'तो स्वप्नात आहे."

' पण बन्याला घेरणारा संशय जाईना. त्याने पुन्हा खिडकीतून डोके काढले. पण हिमबिंदूंचा काजव्यासारखा गजबजाट त्याला घेरायला आला. तो पुंज काही परत दिसला नाही. त्याने मुकाट्याने मान आत घेतली. मग भुवया आक्रसून तो कितीतरी वेळ आपल्याशीच विचार करीत बसला होता. तशाच स्थितीत त्याला केव्हा झोप लागली; आणि दुर्बीण हातातून केव्हा पडली ते त्याला कळलेदेखील नाही.

–आणि आता बनिहाल खिंड आली म्हणून मालीने त्याला जागे केलें तेव्हा तो खडबडून उठला होता. बनिहाल खिंड समुद्रसपाटीपासून एक हजार फूट उंचीवर आहे म्हणजे बस आता पुष्कळच खाली आली होती. गचके बसणे कमी झाले होते. जागे झालेले उतारू पुढच्या स्टॉपची वाट पाहात होते. आता पुढचा स्टॉप म्हणजे बनिहाल गाव. तिथेच त्यांना चहापाणी, आन्हिक उरकायचे होते. माली नि बन्या यांनी मात्र आधीच थर्मासमधला चहा झोकला होता.

खिंडीत हिंदकळावे लागले नाही पण ती होती बोळकंडीच

दोन्ही बाजूंस पहाडाच्या भिंती उभ्या होत्या, त्यामुळे कोंड-ल्यासारखे वाटत होते. शेवटी खिंड संपली आणि बसला सपाट पठारावरून संथपणे वाटचाल करण्याची संधी मिळाली. हवा अजूनही थंड होती, पण तिच्यातला झोंबरेपणा संपला होता. हळूहळू सूर्य वर आला आणि त्याच्या कोवळ्या उन्हात मनाला प्रसन्न वाटू लागले. दोन्ही बाजूंच्या गवता-वरून पांढऱ्या उंच टोप्या घातलेले अन् पायघोळ कफनीवाले गोरेपान धनगर आपली मेंढरे हाकीत चाललेले दिसू लागले. अंगाभोवती एखादा बुरणूस गुंडाळून ते आस्ते आस्ते जात होते. मोटर दिसली की गवताच्या काड्या चावीत नुसते बघत कितीतरी वेळ उभे राहात. काश्मिरी सुंदरी रंगीबेरंगी झब्बे घालून पाणी भरायला जाताना दिसत. त्यांच्या कानां-तली लोंबणारी कर्णफुले डुगूडुगू हलत. ती चांदीची असतील की कथलाची ? आणि कपडे रंगीत असले तरी त्या सुंदर लोकांना शोभण्याइतके भारी थोडेच असत ? हलके, जाडे-भरडे, इतकेच नाहीतर मळकट कपडेच फार.

माली म्हणाली, "सौंदर्य नि दारिद्र्य यांचं असं मिश्रण जगात कुठं सापडेल का रे बन्या ?"

बन्या काही उत्तर देणार इतक्यात खाडकन् आवाज करून बसबाई उभ्या राहिल्या.

आला बनिहाल गाव. लोक भरभर खाली उतरले. या ठिकाणी अर्धा तास बस थांबणार होती. पलीकडे पन्नासएक एक फुटांवर एक बैठे खोपटे होते. छप्पर पत्र्याचे, पण सध्या बर्फाने शाकारलेले बाहेर एक शब्दी पाटी लटकत होती : Hotel. आत एक कायम पेटलेल्या शेगडीवर गरमागरम

चहा उकळत होता, जवळच एका तिवईवर गरमागरम भज्यांसारख्या तेलकट पदार्थांनी भरलेल्या थाळ्या होत्या, मिठाई होती.

हिमलाहद्यांचा चटकदार मजेशीर मारा झेलीत मंडळी त्या हॉटेलकडे धावली. मामा-मामी पण तिकडेच गेली. बन्या नि माली मात्र पिशवीतल्या चिवड्याचे बकाणे भरीत तिथेच उभी राहिली.

दोघांनीही एकदा सारा आसमंत नजरेने टिपून घेतला. डावीकडे खालच्या दरीतून पठार चढून आलेली सडक होती. सडकेला लागून उजवीकडे बराच मोठा उतार होता. त्या पठारावर मुले चेंडू खेळत होती. त्यापुढे भीषण कडा असून त्या कड्याखाली पाचशे फूट खोलीची प्रचंड दरी होती.

दरीच्या पलीकडून फर्लांगभर अंतरावर एक ओढा वाहात होता. आणि त्या ओढ्याच्या सांडव्याखाली लष्करी गाड्यांचा एक काफिला अलीकडे येत होता, त्यात जीप गाड्या, मालट्रक अन् चिलखती गाड्या होत्या आत जवान भरलेले होते. काही बंदूकधारी जवान पायी चालत होते, ती लष्करी हालचाल पाहून फास्टर फेणेच्या हृदयात जुन्या स्मृती कालवू लागल्या.

डावीकडें उताराखालून ती सडक अलीकडे येऊन पठार चढली होती. या ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा झाडी होती. पॉपलर वृक्षांच्या मोठ्यामोठ्या राया होत्या.

"ट्रॉक् !"

"काय रे बन्या ?" माली बन्याची बाही पकडून म्हणाली.

"ते पाहचलंस ?"

" पाहचलं. " माली म्हणाली, " साधा चेंडू नाही तो बर्फाचा बॉल आहे अशा चेंडूची आबाधुबी खेळायला मजा येत असेल, नाही ? "

लालबुंद गालाची गोरीपान मुले बर्फाचे गोळे एकमेकांवर फेकीत होती. काहींचे गोळे रव्याच्या फुसक्या लाडवासारखे मध्येच फुटत अन् भुसकन् खाली पडत, तर काहींचे बरोबर नेम साधून कुणाच्या तरी पाठीवर आपटत अन् सभोवताल्न भुसनळ्यासारखे हसू फुटे. मध्येच कुणीतरी " हाः-हूः " करून श्वास ओढून घेई अन् थंडीने लाल झालेले आपले नकुटे चोळी.

" चल की माले. आपणही खेळू या. आतापर्यंत हा स्नो-बॉलचा खेळ आपण फक्त इंग्रजी गोष्टीतून पाहचलाय."

बन्या टणटण उड्या मारीत उतरणीवर गेला. त्याने पसाभर भुरभुरीत हिम गोळा केले, त्याचा लाडू बनवला आणि तो मालीच्या अंगावर भिरकावला. पण माली चटकन् बाजूला झाली अन् लाडवाचे भुसकट बनले.

बन्या खो खो करीत हसतो आहे तोच त्याच्या नाकाडावर एक गोळा येऊन आपटला आणि " हाय.हुय " करीत त्याने बाजूला उडी मारली.

एक वस्ताद मुलगा " कशी जिरवली ? " अशा अर्थाने बन्याकडे पाहुन हसत होता. दुसरी मुलेही त्या खसखशीत मिसळून गेली.

बन्याही खूप मोठ्याने हसला आणि म्हणाला, " असं आहे होय ? थांब, मी तुला दाखवतो ! "

आणि त्यानेही लाडवाची एक गोळी वळून फेकली. तिने

मघाच्या मारेकरी मुलाची लोकरीची टोपी पुटदिशी उड-वून दिली; ती दुसऱ्या मुलाच्या डोक्यावर जाऊन बसली.

"वेल प्लेस्ड !" माली ओरडली.

"तुला याची टोपी त्याला घालणं इतकं छान जमेलसं वाटलं नव्हतं, बन्या ! तुम बच्चे लोग हमेशा ऐसा खेल खेलते हो ?"

"जी." एक छोटी मुलगी ओंजळभर हिम घेऊन आपल्या तोंडाला पावडरीसारखे चोळीत म्हणाली. "कभी कभी वडे लोग भी खेलते हैं हमारे साथ."

फास्टर फेणेने पाहिले तर गिड्डा दणकट उतारू या पोरांच्या खेळात सामील झाला होता. पाच सहा वेळा त्यांच्याशी चेंडूफेक करून झाल्यावर त्याने जरा बाजूला जाऊन एक भला मोठा लाडू वळायला घेतला; आणि तो वळून झाल्यावर पठाराच्या काठाला जाऊन त्याने खालच्या दरीत डोकावून पाहिले. मग एकदम त्याने नारळएवढा वर्फ-गोळा खाली सोडून दिला. पाचपे फूट खाली जाऊन पडताच त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या.

"यानेच मघाशी आपली दुर्बीण तुला न विचारता घेतली होतीन्—तू झोपला होतास तेव्हा." माली हळूच म्हणाली.

बन्यानं 'हूं' केले. मग त्याने दुर्बीण डोळ्यांना लावली आणि दरीतल्या बर्फाच्या त्या ठिकऱ्यांवर दृष्टी केंद्रित केली मग ती आजूबाजूला फिरवली.

"बन्या, पलीकडचा तो मिलिटरचा काफला किती स्लो येतोयसारखं वाटतं, नाही ? खरा म्हणजे फास्ट येत अस-

णार. दुर्बिणीतून दिसतेय का रे त्याची स्पीड वाढलेली ?"

फास्टर फेणेने तिला उत्तर दिले नाही. लष्करी गाड्यांवर रोखलेली दुर्बीण हळूहळू अलीकडे ओढल्यावर त्याने ती जवळजवळ नव्वद अंशाच्या कोनात स्थिर केली. थेट खाली दरीत उभा असलेला सैनिक पोशाखातला माणूस आता दुर्बिणीच्या भिंगापुढे आला.

" सगळे सैनिक तिकडे कूच करताहेत आणि हा एकटाच इकडे काय करतो आहे ?"

" काचकूच " मालीने विनोद केला. " हजारातला एखादा माणूस तसा असतोच काचकूच करणारा—ड्यूटी टाळणारा. ...पण काय हे ? किती वेळ यांचं चहापान चालणार आहे ? बन्या, मी आले हं पाहून."

फास्टर फेणेने तिचे बोलणे ऐकले नाही. तो त्या खालच्या माणसाची हालचाल टिपण्यात दंग झाला होता.

" हा नुसताच लष्करी ड्यूटी टाळणारा नाही—" बन्या पुटपुटला. " हा दुसऱ्याच कुणाची तरी ड्यूटी बजावणारा असावा. याच्या रागरंगावरून यह भला आदमी नहीं मालूम पडता."

फास्टर फेणेला शंका यायला तसेच जबरदस्त कारण घडले होते. त्याच्या हातातल्या दुर्बिणीने त्याला माहिती दिली होती की, सैन्यातून आडवाटेला आलेला हा माणूस त्या गिड्ड्या उतारूने फेकलेल्या बर्फ-गोळ्याच्या दिशेला आला. लाडू फुटून त्याचे तुकडे होताच त्याच्या भिरभिरत्या नजरेने ते पाहिले आणि मग खाली वाकून त्याने त्यांतला एक तुकडा उचलला.

बर्फाचा तुकडा ? तो कशाला उचलायचा ? दुर्बिणीची चाती फिरवीत बन्याने दृश्य जास्त ठळक केले.

वेट ! तो बर्फाचा तुकडा नाही. नाहीतर हातात वितळला असता. हा वितळत नाही, हातावर चांगला पसरतो आहे– उलगडतो आहे–कागदासारखा. कागदच आहे तो.

" माले, तो चिठी वाचतो आहे."

मालीला ते शब्द ऐकू गेले नाहीत. कारण ती केव्हाच खोपटाकडे पळाली होती. खालचा तो सैनिक तो चिठ्ठी उचलून भराभर वाचीत होता. मग त्याने वर हात करून " समजलं " अशा अर्थी खूण केली आणि खाली डोंगर-कड्याला लागून असलेल्या झाडीत तो गुल झाला. फास्टर फेणेने दुर्बीण फिरवून पाहण्याचा खूप प्रयत्न केला; पण कुठच्याही वाटेने तो माणूस पुन्हा आपल्या लष्करी मित्रांना मिळालेला त्याला दिसला नाही.

" कारण त्याची वाट दुसरीच असावी आणि त्याचे खरे मित्रही दुसरेच असावेत. " बन्या पुन्हा पुटपुटला. आणि तो दुर्बिणीचा हात खाली करतो आहे, तोच त्याच्या दृष्टीला अवघ्या चार फुटांवर दोन पठाणी चढाव दिसले. आत पाय असलेले चढाव. त्याने चटकन् वर पाहिले. गिड्डा दणकट उतारू त्याच्याकडे रोखून पाहात होता. त्याचे वरचे दात खालच्या ओठांवर रोवले गेले होते.

" संदेशा भेजने का और तरीका है तुम्हारा ! " बन्याने काहीतरी बोलायचे म्हणून म्हटले.

" जी ?" तो एक पाऊल पुढे टाकीत म्हणाला, " इधर दे दो वह दुर्बीण. "

" क्यों ? "

" दे दो बोलता न ?" तो गुरकावला आणि बऱ्याच्या हाताखाली दुर्बीण त्याने जवळजवळ हिसकावूनच घेतली. दुर्बिणीच्या मधल्या चातीवरून त्याची बोटे सरसर फिरली: शक्य तेवढ्या त्वरेने त्याने फोकस बदलून टाकला होता.

" जिसमें अपना कोई संबंध नही उसका जिक्र करना बुरी बात है ?"

" दुर्बीण दे दो ! " बऱ्या लालबुंद होत म्हणाला. "इतना घुस्सा क्यों करते हो ?" आणि पुढचे वाक्य तो ओठांतल्या ओठांत बोलला, " मुझे तो यह गद्दारी का मामला मालूम होता है."

" बेवकूफ ! " एकाएकी संतप्त झालेल्या त्या माणसाने हात उगारल्यासारखा केला; पण दुसऱ्याच क्षणी आपण हे काय करतो आहो असे वाटून त्याने स्वत:ला सावरले. एक कृत्रिम हास्य करून, एकदम खाली उतरवलेल्या आवाजात तो म्हणाला, " तुम्ही लडके लोक भलभलत्या आयडीया दिलमध्ये आणीत असता. मेरा भाई है वह. वहाँ नीचे मेरा मकान है. बसका टाईम थोडा है इसलिए मैंने उसको चिठ्ठी भेजी. इसमें क्या हो गया ? "

या त्याच्या सबंध सावरासावरीला बऱ्याने मागे मागे सरत एकच उत्तर दिले, " दुर्बीण दे दो. "

–आणि मग एक गिरकी खाऊन फास्टर फेणे पळत सुटला. कारण त्याच्या शंकेची आता खात्री बनली होती. चहाच्या खोपटातली आपली मामा-मामी नि मामेबहीण यांची त्याच्या मनातून केव्हाच उचलबांगडी झाली होती.

एकाच विचाराने त्याला आता घेरले होते. तो विचार म्हणजे हा गिड्डा दणकट माणूस अगदी निश्चितपणे कुणीतरी हेर आहे आणि तो खालच्या दरीतला माणूस–त्याचा पोशाख जवानाचा असला तरी–नक्की कुणीतरी गद्दार आहे. गद्दार म्हणजे फितूर–शत्रूला सामील असलेला माणूस.

पण–पण गद्दारी–फितुरी... आत्ता कशाला ती ? एवढ्या गडबडघाईने ? आता काही लढाई चाललेली नाही.

अं-- हे काश्मीर आहे. भारताचा सीमा प्रदेश आहे हा. इथे सदाच लढाईचं वातावरण असतं. नेहमीच इथं बंदोवस्त असतो. नाही तर तो लष्करी काफिला कशासाठी इथून चाललाय ? ...पाकिस्तानी हेर इथे नेहमीच झुरळासारखे वावरत असतात. भारताशी दुष्मनी करणं एवढं एकच ध्येय पाकिस्तान डोळ्यांपुढं ठेवून आहे तोवर या सीमाभागातून नेहमीच झाडू मारावा लागतो...झुरळं झटकणारा झाडू ! आणि तो दरीतला माणूस तर ए ग्रेड झुरळ आहे, आणि हा बसमधून आपल्याबरोबर आलेला दणकट गिड्डा म्हणजे नंबर वनचा टोळ आहे-- नाकतोडा ! याला ठेचलाच पाहिजे ! ...बन्याला एकदम आठवले...यापूर्वीच्या दोन स्टेशनांवर गिड्ड्याने अशीच मखलाशी केली होती. जम्मूला त्याने कुणाला तरी सरळ पत्रच खरडून दिले होते आणि खुलला तो खुद्दच धावत गावात जाऊन परत आला होता .. गावोगाव कसल्या तरी बातम्या पोचवणारा खबऱ्या तर नसेल हा ? तंगड्या जबरदस्त बरं का याच्या ! पोस्टाचा रनर म्हणून याला तेव्हाच नोकरी मिळेल ! ... पण नको ! ही पीडा पाकिस्तानी असावी. हिंदुस्थानात याला नोकरी

देणं म्हणजे अस्तनीत निखारा बाळगणं होईल.

अणूच्या अंतर्भागात इलेक्ट्रॉन ज्या वेगाने भिरभिरत असतात तशाच वेगाने हे विचार बन्याच्या मस्तकात फिरत होते. त्या विचारांनीच त्याला गिरकी खाऊन डावीकडे धावायला लावले होते. लष्करी काफिल्याच्या मोटारी त्याच बाजूने पठार चढून वर येत होत्या. आणि फास्टर फेणेने विद्युद्वेगाने ठरवले होते की आपणही हेर बनायचे आणि ही बातमी तातडीने फौजी अधिकाऱ्यांना पोचती करायची.

पण कांगारूसारख्या तीन-चार ताडताड उड्या तो मारतो आहे इतक्यात त्याच्या पाठीत काहीतरी आपटले. क्षणभर त्याच्या मणक्यांतून जबरदस्त सणक निघाली अन् डोळ्यांपुढे काजवे चमकले.

" आई ग ! " फास्टर फेणे किंचाळला आणि अर्धा क्षण थांबून त्यानं दोन्ही हात कंबरेवर ठेवून कळवळल्यासारखे केले. मग लगेच त्या वेदना विसरून त्याने पुन्हा कांगारूचा अवतार धारण केला आणि मग एक पळभरही न थांबता " गद्दार – गद्दार ! " अशा गर्जना करीत त्याने सरळ लष्करी काफिला गाठला.

त्याची ती तुफान दौड अन् आरडाओरडा यांचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही. सबंध लष्करी कारवान ब्रेक दाबल्यासारखा उभा राहिला. अग्रभागीं चालणाऱ्या जीप-मधून पाच-सहा जणांचा एक गट सराईतपणे खाली उतरला आणि फास्टर फेणेची 'अ‍ॅलर्ट' मध्ये वाट पाहू लागला. फास्टर फेणेची तुफान मेल तिथे येऊन थडकली अन् एंजिन-सारखी वाफा सोडू लागली.

एक जवान काही विचारणार तोच त्याच्या अधिकाऱ्याने त्याला दाबले. काही क्षण त्याने बन्याला दम खाऊ दिला मग विचारले, " बोलो– क्या बात है ? "

" वह–ह–ह आदमी हेर है-- जासूस !" बन्या भराभर सांगू लागला, " त्याला पकडा तुम्ही. खाली त्याचा साथीदार उभा आहे--दरीत. गद्दार !"

आणि तो थांबला. त्याची दमछाक झाली होती.

अधिकाऱ्याच्या फितीवरून तो लेफ्टनंट कर्नल दिसत होता. मोठा अधिकारी. त्याने उजव्या हातातला बॅटन डाव्या हातावर आपटला. बन्याकडे त्याने रोखून पाहिले. मग त्याने सटासट हुकूम दिले–" तुम चार-पांच आदमी नीचे दौडो ! पहाडाच्या तळाशी जे जंगल आहे ते पुरतं विंचरून काढा. हा छोकरा सांगतो त्यात तथ्य असावं. आपल्या पलटणीत जहराचा थेंब असावा याची मला अलीकडे शंका आली होतीच. आणि हा ज्याच्याशी भांडत होता तो इसम कुठे गुल झाला ?"

गिड्डा दणकट माणूस खरोखरीच अकस्मात नाहीसा झाला होता. अर्थात त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला असेल तर त्यामुळे त्याच्याबद्दलचा संशय आणखीच बळावणार होता.

" ढूंढ लो उसको !"

पाच-सहा जवान पठारावर पांगले. गिड्डयाचा शोध सुरू झाला.

इतक्यात समोरून ओळखीची हाक आली-- " बन्या ! तो गिड्डा या अवघड कड्यावरून उतरला मघाशी. तो बघ

दिसतो आहे."

एक जवान कड्याजवळ पोचला होता. त्याला माला म्हणाली, "वह देखो."



जवानाने पाहिले तर एका कपारीला धरून तो गिड्डा माणूस खाली उतरत होता.

" बाप रे ! भयंकर अवघड आहे ती वाट ! पडला-बिडला तर–"

माली हे बोलते आहे आणि बन्या तिथे पोचतो आहे, तोच त्या माणसाचे हात निसटले आणि मग एखाद्या चित्र-पटातल्यासारखे भीषण दृश्य त्यांना प्रत्यक्ष पाहायला मिळाले. सपाट्याने खाली गेलेला तो देह शेवटी झाडीत पडून दिसेनासा झाला. मग त्या बर्फाच्या गोळ्याप्रमाणे त्याच्याही ठिकऱ्या उडाल्या की झाडीतच कुठेतरी तो घायाळ होऊन पडला हे त्या वेळी कळायला मार्ग नव्हता.

बन्याच्या शेजारी त्याचे मामा येऊन उभे राहिले होते. त्यांची छाती धपापली. ते मालीला एकीकडे दबलेल्या आवाजात म्हणाले,

" माले, टु ट्रिप हे क्रियापद ' कारक ' सुद्धा असू शकतं बरं का ? नुसता ' पडणं ' एवढाच अर्थ नाही त्याचा... ' पाडणं ' असाही होतो ! "

जवानाने डोळे विस्फारले.मग मागे वळून त्याने साहेबांना वर्दी दिली " गिर गया... दिखाई नहीं देता."

अधिकारी तेवढ्यात तिथे येऊन पोचला. त्याने बन्याकडे वळून म्हटले, " थँक यू सो मच. तो जगला असला तरी त्याची जागा आता तुरुंगात आहे. त्या गद्दारालाही आम्ही सोडणार नाही. थँक यू अगेन...युवर नेम ?"

" वनेश...ऑर मेक इट फास्टर फेणे !"

ते ऐकून कर्नलने डोळे तांबारले. मग तो हात पुढे करीत

म्हणाला, "ग्लॅड टु मीट यू ! तुझ्याबद्दल ऐकलंय मी... हू हॅजंट ?" आणि दिलखुलास हसून तो म्हणाला, "ईव्हन दि डेफ हॅव हर्ड ऑफ यू.. सो यू आर ॲट इट अगेन – आं ? विश यू गुड लक !"

बीस-उतारूंची एव्हाना त्यांच्याभोवती गर्दी जमली होती. सर्वांचे कुतूहल अर्थातच 'कडेलोटा'ला पोचले होते. पण तो ड्रायव्हर... खमक्या लेकाचा ! श्रीनगर केव्हा गाठतो ही एकच चिंता त्याला ग्राशीत असणार. त्याने आपला हॉर्न दाबीत 'पों--पों'चा सपाटा लावला होता.

"नो यूस वेस्टिंग युवर टाईम." कर्नलसाहेब म्हणाले, "तुम्ही जाऊ शकता आता---अँड थँक यू अगेन, फास्टर फेणे."

"नॉट ॲट ऑल ." बन्या म्हणाला, "आय डिड माय ड्यूटी, सर."

"पण तुझं वैशिष्टच हे--" कर्नलसाहेब हसत म्हणाले, "की अशी ड्यूटी बजावण्याची तुला नेहमीच संधी मिळते. ओ. के. गुड बाय ."

"गुड बाय."

उतारू-- पूर्वीचे मायनस एक-- बसमध्ये चढले आणि बस धूमधडाक्यात श्रीनगरकडे निघाली. बाहेर लागलेल्या सर्वांच्या नजरा थोड्याच वेळात आत वळल्या. कारण तो कडा, ती दरी नि तो लष्करी काफिला आता मागे पडला होता. फास्टर फेणेला मध्येच मागे पाहण्याची हुक्की आली आणि तो दुर्बीण शोधू लागला; तेव्हा मालीने त्याला हळूच सांगितले." दुर्बिणीची वाट लागली.बाबा रागावणार आता."

" म्हणजे ?"

" म्हणजे काय ? तुझ्या पाठीची हाडं तिला सोसली नाहीत. त्या बुटुक बदमाषानं तुझ्या पाठीत दुर्बीण हाणलीन् तेव्हा तिची भिंगं जाम फुटून गेली. तुझ्या माकडहाडाला कितपत लागलं मारुती जाणे ! मी मात्र गडबडीत ती फुटकी दुर्बीण उचलायला विसरून गेले."

" छान ! ऽ अग आई ग !" पाठीची आठवण होऊन मध्येच वन्या कळवळला होता. पण दुर्बिणीचं काय ? त्याने मामांकडे भीत भीत पाहिले मामांनी एक डोळा बारीक केलेला पाहून त्याला बरे वाटले.

मामांना म्हणायचे होते, " मला सगळं माहीत आहे पोरा."

सबंध बस म्हणजे आता एक कढई बनली होती आणि त्या कढईत लाह्या खदखदाव्यात तसा चिवचिवाट चालू होता. प्रत्येकजण काहीतरी सांगत होता–विचारीत होता–आणि सर्वांच्या संभाषणाचा नि अभिनंदनाचा विषय होता अर्थात फास्टर फेणे.

" अखेरीस पोरानं मुहूर्त केलानच !" मामी अंगाभोवती शाल लपेटीत म्हणाल्या.

" नारळ फोडलान् !" मामा अडकित्त्याने सुपारी कातरीत म्हणाले.

" अग, मी आधीच म्हटलं होतं, की फास्टर फेणे बरोबर असल्यावर प्रवास सीधा होईल हे शक्य नाही ! श्रीनगर गाठण्यापूर्वीच एवढं केलंस. पुढं काय काय करणार आहेस बाबा तू ? माले, काढ तुझी डायरी आणि ठेव टिपून–शिकार

नंबर एक–"

"नुसती एक नाही बाबा" माली हसत म्हणाली, "एक अन् दोन ! एक गद्दार आणि दुसरा–"

"गिड्डार !" आता हा पांचट ज्योक बन्याने मारला.

• • •

# २. ‘ मैने ’चे रहस्य

पेपर साऽब .

मामासाहेबांच्या हातात वर्तमानपत्र देऊन घाईघाईने निघून जाणाऱ्या त्या मुलाकडे बन्याने जरा आश्चर्याने पाहिले. मुलगा उंच, तगडा होता. बन्याच्याच वयाचा. एखाद्या वर्षाने मोठा असेल. रूपाने देखणा, गौरवर्ण तरतरीत चेहरा, मोठाले नि हसरे डोळे. फास्टर फेणेचे मन त्याच्याकडे एकदम ओढले गेले होते.

“ ए, ठहरो जरा.” तो म्हणाला, “ तुम्हारा नाम ?”

“ अन्वर .” हसतमुखातून उत्तर आले. “ हाऊसबोटवाले का लडका हूँ मैं.

“ शमसू चाचे का ? बन्याने लगेच नाते जोडून टाकले. “ तो बस ! तुम्हारी हमारी दोस्ती हो गयी. चलो, हमें कहीं ले चलो.”

‘ शिकार करने ?” पुन्हा हसत प्रश्न.

“ कुछ भी चलेगा ” माली म्हणाली, “ इस बोटघर में बैठ बैठ हमकू कंटाला आ गया.” आणि मग वडिलांकडे वळून तिने विचारले, “ बाबा, जाऊ ना हो आम्ही बाहेर भटकायला ?”

" जा, पण जपून ...हे पाहिलंत काय आहे पेपरात ? '

" काय ?" हातात चहापाणी घेतलेल्या मामी पण मामांच्या खांद्यावरून डोकावत होत्या. त्या उद्गारल्या, " अगबाई !"

'काश्मीर समाचार' मधली बातमी काळजी करण्या सारखी होती खरी. पाकिस्तानव्याप्त प्रदेशातून बरेच लोक म्हणे जम्मू-काश्मीरमध्ये घुसले होते आणि त्यांनी हेरगिरील-सुरुवात केली होती. सरकार त्यांच्याविरुद्ध कडक इलाज योजीत होते. अगदी ताजी बातमी होती ही.

" कहते हैं, पॅराशूटवाले भी उतरे हैं ! " अन्वरला न राहवून तो म्हणाला, " लेकिन पेपर में दिया नहीं. "

" ट्रॉक् !" बन्या म्हणाला, " म्हणजे, माले, आपल्याला वाटेत जो अनुभव आला तो उगाच नाही. पाकवाल्यांनी सगळीकडेच काहीतरी गडबड सुरू केली आहे नक्की. "

फास्टर फेणे आणि मंडळी आपली मार्गातली बहादुरी उरकून श्रीनगरात कालच दाखल झाली होती. त्यांचा मुक्काम एका हाऊसबोटीत होता. झेलम नदीच्या पात्रात अशा गृहनौकांची एकच गर्दी उडालेली असते. घरच्या-सारख्या सर्व सुखसोयींनी सज्ज अशा या नौका म्हणजे जलवेष्टित हॉटेलेच असतात म्हणा ना ! काश्मीरच्या थंड हवेत मजेने राहण्यासाठी आलेले लोक या गृहनौकांमधून राहतात. कधी नदीच्या पाण्यात ते पोहतात, मासे मारतात; धनुष्यबाण किंवा बंदूक घेऊन पाखरांच्या शिकारीला जातात; तर कधी कधी अरण्यातून नुसतेच भटकतात. काश्मीरचे हे अरण्य म्हणजे पृथ्वीवरचे नंदनवन. उंच उंच

पाईन, देवदार नि चिनारवृक्ष; लांब लांब पात्याच्या विलोसारख्या नदीप्रवाहावर वाकलेल्या जलवेली. द्राक्षे, सफरचंदे, चेरी, जर्दाळू यांसारख्या नाजूक रसाळ फळांची इथे एकच गर्दी, आणि फर्न, गुलाब, चेरीब्लॉसमसारखी फुलझाडे रानोमाळ फुललेली. रंगेबेरंगी रानफुलांनी डोंगर-उतार सजलेले असतात. जरा दूर झाडांच्या पलीकडे नजर फेकली तर हिमालयातले ऋषितुल्य पहाड आपली पांढरी मस्तके वर करून मोठ्या गंभीरपणे माणसांच्या लीला पाहात आहेत असा भास होतो.

बन्याला नि मालीला रात्री बोटीत झोपायला मोठी गंमत वाटली होती. आपल्या हाऊसबोटीचे नावही त्यांना एकदम पसत पडले होते– 'रोशनआरा'! मालकाचे नाव शमसुद्दिन. मोठा दिलदार आनंदी गडी. पाहुण्यांच्या स्वागतासाठी तो मुद्दाम बसस्टँडवर हजर होता. आणि त्याचा मुलगा मोठा छान आणि आपल्याच वयाचा हौशी कुमार आहे हे आता कळल्यावर या बहीण-भावांच्या आनंदाला पारावार उरला नाही त्याच्याबरोबर भटकायला जाण्यासाठी दोघांचीही मने उतावीळ बनली. पण वर्तमान-पत्रातल्या त्या बातमीमुळे या आनंदात मिठाचा खडा पडल्यासारखे झाले.

म्हणजे मामा-मामींच्या दृष्टीने, बरे का? मुलांच्या दृष्टीने नव्हे. आणि फास्टर फेणेच्या दृष्टीने तर मुळीच नाही. असला मसाला बन्याला नेहमीच हवा असे– आणि त्याच्या वाटचालाला तो हटकून यायचा पण.

"पण पाक शिपाई तर नेहमीच सीमेवर त्रास देत अस-

तात." मामी जरा वेळाने म्हणाल्या, "त्यात विशेष ते काय ?"

"हं : !" मामा भुवया आक्रसून म्हणाले, "या वेळची त्यांची गडबड साधी वाटत नाही. काश्मीरवर स्वारी करण्याचा पाकिस्तानचा बेत दिसतोय. हे वाचलंस ? सरहद्दीवर पाक सैन्याची हालचाल सुरू आहे. तोफा नि रणगाडे पण आणलेले दिसतात."

आणि बन्या म्हणाला, "हे घुसखोर हेर म्हणजे युद्धाची विनीवरची तुकडी. आधी हेर पाठवायचे अन् मग चोरट्या हल्ल्याना सुरुवात करायची हे दगलबाज लोकांचं नेहमीचं तंत्र."

"ऐका आमच्या जवानमर्दाच्या तोंडून!" मामा म्हणाले. "नेफा आघाडीवर जाऊन आलाय म्हटलं तो !"

"हे बघ बन्या–" मामी करुण नजरेने त्याच्याकडे पाहात म्हणाल्या, "तू आपल्या वडिलांना काय कबूल केलं आहेस ते विसरू नकोस आणि पुन्हा भलत्या भानगडीत पडू नकोस."

"प्रवासात तुला मिळाला ना एक हेर ? मग बस झालं ? आता गप्प बैस !" मामांनी बजावले.

बन्या डोळे वटारून उद्गारला, "कमाल आहे तुमची ! तुम्हाला मी म्हणजे वाटतो तरी कोण ? मी नि माली चाललोत या अन्वरबरोबर फिरायला."

"तो शिकारीचं पुटपुटला काहीतरी." मामा.

"हो. शिकारदेखील जमली तर करू आम्ही–" बन्या आपली एअरगन उचलीत म्हणाला, "पण ती छोट्या चंदेरी कोल्हयाची. इथं म्हणे नदीच्या काठाकाठानं सिल्व्हर

फॉक्सच्या गुहा आहेत."

" ठीक आहे. करा तुम्ही शिकार कोल्ह्याची, पण स्वतः एखाद्या लांडग्याची शिकार बनू नका म्हणजे झालं !" असे म्हणून मामा पुन्हा वर्तमानपत्रात मग्न झाले आणि ही उत्साही किशोर मंडळी गृहनौकेच्या बाहेर पडली. मामींनी चहाचा कप तोंडाला लावला. पण त्यांची संचित नजर हाऊसबोटीच्या खिडकीबाहेर लागली होती.

" ए " अन्वरने खांद्यावर अडकवलेले धनुष्य पाहून बन्या एकदम म्हणाला, " तुझं ते धनुष्यबाण दे मला आणि माझी एअरगन घे तू. चालेल ?"

" क्यों नही चलेगा ?" अन्वर म्हणाला आणि त्याने आनंदाने फास्टर फेणेबरोबर शस्त्रांची अदलाबदल केली. त्याला स्वतःला बंदूक नवी होती आणि फास्टर फेणेला धनुष्य–बाण नवे होते.

" यह हमारा भाई नेफा में लड के आया है...जवानमर्द फास्टर फेणे !" माली अन्वरला बन्याचा परिचय करून देऊ लागली. " एअर गन में उसको कोई इंटरेस्ट नही, उसने मशिनगन चलाया है."

" अच्छा ?" अन्वर वाटेत थबकून आपल्या विलोल नेत्रांनी बन्याकडे पाहू लागला.

" यह बाता मारती है, !" बन्या म्हणाला, " आगे चलो. मने मशिनगन देखी है. हॅंडल की है, लेकिन चलायी नहीं... हाँ ! टैंक के अंदर जरूर बैठा हूँ मैं."

बोलत बोलत तिघेही बरीच दूर आली होती. झेलम नदीचा नागमोडी प्रवाह सकाळच्या कोवळ्या उन्हामध्ये

चकाकत होता. जणू एखाद्या राजकन्येने काढून ठेवलेल्या रुप्याचा कंबरपट्टाच. नदीच्या दोन्ही तीरांवर विरळ वनश्री होती आणि हिरव्यागार झाडीमधून ठोकळ्यांसारख्या लाकडी इमारती वर डोकी काढीत होत्या. नदीवर ठिकठिकाणी घातलेले पूलही लाकडीच होते, आणि नदीच्या खुद्द पात्रातदेखील लाकडी घरे हलत-डुलत होती. ह्यालाच गृहनौका म्हणतात.

मालीने आपले स्केचबुक बरोबर घेतले होते, ते पाहून बन्या म्हणाला, "ताईसाहेब, आपण म्हटलं शिकारीला चाललोत–चित्रं काढायला नाही."

"तुम्ही करा शिकार !" माली म्हणाली, "मी आपलं शिकारीचं चित्र काढीन. अर्थात तुम्हाला पहिलं जमलं तर मला दुसरं जमणार म्हणा !"

बन्याने तिचा टोमणा नुसता ऐकून घेतला. तो काही बोलला नाही. खांद्यावरचा तिरकमठा हातात घेऊन त्याने दोरी ताणली अन् समोरच्या झाडावर एक बाण सोडला. लगेच फांद्यांवर सळसळ झाली अन् एका मोठा रंगीबेरंगी पक्षी कर्कश शिट्टी फुंकीत उडाला. तो पार दूर दिसेनासा झाला.

"चुक गया !" बन्या म्हणाला. आणि त्याने भात्यातून दुसरा एक बाण काढला.

"गरीब बिचाऱ्या पाखरांना का मारतोस !" माली म्हणाली, "तुझे ते कोल्हे नि खोकडं मार की."

"खरंच, चंदेरी कोल्हे गरीब नसतात, नाही का ?" बन्याने विनोद केला. "ते श्रीमंत महामौल्यवान प्राणी.

त्यांच्या कातडीला हजारो रुपये किंमत येते. आणि ती मऊ मऊ फर गळ्यात घालून फॅशनेबल बायका ठुमकत ठुमकत हिंडतात."

बन्याने हे बोलताना स्वतःच ठुमकण्याचा जो आविर्भाव केला तो पाहून अन्वरला हसू लोटले. तो म्हणाला, "लेकिन मालाबेन, हम तो लोमडी को मारनेवाले नहीं उसको जीता पकडेंगे हम."

कोल्ह्याला लोमडी म्हणतात हे कळून मालीला जेवढी गंमत वाटली तेवढीच अन्वरने 'माली' चे 'माला' केल्यामुळे बन्याला गंमत वाटली. त्यामुळे दोघांनाही वेगवेगळ्या अर्थाने हसू आले.

झेलम नदीच्या काठांवर जी असंख्य बिळे आहेत त्यातून चिमुकले चंदरी कोल्हे राहतात अशी बातमी बन्याने श्रीनगरला येताना ऐकली होती. अन्वरने तिला दुजोरा दिला होता खरा; पण यात अतिशयोक्ती कितपत आहे हे त्याला अजून कळायचे होते.

बरेच दूर गेल्यावर मालीने एकदम नदीकाठच्या एका खडकावर उडी मारली आणि ती प्रसन्न मुद्रेने चौफेर पाहात म्हणाली, "आऽ हा !"

"काय झालं ?"

"किती छान जागा आहे ही ! दूर दिसणारी ती सुरूची झाडं, हे-हे कदंब वृक्ष, तो आंबा, ते सळसळणारं उंच गवत, त्या खारकुड्या "

"तू कविता करणार आहेस की चित्र काढणार आहेस ?" बन्याने अिचारले.

"जमलं तर दोन्ही !" माली म्हणाली, "पण मी इथंच बैठक मारणार नक्की. तुम्ही खुशाल जा शिकार करायला."

"ठीक आहे." वन्या म्हणाला,

"चल रे अन्वर." आणि तो अन्वरचा हात धरून पुढे निघाला.

माली खडकावर मांडी घालून बसली आणि हातातले पुष्टिपत्र नीट सावरून धरून तिने पेन्सिलीने समोरचे निर्सग दृश्य त्या पांढऱ्याशुभ्र कागदावर भराभरा चितारायला सुरुवात केली.

तिकडे बन्या नि अन्वर गप्पा मारीत मारीत आणखी पाव मैल दूर गेले.

'अगर पाकिस्तानी आयेंगे–" अन्वर दोन्ही हातांनी बंदूक सावरीत म्हणाला, "तो बता देंगे उनको यहाँ का मामला क्या है ! इथले मुसलमान बोळ्याने दूध पिणारे नाहीत म्हटलं ! अब्बाजान कहते हैं–"

"काय सांगतात तुझे बाबा ?"

उत्तरादाखल अन्वरने पहाडी आवाजात एक शायरी म्हटली–

"हिंदुस्तान में खुशहाली से
रहते है सब मजहब ।
पाकिस्तानही खाली पीली
मचा रहा है गहजब ।

है क्या उनके वहाँ? सारा गोलमाल और बंडलबाजी!"

"खरं आहे तू म्हणतोस ते."वन्या धनुष्याला बाण जोडीत म्हणाला, "वहाँ तो किसी का जूता किसी के पाँव में है नही."

“ हाँ लेकिन उनमें से कोई जूतेखोर यहाँ भी मिलते हैं न ? सुना है कि आदमपुरे में कुछ जगहपर वे मिलते हैं. कधीकधी कागज वाटतात. पण श्रीनगरचे बहुतेक लोक फाडून त्यांच्या चिंध्या करतात. ”

“ कागद ? काय असतं त्या कागदात ?”

“बंडलबाजी ! दूसरा क्या ? ढेर बातें कहेंगे वे. यहाँ कोई सुनेगातक नहीं. बातें ऐसी होती है–यह देख ..”

बोलता बोलता अन्वरने खिशातून एक चुरगळलेले हॅंडबिल काढले होते. ते त्याने बन्यापुढे केले. मग एकदम त्याच्या लक्षात आले की बन्याला काश्मिरी भाषा येत नाही आणि त्या पत्रकातली भाषा तर काश्मिरी होती.

“ हिंदुस्तान की बदनामी है और कुच्छ नहीं ” तो कागद परत खिशात कोंबीत अन्वर म्हणाला.

“ मग तुझ्या खिशात कशाला ते ?” बन्याने विचारले.

“ पोलिसाला देणार आहे. अब्बाजाननी सांगितलंय की असली काही पत्रकं मिळाली तर ती पोलिसांच्या हवाली करीत जा. ”

इतके बोलणे होत आहे तो दोघे डाल सरोवरावर येऊन पोचले होते. या ठिकाणी तलावाच्या किनाऱ्याला वाक आलेला असून पलीकडच्या तीरावरची तांबड्या फळांनी लदलदलेली झाडे उन्हात चकाकताना दिसत होती.

“ यह कौनसा फल है ?” बन्याने नेम धरीत विचारले.

“ अलबुखार मालूम नहीं तुम्हे ? बहुत...” बोलता बोलता अन्वर थबकला. एकाएकी त्याची दृष्टी झाडावरून खाली आली अन् तीरावर एकाग्र बनली.

" काय रे झालं अन्वर ?"

बन्याचा नेम तेवढ्यात हुकला होता आणि आपल्या भात्यातली दुसरी काटकी काढून तो धनुष्याला जोडीत होता. इतक्यात त्याचा दंड पकडून अन्वर म्हणाला, " यह जरा अजीबसा लगता है !" " क्या ?"

"वह हाऊसबोट देख. तिच्यात कुणीतरी राहायला आलेलें दिसतात. गेले चार महिने ती बोट नुसती पडली आहे. कुणी मुसाफीर मागायला लागला तर मालक जबाब द्यायचा– बुक्ड् !"

" चार चार महिने बुक्ड् ?" फास्टर फेणे म्हणाला. "हा भुक्कड मालक आहे तरी कोण ?"

" गुलाम कादर नाव त्याचं." अन्वरने माहिती दिली.

" मला यात काहीतरी रहस्य असावंसं वाटतं." फास्टर फेणे म्हणाला. " जवळ जाऊन पाहू या का ?"

लगेच दोघांनी तलावाच्या काठाने धावत जाऊन हाऊस बोटीची पिछाडी गाठली. तिथेच ते अलुबुखारचे झाड होते. बन्याचे लक्ष खाली लोंबणाऱ्या एका फांदीकडे गेले. फांदीला लाल फळांचा एक झुपका लटकत होता. बन्याने उंच उडी मारून तो झुपका पकडला. पण फांदी पुन्हा सटकन वर गेली आणि बन्या तिला लोंबकळत राहिला.

" हे. हेः हेः !" अन्वर ओरडला. " शिकारने ही तुम्हारी शिकार की ! लेकिन मुझे कितनी अच्छी शिकार मिलने-वाली है, देख !"

अन्वरच्या बोलण्याचा अर्थ लक्षात येताच बन्याने फांदी सोडून दिली आणि जमिनीवर पाय टेकताच तो अन्वरच्या



बाजूला धावला.

अन्वरला एक कोल्हयाचे बीळ दिसले होते आणि तो बिळात हात घालून काहीतरीं चाचपीत होता.

" सम्हाल! काटेगा ! " फास्टर फेणेने दातांनी खालचा ओठ चावीत म्हटले.

दोघांनाही त्या संशयित हाऊसबोटीचा आता विसर पडला होता. कारण अपेक्षित शिकार त्यांच्या अगदी हातात आली होती. निदान तसे त्यांना वाटत होते.

" लोमडीके छोटे बच्चे कभी काटते नहीं " अन्वर खात्रीपूर्वक म्हणाला, " और मेरे ख्याल इसके अंदर छोटे बच्चेही हैं "

बिळात आणखी खोलवर हात घातल्यावर त्याने जरा गोंधळल्यासारखी मुद्रा केली.

" चमडी लगती है " तो म्हणाला, " लेकिन फर नहीं. यह तो कडक चीज है, और हिलती भी नही."

लवकरच त्यानी ती चीज ओढून बाहेर काढली. खूप मोठे असे ते कसले तरी मऊ पण चिवट कापड होते आणि ते वाटेल तसे कोंबल्यामुळे चुरगळले होते.

" क्या है यह ? प्लास्टिक या टेरिलीन ?"

कापड उलगडून सरळ करायला त्यांना फार वेळ लागला नाही. आणि मग हे भले मोठे चांगले आठ-दहा फूट व्यासांचे गोल कापड म्हणजे काय आहे याची फास्टर फेणेला ताबडतोब कल्पना आली.

" ट्रॉक् ! " तो उद्गारला.

" काय ?"

" हवाई छंत्री! पॅराशूट ! दोऱ्या तोडून कुठंतरी दुसरीकडे टाकलेल्या असाव्यात. पण हे पॅराशूट आहे हे आर्मीतला कालचा पोरही सांगेल. "

आणि वन्या ऊर्फ फास्टर फेणे कालचा आर्मीतला पोरच होता की !

दोघांनीही डोळे फाडून एकमेकांकडे पाहिलें आणि मग दोघांच्याही नजरा एकाच वेळी अभावितपणे त्या हाऊसबोटीकडे वळल्या. फर्लांगभर अंतरावर तलावाच्या काठाशी ती हाऊसबोट ' मैना ' उभी होती.

दोघांच्या मनाला एकाच संशयाने घेरले. शत्रूचा छत्रीधारी हेर इथे उतरला असावा. फार फार तर काल रात्री. त्याच्या आधी नाही. आणि मग आपलं पॅराशूट गुंडाळून त्याने या कोल्ह्याच्या बिळात कोंबलं असावं. दोऱ्या तोडून दुसरीकडे कुठेतरी लपवल्या असतील किंवा खिशात कोंबल्या असतील. दोरी म्हणजे हरकामी वस्तू.

पण पुढे गेला कुठे तो पॅराशूटवाला ? अर्थात त्या हाऊसबोटीत. इतके दिवस ती गृहनौका रिकामी का पडली होती त्याचाही आता चट उलगडा झाला होता. खरोखरीच बोट ' बुक ' केलेली होती. पाकिस्तानी हेराने ' बुक ' केली होती ती. म्हणजे या ' मैना ' बोटीचा मालक गुलाम कादरमियाँ हाही पाकिस्तानला सामील असला पाहिजे.

" ऐसी बात है ?" अन्वर दात-ओठ चावीत म्हणाला, " तो मियाँ साहब की यह मैना पाकिस्तान के बोल बोलती है ? अच्छा !"

" तो हाऊसबोटीत काय करतोय ते –पाहू या का

आपण ?" बन्याने दबलेल्या ओठांतून विचारले.

अन्वरला ती कल्पना पटली. लगेच दोघेही पाण्यापर्यंत गेले आणि मग तलावात उतरून ते घोटभर पाणी तुडवीत चोरपावलांनी मैना बोटीकडे निघाले.

● ● ●

# ३. मालीवर संकट

बन्या उर्फ फास्टर फेणे आणि त्याचा काश्मिरी मित्र अन्वर, दोघे दूर कोल्हयाच्या शिकारीला गेलें; आणि इकडे माली झेलमच्या तीरावर चित्रे काढण्यात दंग झाली. तिच्या स्केचबुकात आकाशाची निळाई उतरली अन् खळाळणाऱ्या प्रवाहाच्या पांढऱ्या-पिंग्या छटाहीं उमटल्या. समोर उभे ठाकलेले पॉपलर वृक्ष नि त्यामागची शुभ्र गिरिशिखरे त्यात घुसली आणि रंगीत फुलांची रांगोळी घातलेली हिरवळही त्यात पसरली. मध्येच एका माशाने डुबकन् डोके वर काढले होते आणि परत तो पाण्यात नाहीसा झाला होता. तेवढ्यात समोरच्या झाडावरून एका ऐटबाज खंड्या पक्ष्याने सपाट्याची झेप घेतली होती अन् पाण्यालगत सुरकांडी मारून तो वर निघून गेला होता. तो क्षणिक झपाटा पाहून स्तिमित झालेल्या मालीतला चित्रकार माशाने पुन्हा डोके वर काढावे म्हणून वाट पाहात होता. आपल्या फांदीवर बसून खंड्याही तेच करीत होता. पण बरीच मिनिटे निघून गेली तरी मासा वर आला नाही अन् अर्थात खंड्यानेही पुन्हा झेप घेतली नाही, तेव्हा तो प्रसंग आठवणीनेंच चितारावा म्हणून मालीने पेन्सिल कागदाला टेकवली. तीन-चार मिनिटांत शिकारी पक्षी नि

त्याचे पाणसावज यांची ती जोडगोळी कागदावर अवतरली आणि हातातली वही अंमळ दूर धरून तिरक्या मानेने मालीने ते दृश्य निरखायला सुरुवात केली.

"एक्सलंट ! स्प्लेंडिड !"

माली दचकली.

निमिषमात्र तिला असे वाटले असावे की, स्वतःच्या कलाकृतीवर खूष होऊन आपणच तर तो उद्‌गार काढला नाही ? —पण नाही. एकदम तिला आठवले. क्षणापूर्वीच आपल्या मागे काहीतरी हालचाल झाल्याचा तिला भास झाला होता. पण चित्राच्या नादात तिने लक्ष दिले नव्हते. आता तिने झटक्यात मागे पाहिले.

एक उंच तिशीचा इसम तिच्या मागे बत्तिशी विचकीत उभा होता. अंगात शर्ट-पँट, अंगकाठी बारीक सडक पण दुबळी नाही, चेहरा उभट, केस हल्लीच्या फॅशनचे वाढवलेले, गालावर कल्ले, नाक लांब सरळ, त्याच्यावर पुटकुळी, दिसण्यात तरतरीत असा गृहस्थ किंचित ओणवून मालीच्या पुढच्यातल्या चित्राकडे पाहात होता. त्याच्या कपाळाला नि हातांना ताजे ओरखडे उठले होते... कुठे काटयाकुटयात गेला होता धडपडायला ?... पण एकंदरीत माणूस मालीला बरा वाटला.

"बहोत अच्छी चित्रकार हो तुम !" त्याने हनुवटीवरून हात फिरवीत प्रसन्नतेने म्हटले. "कहीं खास शिक्षा ले ली है ?"

"खास तो नहीं— शाळेत शिकवलंय तेवढं." माली म्हणाली. अर्थात दोघेही हिंदीत बोलत होती,

"मग कमाल आहे ! मी मोठमोठ्यांची लॅन्डस्केप्स पाहिली आहेत. खोटं कशाला बोलू ? तुझं चित्र त्यांच्या तोडीचं आहे असं मी म्हणत नाही. पण तुम्हारी लाईन्स में बेशक ऐसा कुछ है... बडप्पन में तुम बडी आर्टिस्ट होगी."

"शुक्रिया !" मालीच्या अंगावर मूठभर मांस चढले.

एवढ्या वेळात त्या स्मार्ट तरुणाने शेजारचा खडक रुमालाने साफसूफ केला होता. त्यावर आता त्याने बैठक मारली आणि तो म्हणाला, "सीनसीनरीच काढतेस की माणसांची स्केचीस पण ?"

"फिगर ड्रॉइंग पण शिकलेय मी- पण जेमतेम" माली.

"लाइफवरून–म्हणजे मी बसलोय ना इथं, तर मला पाहून माझं चित्र काढू शकशील ?" त्याने स्मितपूर्वक विचारले.

"काढू शकेन," माली म्हणाली, "पण वेळ लागेल. पोर्टेट काढण्याइतका माझा हात सराईत नाही."

"ओः ! उसकी चिंता मत करो ! लेकिन फोटोवरून तर करू शकशील ?" असे म्हणत त्या माणसाने खिशात हात घातला अन् एक लहानसे छायाचित्र बाहेर काढून तिच्यापुढे धरले.

"याचं स्केच करू शकशील तू ?"

"हात्तिच्या ! त्यात काय ?" आणि मग एकदम त्याच्याकडे पाहून म्हणते, "हे तुम्हाला कशासाठी हवंय ?"

"जस्ट फॉर फन." तो म्हणाला. "यह मेरा दोस्त है. त्याला फोटो परत हवाय, कारण तो पासपोर्टमधला आहे.

हा दोस्त अमेरिकेला चाललाय. तू आर्टिस्ट दिसलीस म्हणून विचारलं हो. अगर तुम्हे तकलीफ न हो तो झटपट कॉपी करून देशील ?"

"देईन की. तकलीफ कसली त्यात ?"

त्याने दुसऱ्या खिशात हात घालून एक चॉकलेटची मोठी लादी काढली.

"चॉकलेट घ्यायला मी काही लहान बाळ नाही !" माली नाक मुरडून म्हणाली. आणि पेन्सिल घेऊन तिने मुकाट्याने त्या फोटोची नक्कल करायला सुरुवात केली.

"चॉकलेट काही लहान बाळंच खातात असं नाही. मलासुद्धा आवडतं चॉकलेट" तो बुवा म्हणाला.

माली जास्त काही बोलली नाही. तिची पेन्सिल झपाट्याने रेषा काढीत होती. लवकरच चित्र पुरे झाले.

तो माणूस पाहातच राहिला. त्याने डोळे फाडून उद्‌गार काढले, "या अल्ला ! तू तर कमाल केलीस ! क्या लाइकनेस है ! दे दो जल्दी" आणि तिने त्या चित्राचा कागद वहीतून फाडून देताच तो माणूस लगेच उठला आणि त्वरेने तिथून निघाला. तो गेला त्या दिशेला आश्चर्याने पाहात माली उद्‌गारली, "वल्लीच दिसते एक ! थँक्ससुद्धा मानले नाहीत माझे."

आणि मग तिला वाटले-- खूप झालं स्केचिंग. आता जावं झालं घरी.

जवळ पडलेले चॉकलेट तिला दिसले. हसून ते उचलीत ती म्हणाली, "हेच थँक्स म्हणून घ्यायला हरकत नाही."

स्केचबुक काखोटीला मारीत ती उठली. पायाना मुंग्या

आल्या होत्या म्हणून तिने ते झटकले आणि दोन-चार पावले ती वर चढून गेली. इतक्यात तिचे लक्ष अवचित एका झाडावर लटकत असलेल्या पदार्थाकडे गेले.

"आं ? हे काय ? चिंधी चिरगूट नाही– चांगलं भलं मोठं कापड दिसतंय. कुणी वाळत घातलेला पंचाबिंचा आहे काय ? पण नाही– तसंही नाही."

तिने जवळ जाऊन कापडाचे खाली लोंबणारे टोक चाचपून पाहिले.

"किती मजबूत कापड आहे हे ! चिवट किती ! या झाडाला काटे नसते तर इतकंदेखील फाटलं नसतं. ...मांजरपाट किंवा कॅनव्हास म्हणतात तसं तर नाही ? –नाही, पण हे मऊ आहे छत्रीसारखं... प्लास्टिक ! ... हां, आत्ता आलं लक्षात ! हे पॅराशूटचं कापड आहे. त्या काय छत्रीसारख्या रेघा... ती टोकं... अन् ते पाहा आत गुंतलेलं दोऱ्याचं गुंडाळं."

माली वटारलेल्या डोळ्यांनी त्या कापडाकडे पाहात राहिली. तिच्या डोक्यात आता विचारांचे काहूर उसळले होते... वर्तमानपत्रातली ती बातमी, पाकिस्तानी हेर रात्री पॅराशूटमधून उतरल्याच्या त्या वदंता...त्यात तथ्य होतं म्हणायचं ! ... आणि काल रात्री बसमधून येताना बन्याशी झालेले आपले बोलणेही तिला आठवले. बन्याला दिसलेले ते पांढरे पुंज त्याला पॅराशूटसारखे वाटले होते. आपण त्याला वेड्यात काढलं होतं; पण तरी बन्याचं समाधान झालं नव्हतंच.

आणि आता–आता एक फाटकं पॅराशूट आपण प्रत्य-

क्षच पाहतो आहो. म्हणजे बन्याचा रिपोर्ट चुकीचा नव्हता आणि वर्तमानपत्रातल्या बातम्याही चुकीच्या नव्हत्या तर !

मालीचे ऊर धपापत होते .. हा पुरावा आपण घरी न्यावा का ? बाबांना दाखवावा ? हो, दाखवलाच पाहिजे.

मालीची खात्री होती, की हे पॅराशूटचं पटकूर आपण बाबांना दाखवलं तर ते ताबडतोब पोलिसला कळवतील आणि हां हां म्हणता पोलिसच्या तुकड्या झेलमवरचं जंगल विंचरायला सुरुवात करतील. पण एवढं करूनही ते हेर सापडतील का ? गुप्त हेर म्हणजे महाभयंकर –'डेंजरस' माणूस असतो म्हणे ! दुसऱ्याच्या अन् स्वतःच्याही जिवाशी क्रूर खेळ खेळायला त्याला काही वाटत नाही. या पॅराशूटचा मालक जवळच कुठंतरी असणार. कदाचित त्या पलीकडच्या जंगलात दडलेला असेल. आपण त्याची खबर दिली असं कळलं तर तो कदाचित आपला खातमाही करील !'

किती झुर्रकन् हे विचार मालीच्या मनात येऊन गेले ! कागदावर ते उतरायला मला जितका वेळ लागला त्याच्या शतांश वेळात मालीला हे सारे तडकले असेल. क्षणार्धातच म्हणा ना ! मग दुसऱ्याच क्षणी माली सावरली. तशी ती भित्री मुळीच नव्हती. हेराबद्दलची ही काळीकुट्ट बाजू लवकरच तिच्या मनातून निघून गेली आणि एक प्रकारच्या उत्साहाने तिला घेरले.

बन्या आणि अन्वर ज्या बाजूला गेलेले पाहिले होते तिकडे तोंड करून ती ओरडली, " बन्या–अन्वर ! मला

पाहा काय सापडलं ! ... पॅराशूट !" बंदुकीतून 'शूट' करावे तसाच तो शब्द तिनें उच्चारला होता. मग हाताचे बोळके करून तिने तोंडापुढे धरले आणि ती ओरडली, "बन्या ! अन्वऽऽर ! हो-आ-ओ ! हो-हो !"

फास्टर फेणेनेच शिकवलेल्या पद्धतीने तिने ही हाळी दिली होती. पण ती बन्याला किंवा अन्वरला मुळीच ऐकू गेली नसणार. कारण, नंतर कितीतरी वेळ ती कान देऊन गप्प उभी होती. पण तिला कुठूनही कसलाही प्रतिसाद मिळाला नाही.

'या पोरांना हाक ऐकू गेली नसावी' माली आपल्याशी म्हणाली, 'म्हणजे शिकारीच्या नादात हे खूपच लांब गेलेले दिसतात. किंवा–किंवा असं तर नसेल झालं ? ... आणि एकदम तिच्या तोंडून मोठ्याने शब्द निघाले, "जंगलात दडलेल्या हेरानं तर उचललं नसेल त्यांना ?"

असे उद्‌गार तिच्या तोंडून निघत आहे तोच–

"हाः हाः हाः !"

मालीला मान फिरवायलाही वेळ मिळाला नाही. मागून कुणीतरी विद्युद्वेगाने तिच्या मानेभोवती हात टाकला अन् तिचे तोंड दाबले. त्याच वेळी दुसऱ्या अदृश्य हाताने तिची मनगटे इतक्या जोरात आवळली की तिचे तोंड दाबलेले नसते तर त्यातून कळवळून किंकाळीच निघाली असती.

मानसिक धसक्यातून सावरल्यावर मालीच्या लक्षात आले, आपल्या तोंडात कुणीतरी बोळा कोंबलेला आहे अन् आपले हात-पाय कुणीतरी दोऱ्यांनी बांधलेले आहेत.

कुणीतरी ?... कुणी ते लवकरच तिला कळून चुकले.

मघाचाच तो इसम तिच्यासमोर उभा होता अन् कंबरे-वर हात ठेवून खदखदा हसत होता.

'टाइम इज गोल्ड ! और मुझे लौटा दिया तुमने !' तो म्हणाला 'क्यौं मिस् फेमस आर्टिस्ट ? यह अच्छी आफत आ गयी तुम्हारे उपर. चॉकलेट दिलं होतं ते खायचं सोडून भलतीकडे नाक खुपसायला कुणी सांगितलं होतं तुला ? –ते पॅराशूट असेल नाही तर आणखी काही असेल–तुला काय करायचंय ? –बरी तुझी गठडी वळली. पण ही गठडी टाकायची कुठे आता ?"

'आणि खरं म्हणजे–' तो खालच्या आवाजात आपल्याशी बोलला, ' त्या पॅराशूटचाही निकाल लावायला हवा होता आधीच. कुणा गद्धयानं तसंच टाकलं कुणास ठाऊक !'

माली त्याच्याकडे मोठाल्या डोळयांनी पाहात होती. त्या डोळयात आता भीती नव्हती असे म्हणण्याचे धाडस मी करणार नाही. काही झाले तरी माली एका कोवळया वयाची मुलगी होती आणि तिला पकडणारा हा माणूस शुद्ध खवीस होता. गठडी कुठे टाकावी म्हणून विचार करीत त्याने जेव्हा सभोवार नजर फिरविली तेव्हा मालीच्या काळ-जातून जणू सुरा फिरला. त्याची ती नजर एकदा झेलम नदीच्या खळखळणाऱ्या प्रवाहाकडे पण गेली होती. पण नाही. 'हुं' असा एक हास्योद्‌गार काढून मालीला जल-समाधी देण्याचा विचार त्याने रद्द केला असावा.

मग अकस्मात् त्याने घडयाळाकडे पाहिले. त्याचे प्रत्येक मिनिट मोलाचे असणार. कारण तो आता अस्वस्थ बनला होता. शेवटी जास्त वेळ न घालवता त्यानें मालीचे मुटकुळे

उचलले आणि तो त्वरेने बाजूच्या झाडीत शिरला.

झाडाआड होता होता मालीने नदीतीराकडे पाहिले होते. कणीतरी दोन-तीन माणसे तिकडून येताना दिसली होती. त्यांना टाळण्यासाठीच या चांडाळाने एवढी घाई केली असावी असे मालीच्या मनात आले. तिला वाटले—त्या लोकांना ओरडून सांगू या का ? पण हा विचार तोंडातल्या बोळच्याने जिथल्या तिथे दाबून टाकला आणि तो हताशपणे हा पुढे आपल्याला कुठे नेतो म्हणून वाट पाहात राहिलो.

पायाखालचा पालापाचोळा चुरडीत त्या हेराने जवळजवळ शंभर यार्ड अंतर काटले आणि मग त्याला एक जुने पडके घर दिसले.

' इथे कुणाचीच वस्ती दिसत नाही.' तो आपल्याशी म्हणाला, ' टेंपररी जेल म्हणून ठीक आहे. '

मालीला त्याने त्या खोपटाच्या भिंतीला टेकून बसवले. दाराला कडी होती ती त्याने काढली, दार लोटले अन् हात-पाय बांधलेल्या स्थितीत मालीला उचलून घरात फेकून दिले.

'बैठो अब यहीं. यह तुम्हारा स्टुडिओ समझ और तस्वीरे निकाल अच्छी अच्छी. हिलचाल करोगी तो याद रख !' तो खेकसला.


फेकून दिले म्हणजे अक्षरशः त्याने तिला पोते टाकावे तसे फेकले होते. तिला असे वाटले की आपल्या अंगातलं हाड न् हाड मोडलं आहे. पण तरी तिच्या तोंडातून आवाज उमटणे शक्य नव्हते. तिला झालेली वेदना फक्त तिच्या डोळ्यांत अश्रुरूपाने उभी राहिली. बांधलेल्या हातांनी तिने

आपले हृदय दाबून धरले.

हेराला हृदयच नव्हते. पुन्हा एकदा मघासारखे ' हाः हा : हा : !' म्हणून विकट हास्य करून त्याने दरवाजा खाडकन् बंद केला. त्याला कडी घालताना तो आपल्याशी म्हणाला, ' अब पहले पॅराशूटमें पत्थर बांधके उसको डुबाएं गेऔर फिर दौडेंगे मैना की तरफ. ऑलरेडी आय ॲम लेट !'

दाराला बाहेरून कडी घातल्याचा आवाज आत मालीच्या कानात शिरला मग तिला अंधारून आले. एकदम माली बेशुद्धपडली.

अन्वर नि फास्टर फेणे दबकत दबकत मैना नावाच्या त्या रहस्यमय हाऊसबोटीजवळ गेले. आणि खिडकीच्या पडद्याआडून ते आत पाहू लागले हाऊसबोट इतके दिवस रिकामी पडलेली असेल, पण आतल्या व्यवस्थेत कोणतेही न्यून नव्हते. सर्व सुखसोयी आत होत्या. आतल्या टेबलाशी दोन इसम बसलेले होते. त्यातला घडीची फरकॅप घातलेला काश्मिरी असावा. नाकाड भले मोठे, भुवया दाट अन मिशा बारीक पण काटेरी असे त्याचे वर्णन फास्टर फेणे मनात टिपतो आहे, तोच अन्वरने त्याला माहिती दिली की हाच बोटीचा मालक गुलाम हुसेन. त्याच्या समोर बसलेला दुसरा इसम जरा जाड होता. त्याच्या इटुकल्या मिशांची टोके वर होती. अंगात सूट अन डोक्यावर काळी गोल टोपी होती. बन्याला जेंव्हा पुढे कळले की हा गृहस्थ पॅराशूटला धरून उतरलेला आहे, तेव्हा त्याच्या त्या पोशा-



त्याची त्याला गंमत वाटली. आता तो तावातावानें काहीतरी बोलत होता. काहीतरी का? त्याचे शब्दच या दोघांना चांगले स्पष्ट ऐकू आले की,!

"घंटों से आया हूं मैं. उतरते उतरते कमर का काँटा टूटा, मालूम है? वह हरामजादा अभी तक आया नहीं! कितनी देर इंतजार करना?"

" ठहरिये दोस्त ! आयेगा–अभी आयेगा. "

" अभी–अभी–' असे म्हणून त्याने अस्वस्थपणे बोटीत येरझरा घालायला सुरुवात केली.

" त्याचं लक्ष जाईल इकडे. मान मागे घे " बन्याने बजावले. त्याप्रमाणे अन्वरने चटकन मान मागे घेतली.

" देखा तुमने ?" तो बन्याला म्हणाला. "अंदर टेबलपर कितनी हाथियारे पडी है !"

"देखा." बन्या म्हणाला. "और अंदर कपाट में भी बहोत है ..... पिस्तुलं, बाँब, हँडग्रेनेड्स् काय काय दिसलं मला !" असे बोलत फास्टर फेणेने पुन्हा पडद्याला नाक लावले.

" ए, मला सांगतोस मान मागे घे अन तू स्वतः मात्र नाक खुपसतोस ! " अन्वर कुरकुरला.

बन्याने त्याच्या तोंडावर हात ठेवला अन् तो झटक्यात पुटपुटला,

" वह आया है. "

" कौन ?"

" वह--जो आनेवाला था. "

अन्वरने पडद्याच्या खालचा काठ चिमटीने वर उचलला अन् हळूच फटीला डोळा लावून पाहिले.

उभट चेहऱ्याचा एक उंच, तरतरीत, कल्लेबाज माणूस पलीकडच्या खिडकीवर वेंघून आत उतरत होता.

" कितनी देर की अहमद ?" गुलाम हुसेन म्हणाला, " और चोर के माफक क्यौं पधारे ? तुला पुढचा दरवाजा मोकळा नव्हता का ?"

" जानबुझकर लोकांच्या मनात शक पैदा करायचाय का तुला ?" गोल टोपीवाला जाडा पाहुणा रागावून म्हणाला.

" खैर--वह रहने दो. बोल क्या खबर है ?"

अहमदने खिशात हात घालून दोन कागद काढले. लहान कागद म्हणजे फोटो होता. तो पाहुण्यांपुढे धरून त्याने विचारले, " यही है न ?"

पाहुण्यांनी फोटो पाहताक्षणी उत्तर दिले, " बिलकुल यही ! सी. आय. डी. का बडा हुश्शार अफसर और अवर एनिमी नंबर वन तुझ्याकडे कामगिरी आहे ती याचा मुडदा पाडण्याची. नीट पाहून ठेव."

" बहोत बहोत शुक्रिया !" अहमद नाक मुरडीत म्हणाला. " नीट पाहून ठेवला आणि त्याची कॉपीही करून घेतली. कारण हा फोटो आपण जास्त काळ जवळ ठेवू शकत नाही. पोलिस स्टेशनवरून आणलाय तिथल्या हवालदाराला फितवून. सुपरिंटेंडेंटच्या ड्रॉवरमधून आणला. तो नाहीसा झाल्याचं कळलं तर संशयाला आणखी कारण होईल."

" अरे हां हां ! मेरा कहना यह कि वापस करने से पहले उसे स्टडी करो. क्यौं कि वह तेरी शिकार है "

" स्टडी के लिए यह है मेरे पास --" असे म्हणून अहमदने तो दुसरा कागद पाहुण्यापुढे सारला.

" उसकी सही सही नकल है यह. "

पाहुण्यांनी चित्र नि छायाचित्र दोन्ही ताडून पाहिली आणि खुषीने मान डोलावली. " नकल तो अच्छी है. किसने

निकाली ? "

" है एक बर्डिंग आर्टिस्ट. एक लडकी नदीवर बसली होती. लँडस्केप काढीत. मी म्हटलं-- ही निर्जीव जमीन चितारतेस ? आदमी की फिगर निकाल ! आणि तिच्या-कडून हे काम करून घेतलं."

बाहेर अन्वरने चपापून फास्टर फेणेकडे पाहिले. त्यानेही विस्मयाने तोंड वासले होते.

" लडकी ? पण तिच्याबद्दल खात्री आहे का ?" पाहुणे विचारीत होते.

" खात्री आहे. कारण--" हनुवटीवरून हात फिरवीत अहमद गुलूगुलू हसत सांगत होता, " कारण तिला कैद करून ठेवलंय एका कोठडीत. उसकी फिक्र मत करो."

" फिक्र मत करो !" पाहुणे तोंड वेंगाडीत म्हणाले. " तू एक नाटकी माणूस आहेस, अहमद ! नको ती लचांडं पैदा करतोस !"

या बोलण्यातला शब्द न् शब्द बाहेर बन्या--अन्वरनी ऐकला होता आणि दोघेही चक्रावले होते.

" अन्वर, हा नक्की मालीबद्दल बोलतोय."

" शंकाच नाही ! तिला या बदमाषाने कैद केलं." बन्याचा स्वर कापरा येत होता ..

पण अन्वरची स्वारी पुन्हा कान देऊन ऐकत होती.

" साहेब, हे चित्र घेऊन मी माझ्या कामगिरीवर जातो. तुम्ही आपल्या कामावर जा. ठरल्या वेळी आपण भेटूच, पण हा हा फोटो परत करायचाय. ते काम कोण करणार ? मैं खुद तो नहीं जा. सकता आय विल बी ए सस्पेक्ट.गुलाम.--"

गुलाम हुसेन याची अपेक्षा करीतच होता. तो एकदम गुरगुरला, "मी आणखी काहीही करणार नाही तुम्हाला बोट दिली, तुमची दोघांची गाठ घालून दिली...."

"पैसेही तुला मिळाले."

"जी. म्हणूनच सांगतो माझं काम झालं."

दुसऱ्या दोघांनी नाराजीने त्याच्याकडे पाहिले, पण ते काही बोलले नाहीत.

अहमद काहीतरी विचारात गढला होता. एकदम म्हणाला, "या कामाला खरं म्हणजे एखादा चुणचुणीत पोरगा हवा. गुलाम हुसेन–तेरा लडका."

"मेरा लडका पहेलगाम म मौसी के घर गया है––मैंने पहेलेसे ही बताया." गुलामने तिरसटपणे उत्तर दिले आणि लगेच तो त्यांच्याकडे पाठ फिरवून बोटीबाहेर निघूनही गेला. त्याला कोणी अडवले नाही.

खिडकीबाहेर फास्टर फेणेने 'ट्रॉक्' केले आणि चमकत्या डोळ्यांनी आपल्या मित्राकडे पाहिले. मग त्याच्या गळ्यात हात घालून तो म्हणाला, "अन्वर, भेज्यात एक आयडिया फिरते आहे. कान कर इकडे."

अन्वरने कान तिकडे केला आणि मग जवळजवळ दोन मिनिटे दोघांची काहीतरी 'गुफ्तगूँ' चालली होती.

'गूफ्तगूँ' म्हणजे छुपी छुपी बातें याने कुजबूज !

□

११९९६ 3/11/2
का-वा

# ४. फसलेला पाठलाग

गुलाम हुसेन आपल्या हाऊसबोटीबाहेर पडला अन् जड पावलांनी किनाऱ्यावरच्या झाडीत शिरला. चार पावले गेल्यावर तो थबकून उभा राहिला. दुरून त्याची हालचाल हेरीत असलेला बन्या स्वतःशी पुटपुटला. 'देश विकायला निघालेला माणूस ! मधूनमधून मन खात असलं तर नवल नाही.'

पण त्याने गुलामकडे अधिक लक्ष दिले नाही. मघाशीच सुचलेली 'आयडिया' अमलात आणण्याचे ठरवून त्याने अन्वरला आधीच कामगिरीवर पिटाळले होते. आता त्याने खिशात हात घातला. पेन्सिलीचे थोटूक सापडले. कागदाचा एक तुकडाही मिळाला. कुठच्या तरी दुकानाची रोख पावती होती ती. बन्या खाली बसला. तिरकमठा जवळ ठेवून तो चुरगळलेला कागद त्याने मांडीवर पसरून सारखा केला. त्याच्या पाठकोऱ्या बाजूवर त्याने ढोबळ अक्षरांत काही मजकूर लिहिला, कागदाचा पुन्हा बोळा केला अन् तो बाणाच्या टोकाला लावला. मग उठून त्याने बाण धनुष्याला जोडला.

तो नि अन्वर आधी झेलमच्या नि मग सरोवराच्या

काठाने जरी बरेच दूर चालून आले होते, तरी नदीच्या नितलावाच्या वाकणामुळे त्याची 'रोशनआरा' आता पुन्हा नजरेच्या टप्प्यात आली होती. तिथल्याच एका उंच खडकावर चढून बन्याने याची खात्री करून घेतली. सारी शक्ती वेचून आपण बाण सोडला तर हाऊसबोटीपर्यंत तो नक्की जाऊ शकेल असे त्याला वाटले. फक्त नेम चुकता कामा नये.

फास्टर फेणेने ठरवले—आपण एकलव्य बनायचं. चित्त एकाग्र करून त्याने नेम धरला अन् धनुष्याची दोरी खेचली.

बाण सूं सूं करीत हवेतून गेलेला त्याला दिसला. मिनिटाच्या अवधीत त्याने हाऊसबोट गाठली; आणि—

"ट्रॉक्!"

बन्याला वाटले होते हाऊसबोटीवर बाण आपटला तरी पुष्कळ आहे. फार काय, किनाऱ्यावर जवळपास पडला तरी हरकत नाही. तिथे पोरें खेळताना दिसताहेत. त्यांच्यातल्या कुणाच्या तरी लक्षात येईल अन् तो बाण उचलील. थोडीफार अक्कल असलेला कुणीही तो चिठ्ठी वाचून म्हणा किंवा तशीच म्हणा—आत हाऊसबोटीमध्ये नक्कीच पोचवील.

पण...ट्रॉक्! आंधळा मागतो एक अन् देव देतो दोन... बाण सरळ उघड्या खिडकीतून आत घुसला की! इतके शंभर नंबरी यश मिळेल अशी कुणी अपेक्षा केली होती?

बन्याची छाती गर्वाने फुगली. अंगावर रोमांच उभे राहिले.

आणि मग काही क्षण तसेच निघून गेले. कुणीतरी चिठ्ठी वाचून बाहेर येईल असे बन्याला वाटत होते. थरथरत्या अंत:करणाने तो दूर रोशनआराकडे पाहात होता. मग चपापून

त्याने तो नाद सोडला. मैनाचा मालक गुलाम मागे ,वळला असून आपल्याकडे संशयाने पाहात आहे असे त्याच्या ध्यानात आले.

तो त्वरेने खडकावरून उतरला. जणू काही आपण केवळ शिकारीत रंगलो आहो असे दाखवण्यासाठी भात्यातला एक बाण काढून त्याने धनुष्याला जोडला अन् झाडांच्या शेंड्या-कडे पाहात पाहात रेंगाळत्या पावलांनी, गुलामच्या रोखून बघण्याकडे दुर्लक्ष करीत तो मुद्दाम त्याच्याच दिशेने निघाला.

"शाब्बास अन्वर !" तो जाता जाता उद्गारला. कारण अन्वर आपले काम ठीक बजावीत असल्याचे त्याला डोळ्या-च्या— अन् कानांच्याही—कोपऱ्यातून कळले होते.

अन्वर एकटाच एका खडकाला टेकून किनाऱ्यापाशी बसला होता. आसन म्हणून त्याने ते पाक पत्रक खाली अंथरले होते.

खिशातला बेंडबाजा काढून तो काहीतरी गीत वाजवू लागला. भारतद्वेषाने बरबटलेल्या गाण्याचे सूर होते ते. अन्वरला ते गांणे सबंध येत नव्हते, किंवा ते जाणून घेण्याची त्याची इच्छा नव्हती. पण सहा महिन्यांपूर्वी श्रीनगरात पडलेल्या छाप्याच्या वेळी पोलिसांनी पकडलेल्या एका कैद्याच्या तोंडून त्याने हेच सूर ऐकलेले होते आणि तथा-कथित आझाद काश्मीरवाल्यांचे ते एक पेटंट गाणे असावे असा त्याने तर्क केला होता. 'तसल्या' लोकांना तर ते गाणे नक्कीच खेचून आणील असे त्याला वाटत होते.

अन्वरचा तर्क खरा ठरला. कारण मैना बोटीचे दार उघडून तो हेर आता बाहेर आला होता. गळ्यात दुर्बीण

अडकवलेली होती. क्षणभर एका जागी उभे राहून त्याने अन्वरकडे पाहिले. अन्वरने असे दाखवले की तो पाहतो आहे हे आपल्या जणू लक्षातच आलेले नाही. मग जशी काही एकदम ही गोष्ट ध्यानात येऊन त्याने चपापल्यासारखे केले. बाजा वाजवायचा थांबला आणि खिशात कोंबला गेला. अन्वरने लगबगीने उठून पळून जाण्याची तयारी केली; पण पाहुण्यांनी दोन उड्या मारून त्याचा आधीच दंड पकडला होता.

"डरते क्यौं ?" तो हलक्या आवाजात म्हणाला. तेवढ्यात खाली पडलेले पत्रक त्याला दिसले. झडप घालून त्याने ते उचलले अन् त्याच्यावरून झरझर नजर फिरवीत प्रश्न केला– "किधर मिला यह ?"

भीतीने अन्वरची जणू बोबडी वळली होती. त्याच्या तोंडून शब्द फुटेना. तो नुसताच त-त-प-प करू लागला. त्याने पत्रक हिसकावून घेतले अन् त्याच्या चिंध्या करून त्या वाऱ्यावर उडवून दिल्या. ओढाताण करून त्या माणसाच्या हातून निसटण्याची त्याची धडपड चालूच होती.

"मैं बोला न घबराने की कोई जरूरत नही!" पाहुणे त्याचा दंड न सोडता दुसऱ्या हाताने त्याची पाठ गोंजारीत म्हणाले, "तू बहादूर लडका दिखता है. मेरा एक काम करेगा ?"

अन्वर घामाने डबडबला होता. "हां–हां–हां–" त्याने मुंडी हालवीत कसावसा होकार दिला.

"आदमपुरा मालूम है ? वहाँ की कल्लू की कोठी ?"

"जी" अन्वर घाम पुशीत म्हणाला, "मैं आदमपुरेका

ही रहनेवाला हूँ."

"तो वहुत अच्छी बात है.होडी वल्हवू शकतोस ?"

"आसानी के साथ !" अन्वरने गर्वाने उत्तर दिले. त्याची भीती आता पुष्कळच दवली होती.

"तो और अच्छी बात है. हमारी हाऊसबोट की डोंगी है वह ले जाना. एकदम फास्ट जा कल्लू की कोठी पर आणि आमचं हे लेटर तिथे याकूब हवालदार राहतो त्याला दे. कुणाला ?"

"याकूब हवालदार."

"करेक्ट ! लेकिन दुसऱ्या कुणाच्याही हातात पत्र पडता कामा नये. हे घे तुला खाऊला पैसे."

खिशातून त्याने एक पाच रुपयेवाली नोट काढली होती; पण ती गडबडीने त्याने परत खिशात कोंबली. अन्वरला त्याचे कारण त्याच क्षणी कळून चुकले. ती हिरवी नोट पाकिस्तान सरकारची होती.

आता दुसरी नोट काढून त्याने अन्वरच्या हातात दिली, तेव्हा तो साळसूदपणे म्हणतो, "क्यौं ? वह नोट चलता नहीं ? अच्छा नया कोरा तो था."

"हां– लेकिन आज नहीं चलता. थोडे दिनों में चलेगा." पाहुणे आसुरी हास्य करीत उत्तरले, "एवढं काम तू फत्ते कर अन् मला सांगायला ये. तुला आणखी पाच रुपये देईन."

मैना हाऊसबोटीला जोडून एक डोंगी बांधलेली होती. तिच्या दोऱ्या अन्वरने सराईतपणे सोडल्या अन् होडीत उडी मारून सरसर वल्ही मारायला सुरुवात केली.

निघता निघता त्याने हलवलेला हात पाहुण्यांनी पाहिला

होता आणि त्यांची निरोपाची हाकही त्यांच्या कानांनी खुषीने ग्रहण केली होती. पण अन्वर त्या वेळी दातओठ खात होता आणि त्याने उच्चारलेले शब्द 'सलाम साब' नसून 'सलाम साँप!' असे होते हे त्या मानवी सर्पाला कळले नाही एवढे बरे झाले.

"काम हो गया!" पाहुण्याने हाऊसबोटीकडे वळत आनंदाची घोषणा केली. 'बहोत तेज लडका मिला फोटो पहुँचाने के लिये."

"कौन लडका?" तेवढ्यात माघारी आलेल्या गुलाम हुसेनने डोळे वटारीत विचारले, " आणि कसा गेला तो लेटर घेऊन? पैदल?"

"पैदल कशाला? तेरी डोंगी में." स्वत:शीच खुदूखुदू हसत पाहुणे म्हणाले.

"मेरी? मेरी डोंगी क्यों दे दी तुमने? तुला माहीत नाही–यहाँ के लडके कितने शैतान है!" इथे साहजिकच फास्टर फेणेची आकृती पुसटपणे त्याच्या डोळ्यांपुढून गेली. " कोण छोकरा? तुझ्या पहचानीतला तरी होता?"

"अरे छोड दो पहचानी! फिक्र मत करो. बहुत अच्छा, हुश्शार लडका था वह! पाकिस्तान से प्यार करनेवाला. अरे भाई, ऐसे कई लडके होंगे इस काश्मीर में जो आँखे मूँदकर सपने देख रहे हैं अपनी आजादी के."

"अरे, खड्डे में गयी तेरी पाक आजादी! यहाँ आजादी नहीं तो क्या है? तुला काय वाटतं, तुला इथं कुणी धूप घालणार आहे? पाकिस्तानमधली आजादी म्हणजे काय चीज आहे याची खबर आहे सगळ्यांना. म्हणे लडके सपने

वधत असतात !" शेवटचे वाक्य गुलाम हुसेनने चक्क वेडावून उच्चारले.

पाहूणे चरकले. त्यांना एक क्षणभरच अशी भीती वाटली की हा आपल्यावर उलटतो की काय ? पण नाही–तसं नाही. जरा दमबाजी केली की येईल ताळ्यावर.

"इतकी वखवख करतोस तर आम्हांला मिळालास तरी कशाला रे ?"

"पैशासाठी–दुसरं काही नाही. पैशासाठी हरामी केली मी. बोल, डोंगी दिली त्या काटर्‍याला ?"

आता पाहुण्यांना वाटले, हा आपल्यावर हात टाकतो की काय ? एक पाऊल मागे हटून त्याने आपल्या हातातली दुर्बीण त्याच्याजवळ दिली अन् घाईघाईने म्हटले, 'तू ही देख अपनी आँखों से इतका दूर गेलाय तो पोऱ्या, की आता वखवख करण्यात नाही. त्याला करू दे आपलं काम. मग तू माझा इन्साफ कर."

मैना बोटीच्या मालकाने दुर्बीण जवळजवळ हिसकावलीच होती. आता त्याने ती डोळ्यांना लावली. पाच सहा सेकंदात त्याच्या तोंडून 'माशाल्ला !' असा उद्गार निघाला.

"क्या हुवा ?"

"क्या हुवा पूछते हो ? आस्मान गिरा आस्मान ! वह लडका कौन है मालूम है तुझे !"

"कौन ?"

"शमसुद्दिन का लडका अन्वर. पक्के नॅशनलिस्ट लोग! तुम्हारे पाकवालों के सौ टक्के दुश्मन !"

"क्या कहते हो ?" पाहुण्यांची आता एकच तिरपीट

उडाली. "चल–जलदी कर. अपना शिकारा निकाल! उसका पीछा करेंगे."

"शिकारा ?" गुलाम हुसेनला घाम फुटला. "डोंगी हार बैठें–अब शिकारा ?"

"हां हां! तू पैसे की फिक्र मत कर. उस शैतान लडके का नतीजा अभी के अभी करना चाहिये."

गुलाम हुसेनला अधिक घुटमळणे शक्य नव्हते. डोंगी जोवर त्या पोराच्या हातात होती तोवर गुलाम हुसेनला खतरा होता. त्याचा पाठलाग करण्यासाठी शिकारा बाहेर काढणे आता भागच होते. भाग्याची गोष्ट ही की, गुलामने नुकतेच आपल्या शिकाऱ्यात एंजिन बसवून घेतले होते. त्यामुळे शिकारा खूप वेगात जाऊन डोंगीला सहज गाठू शकला असता.

"चलो ! लेकिन पहले हाऊसबोट को ताला लगायेंगे."

पण इतका वेळ फास्टर फेणे काय करीत होता ? मैना हाऊसबोट बराच वेळ रिकामी होती याचा भरपूर फायदा त्याने उठवला. गुलाम हुसेनला आपला संशय आला आहे असे लक्षात येताच शिकारीत गुंतल्याचे दाखवून तो मुद्दाम त्याच्याच दिशेने निघाला. गुलाम त्याच्याकडे रोखून बघत होता. पण मग जेव्हा त्याने धनुष्य ताणून एक तीर सोडला अन् पाठोपाठ लगेच पाखरू पडले का हे पाहण्यासाठी जेव्हा रानात मुसंडी मारली, तेव्हा गुलामला त्याच्याबद्दल वाटणारे आकर्षण अकस्मात् विरले आणि तो किनाऱ्यावरून चालत पुढे गेला. याच वेळी आनंदाच्या घोषणा करीत

पाहुण्याची स्वारी परत येत होती. त्यानंतर दोघांचे जे संभाषण झाले ते आपण ऐकलेच आहे.

फास्टर फेणेनेही ते ऐकले, पण चुटपुटते. कारण तो दुसऱ्याच कामात गुंतलेला होता. हाऊसबोटीच्या उघडचा दारातून तो आत घुसला होता. आतल्या कपाटात तऱ्हेतऱ्हेची शस्त्रे मांडून ठेवलेली त्याने पूर्वीच पाहिलेली होती. आता त्या शस्त्रांची त्याने झटपट पाहणी केली. एक दोन हातबाँब उचलून त्याने पँटीच्या खिशात कोंबले अन् तो निघाला. पण तेवढचात पाहुणे नि गुलाम बोलत बोलत हाऊसबोटीच्या दाराशी आल्याचे त्याला कळले. तत्क्षणी दाराऐवजी तो खिडकीकडे धावला अन् खिडकीतून वेंघून त्याने बाहेर उडी टाकली तेवढचात पाहुण्यांनी उच्चारलेले एक जळजळीत वाक्य त्याच्या कानात घुसले—

"ताला जरूर लगायेंगे— लेकिन पहले एक दो रिव्हॉल्वर तो लेनी होगी."

बन्या अधिक ऐकायला थांबला नाही. तो धावला. बाँबमुळे पँट जड झाली होती, तरी तो तसाच तलावाच्या काठाकाठाने धावला. त्याच्या वाळकुडचा तंगडचा दुखेपर्यंत तो सारखा धावतच होता .. फास्ट—— फास्टर—— फास्टेस्ट !

त्याला धावणे भागच होते. कारण शिकारा केव्हा येऊन डोंगीला गाठील याचा नेम नव्हता. डोंगी खूपच पुढे गेली होती. बराच वेळ धावल्यानंतर बन्याला ती दिसू लागली. तरी पण फर्लांगभर अंतरावर असेल आणि मागे तो शिकारा निघालाही असेल.

हो– निघालाच. तो पाहा. फर्रर्र– क्षणाक्षणाला आवाज मोठा होत चालला होता. शिकारा जवळ जवळ येत होता.

बन्याने खूप जोरात बोंब मारली–

" अन्वऽऽर ! "

पण या फरफराटात अन्वरला कुठची ती हाक ऐकू जायला ? तो आपला वल्हे मारीतच होता.

दरम्यान शिकारा जवळ आला. घामाघूम झालेला बन्या थबकून उभा राहिला. त्याने पाहिले तर शिकारा डोंगीला गाठण्याच्या बेतात आहे.

बन्याचा हात आपसूक खिशाकडे गेला. हातबाँब त्याने बाहेर काढला. पण तो फेकण्यापूर्वीच त्याचाहात थबकला· झुरळे मारावीत तशी माणसे मारलेली त्याने रणांगणावर पाहिली होती. पण चालू घटकेला तरी हे युद्ध नव्हते. एखाद्यावर गोळी झाडणे, बाँब टाकणे हे कृत्य सात्त्विक माणसाच्या हातून सहजासहजी घडत नाही. त्याचे हात आपोआप लटपटतात. बन्याचेही तसेच झाले. बाँब फेकायला हात धजेना. तो हातबाँब हातात घट्ट आवळून तो नुसताच पाहात उभा राहिला.

आणि मग तो एकदम चपापला. डोंगी जवळ येताच शिकाऱ्यातले प्रवासी आतल्या फळकुटांवर पालथे पडले होते आणि शिकाऱ्याच्या नक्षीदार कठड्यातून दोन पिस्तुले बाहेर डोकावत होती.

" ट्टॉक् ! "

त्या ' ट्रॉक ' च्या मागोमाग एक बारीकसे ' फट्ट ' झाले अन् पिस्तुलातून गोळी सुटली. ती डोंगीवर आपटली. लगोलग दुसरी गोळी सुटली ती डोंगीतल्या वल्ह्यावर आपटली. अन्वरच्या तोंडून एक अस्फुट किंकाळी बाहेर पडली. वल्हे उडाले, हात झिणझिणला. अन्वर उठून ताठ उभा राहिला. क्षणभरच त्याने शिकाऱ्याकडे पाहिले असेल. ताठ उभे राहणे म्हणजे पिस्तुलाला सहज बळी जाणे होते. तो खाली वाकला अन् डोंगीच्या काठावरून त्याने अंग झोकून दिले.

पाणी सरसर सरसर कापले जाऊ लागले, मागून सटासट गोळ्यांचा मारा सुरू झाला. पिस्तुले पाण्यातूनही त्याचा पाठलाग करीत होती.

आवंढा गिळून बऱ्या उर्फ फास्टर फेणे हे दृश्य पाहात होता. त्याला त्वेषाची उबळ आली. मृत्यू आपल्या मित्राला कवटाळू पाहात असताना त्याला स्वस्थ बसणे शक्य नव्हते. क्षणाचाही विलंब न लावता त्याने हातातला बाँब शिकाऱ्याच्या मागल्या भागावर भिरकावला.

शक्य तो प्राणहानी होऊ नये, फक्त शिकारा फुटावा अशी बन्याची इच्छा होती, ती सफल झाली. दुसऱ्याच क्षणी ' धुडुम् ' असा भला मोठा स्फोट होऊन शिकाऱ्याच्या ठिकऱ्या चौफेर उडाल्या. मागचा भाग कलंडून पुढचा वर उचलला गेला. पाण्याचे प्रचंड कारंजे उसळले. त्या कारंज्याबरोबरच जणू दोघेही प्रवासी वर फेकले गेले अन् मग धाडदिशी पाण्यावर आपटले.

बन्याने एवढच पाहिले, की दोघेही सुरक्षित आहेत.



त्यांना कोणतीही इजा झालेली नाही, तें घाबरेघुबरे झाले असतील, आरडाओरडाही करतील. करू देत. आपल्या हातून हत्या घडली नाही ना ? पुष्कळ झाले !

बन्याने त्यांच्याकडे पाठ वळवली आणि तो सफाईने हात मारीत किनाऱ्याकडे पोहत येणाऱ्या अन्वरकडे पाहू लागला. अन्वरचे हात मारणे एकाएकी मंद बनले. त्याला बहुधा जखम झालेली असावी. नाही तर तो इतक्यात दमला नसता.

फास्टर फेणेने पहिले अंतर अजून बरेच आहे. त्याने अंगातला सदरा काढून टाकला अन् तो पाण्यात उतरला. भराभर पोहत जाऊन त्याने आपल्या मित्राला गाठले आणि त्याच्या हाताखाली हात घातला.

'तू तो हात मार–मी हा मारतो. जोडीनं पोहू या.' बन्या म्हणाला.

अन्वरचे डबडबलेले डोळे त्याच्याकडे पाहत हसले. श्रम-विभागणी झाली. आणखी दोनच मिनिटांत दोघांनी किनारा गाठला.

५. थोडी मिठाई–थोडी पिटाई.

'तुला लागलं का रे अन्वर ?'

'नो सर. तुमने कमाल की फास्टर फेणे !'

'छोड दो !' असे म्हणत बन्याने आपले चिंब झालेलें कपडे अंगावरच पिळले.

'च्यॅः !' तो वैतागाने म्हणाला, 'ही पंचाईत आली. ओल्या कपड्यांनी का चौकीवर जायचं ? आणि आदम-पुरा तसा जवळही नाही म्हणतोस'

'मला एक आयडिया सुचलीय.' अन्वर म्हणाला, 'त्या समोरच्या हाऊसबोटीत माझा एक दोस्त राहतो. त्याच्या-कडे कोरडे कपडे मिळतात का पाहू या.'

फास्टर फेणेने एक धावती नजर त्या हाऊसबोटीकडे फेकली अन् पुन्हा मागे वळून पाहिले.

शिकाऱ्याचा सत्यनाश झाल्यावर नदीत फेकले गेलेले त्यांचे शत्रू झपाट्याने हात मारीत किनाऱ्याकडे येत होते. त्यांच्याशी मारामारीचा प्रसंग येण्यापूर्वीच तिथून पळ काढण्याची जरुरी होती.

'चल!' तो म्हणाला आणि ते दोघेही हाऊसबोटीकडे पळाले.

सुदैवाने अन्वरचा मित्र घरीच होता. त्याने कोरडे कपडेही तावडतोब दिले. पण ते होते त्याचे स्वत:चे आणि तो होता एक रोडका पोर. त्याची एक सदरा–पँट बन्याच्या अंगात फिट्ट बसली पण अन्वर अंमळ जाडजूड शरीराचा. त्याच्या अगात हे कपडे शिरणेच शक्य नव्हते.

'तुझ्या बाबांचे नाहीत ?' अन्वरने घाईघाईने विचारले. 'ते होतील मला.'

'बाबा के कपडे मैं नहीं दूँगा. तो रागावेल.'

'उडत गेलास ! मग काय कारायचं बन्या आता ?'

'काही नाही शिप्यानं हे कपडे मुळी माझ्यासाठीच शिवलेले आहेत.' खुशीत आलेला बन्या कॉलर ताठ करीत म्हाणाला. 'तेव्हा तुझं काम आता मीच करतो. तो फोटो आण इकडे. आदमपुऱ्याला मीच जातो.'

फास्टर फेणेचे म्हणणे विलकुल चुकीचे नव्हते. त्याला मिळालेला सदरा त्याच्या मापाचा तर होताच, पण त्याचे डिझाइनसुद्धा बन्याच्या आवडीचे होते-चौकड्या चौकड्यांचे.

'माझ्याऐवजी तूच थांब आता इथं–ओल्या कपड्यां-

निशी ' त्याने अन्वरला सांगितले आणि फोटोंचे ओले पाकीट सदऱ्याच्या टोकाने पुसून आपल्या खिशात ठेवले. " मला कसं जायचं ते सांग थोडक्यात. "

अन्वर त्याला पत्ता समजावून सांगत असता बन्याचे लक्ष सारखे खिडकीबाहेर लागले होते. " आपले दुष्मन किनाऱ्याला लागले. तू आता इथंच लपून बसतोस का ? "

' मुळीच नाही ! " अन्वर म्हणाला, " उलट मी आता लोक जमा करतो, त्यांना यांच्या कारवाया समजावून देतो आणि चांगलं कांडात काढतो त्या बदमाषांचं ! "

" काय वाटेल ते कर–पण संभाळून राहा! " असे म्हणून फास्टर फणे बोटीबाहेर सटकला आणि अन्वरने दाखवून दिलेल्या वाटेवरून पळत सुटला.

लवकरच किनाऱ्याची झाडी पार करून तो एका लहानशा रस्त्याला लागला. अन्वरने सांगितल्याप्रमाणे तो उजवीकडे वळला. रस्त्यावरून फर्लांगभर पळून झाल्यावर पुन्हा त्याला झेलम नदीचे वळण घेऊन आलेले पात्र लागले. नदीच्या पलीकडे घरांची अंमळ दाटी दिसत होती. तिकडेच कुठेतरी आदमपुरा होता. पण आता नदी ओलांडण्यासाठी पोहण्याची जरुरी नव्हती. कारण ही सडक पक्क्या पुलावरून पलीकडे गेली होती. बन्या ऊर्फ फास्टर फेणे पळत राहिला, थंडी चांगली पडली असूनही त्याच्या अंगातून आता घामाच्या धारा वाहत होत्या. पूल ओलांडून जवळजवळ अर्धा मैल धावल्यावर तो धापा टाकीत उभा राहिला. या ठिकाणी रस्त्याला दोन फाटे फुटले होते. त्यांतल्या कुठच्या वाटेने जायचे हे त्याच्या ध्यानात येईना. इथे माणसांचा

बराच वावर होता. त्यातच इस्तरीच्या कपड्यांतला एक मनुष्य समोरून जात असलेला त्याला दिसला. त्यालाच विचारावे असे ठरवून बन्याने हाक मारली.

" मिस्टर ! आदमपुरा पोलिस चौकी–"

बन्या बोलत बोलता थबकला. त्या माणसाने थांबून मागे पाहिले होते आणि त्याचा चेहरा पाहताक्षणी बन्या चमकला होता.

" क्यों ! क्या हो गया ? किधर जाना है तुम्हे ? "

त्याच्या प्रश्नांकडे बन्याचे आता लक्ष नव्हते. त्याने खिशातून तो लिफाफा लगबगीने काढला होता अन् डोळे बटारून एकदा त्या फोटोकडे नि एकदा त्या माणसाच्या चेहऱ्याकडे पाहिले होते.

शंकाच नको ! एकदम सेम !

तोच उभट तरतरीत चेहरा, तशीच मिशी, तसेच किर-कोळ टक्कल, तसेच पाणीदार भेदक डोळे.

बन्याने एकदम पुढे होऊन त्या तरुणाचा बाहू पकडला आणि इकडे तिकडे पाहात त्याला हलक्या आवाजात म्हटले, " साहेब आपण आपका जी खातीर में है. "

" जी ? "

" माझं ऐका साहेब तुम्ही. आपले प्राण खरोखरच भयंकर संकटात आहेत. "

" हूँ !" तो गृहस्थ आता हनुवटीवरून हात फिरवीत रोखलेल्या मिस्किल नजरेने या आगाऊ मुलाकडे पाहात होता. बन्याच्या लक्षात आले की याचा आपल्यावर विश्वास बसत नाही. आपण काहीतरी ' मिश्चीफ ' करीत आहोत

अशी त्याची समजूत झालेली असावी. पण मग बन्याच्या हातातला फोटो त्याने पाहिले वन् आश्चर्याने विचारले, "यह कैसा मिला तुम्हे ?"

"सांगतो–" असे म्हणून बन्याने भराभर, शक्य तेवढ्या थोड्या शब्दांत त्या तरुणाला एकंदर हकीकत सांगितली. ती ऐकल्यावर मात्र त्याचा नूर एकदम बदलला. त्याने भुवई आक्रसून बन्याकडे पाहिले.

"बराच हुशार लडका दिसतोस तू. तुझं नाव ?"

"वनेश ऊर्फ फास्टर फेणे."

बॉवगोळ्यासारखे ते नाव बन्याने त्याच्या कानांवर फेकले, पण त्याचा परिणाम पाहण्यासाठी तो थांबला नाही. घाईघाईने तो पुढे म्हणाला, "आपका फोटो लीजिये. और अब क्या करना है बोलियें. में आपके साथ हूँ."

त्याच्या या ऐटबाज आश्वासनाचे त्या तरुणाने हसून पाठ थोपटीत स्वागत केले. "थॅंक यू !" तो म्हणाला ,' मेरा नाम डिटेक्टिव्ह मन्सूर है," आणि मग काही क्षण स्वतःशीच विचार केल्यानंतर त्याने सांगितले, "नाऊ फॉर अवर प्लॅन ! असं करू या. मी तुझा काका आहे असं समज. तू माझा मुंबईचा पुतण्या माझ्याकडे आलेला आहेस. चल, त्या गल्लीत ' शहा स्वीट मार्ट ' पाटी दिसते ना, तिथं जाऊ या. तुझे मिठाई खिलाऊंगा."

"ट्रॉक् !" फास्टर फेणे उद्गारला, "आय मीन थॅंक यू ! मेरे पेट में कव्वे काव काव कर रहे हैं !"

डिटेक्टिव्ह मन्सूरने हसून त्याचा हात धरला आणि त्याला मिठाईच्या दुकानात नेले. तिथे पोचण्यापूर्वी एक

गोष्ट बन्याच्या ध्यानात आली होती, ती म्हणजे मन्सूर येत असलेला पाहताच दुकानदार जरा सावरून बसला होता. मग त्याने आपल्या दुकानातून एकदा चौफेर नजर फिरवली होती. अन् खुणेने कुणाला तरी काहीतरी सांगितले होते.

'आपल्या स्वागताची तयारी होत असावी.' मन्सूर बन्याकडे पाहात डोळे मिचकावीत म्हणाला. 'हा शहा मला चांगला ओळखतो—आणि मी त्याला'

'आइये—आइये साब!' दुकानदार अदबीने म्हणाला. 'क्या फर्माइश है? कुछ मंगाऊ—लस्सी, मसाला दूध?'

'कुछ नही चाहिये' मन्सूर म्हणाला. 'सहज आलो होतो आमच्या या पुतण्याला घेऊन. मुंबईला असतो. त्याला काश्मीर दाखवतोय. आज अवंतीपूरला नेईन म्हणतो.'

'अवंतीपूर तो बहुत अच्छी प्लेस है—और आज मोसम भी अच्छा है. जरूर जाइये! अरे, साहेब के लिये सफरचंद का हलवा लाना दो किलो. ताजा आहे बरं का छोटे दोस्त.?'

'ठीक आहे. द्या सफरचंदचा हलवा, पण दोन किलो नको. अर्धा किलो बस्स झाला.'

'अरे साव, एक किलो आपका और एक किलो मेरी ओर से प्रेझेंट—मेरे बंबईवाले दोस्त के लिये!'

'नही—प्रेझेंटबिझेंट नको.' मन्सूरचा आवाज एकदम कठोर बनला होता.

'अच्छा. जैसी आपकी मर्जी साव! एक तो एकही किलो' असे म्हणून शेटजी दुसऱ्या गिऱ्हाइकाकडे वळले.

हे गिऱ्हाईक फाटक्या, मळक्या कपड्यांतले होते आणि

त्याला मिठाई नको होती. मिठाई घेण्याइतके पैसेही त्याच्या-जवळ नसणार. त्याला हवी होती नोकरी—काहीतरी रोजगार.

'नया ब्रिज मालूम है ? उधर बांधकाम चालू है उधर जाना. कुछ काम मिलेगा ' बोलता बोलता शेटजी थांबले. काही क्षणच त्यांनी त्या माणसाकडे रोखून पाहिले असावे. त्यांची काही नेत्रपल्लवी झाली की काय नकळे पण उभ्या असलेल्या बन्याला तरी तसा भास झाला.

मग शेटजी म्हणाले, ' अरे भैया, तू भूकेला दिसतोस. आत जा तुला आमचा माणूस काहीतरी खायाला देईन. '

आणि त्यानंतर अशीच तीन-चार माणसे आली. त्यांनाही काम हवे होते. शेटजींना त्यांनाही पुलाचीच वाट दाखवली आणि काहीतरी ' च्याऊ-म्याऊ ' करण्यासाठी म्हणून आत पाठवले, ' देख भाई—शेटजी कितने उदार है ! ' कुणीतरी बोलले.

फास्टर फेणेची ही टेहळणी चालू असता मन्सूर बाजूला उभा राहून कुणाशी तरी गप्पा मारीत होता. पण त्याचीही चलाख नजर चौफेर फिरत होती.

' शेटजी, मी जरा फोन करू ? ' मध्येच त्याने दुकान-दाराला विचारले.

' जरूर, जरूर ! ' शेटजी आपल्या नेहमीच्या धूर्त लाचारीने म्हणाले, ' अरी साब, यह दुकानही आपकी है—फोन की क्या बात ? '

मन्सूरने फोन उचलला आणि बातचीत केली. शेटजींचा गिऱ्हाईकाशी व्यवहार चालूच होता, पण त्यांचे तरबेज कान

एकीकडे मन्सूरचे बोलणे ऐकत होते.

'हां–आता मी बोलतोय शहाच्या दुकानातून हो, हो इथंच. बालूशाई ? अबाउट ..टू डझन ? व्हेरी गुड ! मी चाललोय बनेशला घेऊन अवंतीपूरला येस् अवंतीपूर. ग्रेट प्लेस ! '

मन्सूरने फोन खाली ठेवून शेटजींना म्हटले, 'दोन डझन बालूशाई पण घ्यायला सांगितलीय आमच्या घरनं.'

'जरूर, जरूर ! '

लवकरच मिठाईच्या पुड्या बांधून झाल्या. मन्सूरने त्या घेतल्या, पैसे चुकते केले आणि शेटजींचे फार फार आभार मानून त्यांच्या वायफळ वडबडीकडे हसून दुर्लक्ष करीत तो बन्याला घेऊन बाहेर पडला.

'चल लवकर.' बन्याचा हात धरून तो लगबगीने निघाला. रस्त्याच्या कोपऱ्यावर जाताच नाक्यावरच्या हवालदाराला त्याने हाक मारली. तो येऊन सलाम करून उभा राहिला. फास्टर फेणे हे सर्व आश्चर्याने पाहात होता. त्याने आता हळूच विचारले, 'काहीतरी काळंबेरं आहे तिथे ? '

'निश्चित. आता कळेलच. हे शहाचं दुकान फार दिवस आमच्या ब्लॅकलिस्टवर आहे. तिथे काही ना काही राष्ट्र-द्रोही कारवाया चालू असतात अशी आम्हाला शंका आहे.'

'आतापर्यंत जवळजवळ सात बेकार लोकांना त्याने नव्या पुलाकडे धाडलं.'

'ते ठीक आहे म्हणा, नवा पूल बांधण्याचं काम चालू

आहेच, पण मला शंका आहे ती यांच्या माणसाबद्दल. यातले सारेच नग स्थानिक वाटत नाहीत. '

'परगावचे असतील. सर्वांना आत धाडलंन् त्याने काही-तरी खायला.' कुणीतरी बोलत होतं–'भलता उदार आहे हा शेटजी ! '

' बोडक्याचा उदार ! ' मन्सूर म्हणाला, ' पक्का चिकट आहे म्हणूनच मला जास्त शंका आली. '

एव्हाना हवालदार येऊन सलाम करून उभा राहिला होता. इतक्यात मघाच्या त्या बेकार इसमांतले तिघेजण दुकानाबाहेर पडताना दिसले. प्रत्येकाच्या हातात छोटी पिशवी होती.

मन्सूरने हवालदाराला खूण केली. ते तिघे जवळ येताच हवालदाराने त्यांना हटकले.

क्या है थैली में ? '

ते इसम गांगरले. चाचरत चाचरत एकाने उत्तर दिले, ' ख–ख–खाने की चीज साब! '

' खाने की ? ' हवालदाराने एकदम पिशवीत हात घातला अन एक पुरचुंडी बाहेर काढली.

' क्या है इसमें ? ' म्हणत त्याने पुडी उघडली. ' सब्जी का मसाला तो नही ? '

हवालदाराने हे विचारताना मन्सूरसाहेबांकडे पाहात डोळे मिचकावले होते.

तो कसला मसाला होता हे सांगायला कुणी तज्ज्ञ नको होता. ती होती सुरुंगाची दारू. हवालदाराने आता त्या इसमाच्या एक श्रीमुखात भडकावली.

'गिरफदार करना इनको!' डिटेक्टिव्ह मन्सूर म्हणाला. 'आणि हवालदार, ते दोघे कॉन्स्टेबल येताहेत त्यांनाही बोलावून घ्या आणि इथे आडोशाला उभे राहा. दुकानाबाहेर पडणाऱ्या प्रत्येक संशयित इसमाला अटक करा. दंडा वापरा. हातकड्या घाला. काहीही. मी मघाशी शहाच्या दुकानावर रेड घालायला सांगितलंच आहे. अर्ध्या तासात आपली गाडी येईल. दरम्यान मला नव्या पुलाकडे पळणं भाग आहे– ओ के. ?'

हवालदाराने सलाम केला आणि मन्सूरसाहेब फास्टर फेणेचा हात धरून मोठ्या रस्त्याने तडक पुलाकडे निघाले.

बुचकळ्यात पडलेला फास्टर फेणे म्हणाला, 'दुकानावर छापा घालायला कधी सांगितलं तुम्ही ?'

'मघाशी फोन नाही का केला ?'

'फोन ? मान्सूरच्याच फोनवर... '

'अरे, सांकेतिक फोन होता. तो अवंतीपूर हे आमच्या भाषेत नव्या पुलाचं नाव आहे. दोन डझन बालुशाईज आर अँन् ईक्वल नंबर ऑफ पुलिसमेन. पण चल वुई मस्ट बी क्विक.'

हे ऐकून फास्टर फेणे जितका चकित तितकाच प्रसन्न झाला होता. पण जास्त काही बोलायला आता वेळ होता कुठे ? मन्सूरचाचाने त्याचा हात धरून त्याला जवळजवळ ओढत चालवले होते; आणि त्यामुळे धावण्याबद्दल प्रसिध्द असलेल्या फास्टर फेणेचीसुध्दा तिरपीट उडाली होती.

पण सकाळपासून बन्याच्या तंगड्यांना केवढा ताण पडला होता. हे ध्यानात घेतलेत तर तुम्ही त्याची या फजितीबद्दल चेष्टा करणार नाही.

□

# ६. पत्ता लागला

झेलम नदीत बाँबविक्रम करण्यापूर्वी बन्याने धनुष्यातून एक बाण धाडला होता, हे तुम्हाला आठवत असेलच. फास्टर फेणेचे शरसंधान चुकीचे ठरले नाही. बाण नेमका त्याच्या हाऊसबोटीत जाऊन आदळला.

' टक्क ! '

' कसला आवाज झाला ?' मामी जरा चपापून म्हणाल्या.

' बन्याच्या ' ट्रॉक ' सारखा ? बन्या तर गेलाय मैल-भर दूर.'

' सुतार पक्षी ग ! आपल्या बोटीची दुरुस्ती करतोय !' मामांनी डोळ्यापुढचा पेपर बाजूला सारीत विनोद केला.

' अन मघाशी धुडूम आवाज कशाचा झाला? तो कोणत्या पक्ष्यानं केला ?'

' तो सैनिक पक्ष्याने किंवा हेर पक्षाने असेल– किंवा आपल्या पाखरानंही असेल कदाचित ! हा फा. फे. पक्षी केव्हा कसला आवाज काढील, सांगवत नाही.'

मामा बसल्या बसल्या हे तारे तोडीत होते. मामींनीही अधिक लक्ष दिले नाही. त्या आंघोळीला निघून गेल्या. मग त्यांनी जवळ जवळ दोन तास कादंबरीवाचनात घालवले. कंटाळा आल्यावर त्यांनी पुस्तक खाली ठेवले आणि त्या

बाहेरच्या खोलीत गेल्या, तेव्हा कुठे मघाच्या त्या 'टक्क' चे कोडे त्यांना उलगडले.

तिथल्या मेजात रुतून बसलेला तो बाण त्यांनी आता आत उचलून आणला.आणि त्या म्हणाल्या 'हा नक्कीच अन्वरच्या धनुष्याचा बाण आहे. कुठून मारलान् काटर्यानं, देव जाणे!'

'त्याने नाही, आपल्याच काटर्याने मारला असणार.' मामा म्हणाले, 'ही पोरं बाहेर पडली तेव्हा एअर-गन नि धनुष्यांची अदलाबदल झालेली मी पाहिली होती . ओ गॉड! चिठ्ठी!'

मामींनी बाण आपल्या डोळ्यांपुढे धरला आहे. तो त्याच्या टोकालाटा चलेली चिठ्ठी दाखविण्यासाठी, हे आता त्यांच्या लक्षात आले. लगेच त्यांनी ती ओढून काढली अन् घाईघाईने वाचून ते उद्गारले-

'ट्रबल!'

'काय?'

'अग, जिथे बन्या तिथे ट्रबल हे ठरलेलंच असतं. यावेळचं संकट मात्र जास्त गंभीर वाटतंय मला. कारण यात माली अडकलीय. अॅक्च्युअली अडकलीय!' हे बोलत असताना मामांनी भर्रकन् अंगात कोट चढवला होता आणि आता ते पायांत चढाव घालीत होते.

'झालं तरी काय?' मामी घाबरून म्हणाल्या.

'पाकिस्तानी हेरांशी- म्हणजे ते हेर आहेत असं हा म्हणतो- या पोरांचा सामना चालू आहे. दरम्यान मालीला म्हणे त्या गुंडांनी कुठच्या तरी खोपटात कोंडून ठेवलंय.'

मामींची गाळण उडाली. 'काय सांगता तरी ? अन् तुम्ही कुठे निघालात ?'

'पोरीच्या शोधाला . . अन् पोलिसात पण वर्दी देतो.'

'मी स्वस्थ बसू होय ? माझा जीव अर्धा झालाय आत्ताच! देवा नारायणा ! दोन तास झाले तो टक्क आवाज होऊन अन् मी आपली कादंबरी वाचीत बसले!'

पायांतल्या चपला चटचटावीत मामी केव्हाच मामांच्या मागे धावल्या होत्या. घाईगर्दीत एक महत्त्वाची गोष्ट त्या विसरल्या होत्या. आता पुन्हा मधल्या खोलीत धाव मारून त्यांनी कुलूप-किल्ली आणली. हाऊसबोटीचे दार खाडकन् बंद करून त्याला कुलूप ठोकून, त्या मामांच्या मागे निघाल्या, तेव्हा त्यांचे डोळे पाणावले होते. अन् मनोमन त्यांनी देवीचा धावा चालवला होता.

माली चित्रे काढायला जिथे बसली होती त्या जागेची खूण बन्याने चिठ्ठीत लिहिली होती. तिथे लवकरच दोघे जाऊन पोचली. तिथून जवळपास कुठेतरी एखादे घर, झोपडे आहे का म्हणून त्यांनी पाहणी सुरू केली.

' बाई ग ! केवढालं गवत वाढलंय !' मामी उद्गारल्या.

'संभाळून चाल हो– इथे सापबीपसुद्धा असायचे.' मामा म्हणाले.

होता होता अंमळ मोठी झाडे त्यांना लागली. फुला-फळांनी डवरलेली झाडे. त्या झाडीतून पानापाचोळ्यातून आसपास नजर फेकीत दोघे भराभरा चालली होती.

'ते पहा खोपट दिसतंय.'



' पडकं, निर्जन झोपडं आणि त्याला कुलूप लावलेलं.' मामा त्या बंद दरवाजाजवळ जाऊन चाहूल घेऊ लागले. मामी तशाच खोपटाला वळसा घालून मागच्या बाजूस गेल्या. . .

आणि पंधरावीस पावले गेल्या नाहीत तोच थबकल्या, विस्फारलेल्या डोळ्यांनी त्या समोर पाहू लागल्या तोंडातून शब्द निघेना. घशात काहीतरी अडकल्यासारखे त्यांना वाटले. मग अर्धस्फुट स्वरात त्या ओरडल्या, 'माले !'

होय, ती मालीच होती. किंवा मालीचे गुटुंगळे लडबडत पाचोळ्यात येऊन पडले होते म्हणा.

'काय ग माले ?' मामी लगबगीने येऊन उद्गारल्या आणि मालीने म्लान हास्य करीत आईकडे पाहिले.

आपले हातपाय दोरीने बांधलेले आहेत इकडे तिने डोळ्याच्या खुणने आईचे लक्ष वेधले. त्याबरोबर एक आश्चर्योद्गार काढून ती खाली वाकली. अन् मग तिथेच फतकल मारून पोरीच्या काढण्या सोडायला तिने सुरुवात केली.

तेवढ्यात ही गडवड मामांच्या कानांवर पोचली होती. आणि तेही धावत तिथें आले होते.

' हा काय प्रकार आहे, माले?' मामांनी कळवळलेल्या आवाजात विचारले.

मालोने त्यांना सर्व काही हकीकत सांगितली.

' तो नक्कीच हेरबीर असावा. पाक हेर पॅराशूटने उतरलेत ही पेपरमधली बातमी खरी असली पाहिजे. मला झाडावर सापडलेलं फडकं पॅराशूटचंच होतं. मला शंका आलीय

अशी त्या माणसाला शंका आल्याबरोबर त्याने माझी गठडी वळली.'

'पण– पण तू ते स्केच काढलंस ते कुणाच्या फोटोचं?' मामींनी विचारले.

'ते मला तरी काय माहीत ? त्याने रिक्वेस्ट केली अन् मी काढलं. पण आई–बाबा, तुम्ही कसे आलात इकडे ?'

मामांनी तिला बन्याच्या चिठ्ठीबद्दल सांगितले. ते म्हणाले, 'चिठ्ठीत मैना हाऊसबोटीचे नाव आहे, पाहू या मैना कुठे दिसते का ते. नाहीतर शेवटी पोलिस ठाणं आहेच.'

एव्हाना माली मोकळी झाली होती. ती म्हणाली, 'बन्याने चिठ्ठी धाडलीन् ? ग्रेट आहे!. पण मला कोंडणारा तो बाबा असला वेंधळा.. पुढच्या दाराला मारे कुलूपबिलूप लावलं अन् मागच्या दाराकडे पाहचलंसुध्दा नाही. ते नुसतं लोटलेलं होतं. मी कोपरांनी जमिनीला ढोशीत लटकत लटकत दाराकडे गेले. वेळ लागला बराच, पण शेवटी बाहेर पडले गडगडत!'

'तूही ग्रेट आहेस !' मामा म्हणाले,

मामींनी म्हटले, 'पण बन्या-अन्वर कुठं असतील आता ?'

'ते मी तरी कसं सांगणार ? मला असं वाटतं आई, आतापर्यंत बन्याने हेरांना पकडलं असणार !'

बंधुराजाबद्दल मालीला वाटणारा भोळा विश्वास पाहून मामांना तशाही स्थितीत हसू आले. मग ते एकदम म्हणाले, 'चला, आता वेळ घालवून उपयोग नाही. सगळे जाऊ या!'

'अहो, पण या पोरीला काही चहाबिहा नको का द्यायला

आधी? . . - माले, तू जातेस का घरी ? ही घे चावी !'

'नको, मी पण येणार आहे तुमच्याबरोबर !' माली ताडकन् म्हणाली. 'चला, बन्या-अन्वर कसकसे गेले होते ते दाखवते मी तुम्हाला.'

नदीच्या काठाकाठानेच ती मित्रांची जोडगोळी गेली होती. त्यामुळे खरे तर वाट दाखवायची गरजच नव्हती. पण माली उड्या मारीत पुढे निघाली. बन्या–अन्वर संकटात असताना तिला स्वस्थ बसणे शक्य नव्हते.

पण पुष्कळ पुढे जाऊनही मैना बोटीचा त्यांना पत्ता लागला नाही.

बाँबस्फोट होऊन आता अडीच तास लोटले होते. गर्दी पांगलेली होती. आणि फास्टर फेंणे पोलिस ठाण्याकडे गेलेला होता हे आपल्याला माहीत आहेच. लोकांच्या प्रश्नांना उत्तरे देऊन झाल्यावर अन्वरही तिथून यापूर्वीच सटकला होता. या मंडळींना त्याने ओझरते पाहिले, पण ते नुसतेच तांबारलेल्या डोळ्यांनी. हेरांचा पाठलाग करण्याच्या नादात असल्यामुळे तो थांबला नाही हे आपण पाहिलेच आहे.

या मंडळींनीही आता त्वरेने पोलिस ठाणे गाठायचे ठरवले.

सुदैवाने त्यांना रस्ता गाठताक्षणी एक सायकल रिक्षा मिळाली. मामींनी घाईघाईने दोघींना आत कोंबले आणि आपणही आत चढता चढता ते गरजले, ' यहाँ से नजदीक का पुलिस स्टेशन मालुम है ? उधर चलो!'

हात पुरेसा ओला होत असेल तर नियमाविरुद्ध तीन

उतारू घ्यायला रिक्षावाल्याची हरकत नव्हती. पण जायचे कुठं, तर म्हणे पोलिस ठाण्यावर ! या अल्ला !

तरी पण त्याने धोका पत्करला अन बजावले, ' तीन सवारियोंका तीन रुपया पडेगा साहब! '

' हां हां जरा जल्दी करो साडेतीन देंगे? '

गुडघे जोर जोराने रेटीत अन घंटीची टिणटिण करीत त्याने रिक्षा पिटाळली. आणि वीस एक मिनिटांत त्यांना आदमपुरा पोलिस ठाण्याच्या जरा अलीकडे नेऊन उतरवले त्याचे भाडे चुकते करून लांब लांब टांगा टाकीत मामा पोलिस कचेरीकडे गेले.

दरावाज्यात जो हवालदार उभा होता त्याच्यापुढ् मालीने काढलेल्या स्केचची ती कार्बन कॉपी नाचवीत त्यांनी विचारले, ' दो लडके गायब हो गये हैं। गुंडांनी किंवा अ -पाक जासूदांनी त्यांना पळवलं असाव असा दाट संशय आहे.'

' क्या कह रहे हैं आप ? '

' हा पाहा त्यांतला एक हेर–' असे म्हणून मामांनी तो कागद हवालदाराच्या डोळ्यापुढे ताठ धरला.

हवालदारसाहेब चपापलेले दिसते.

' यह तस्वीर कहॉ मिली आपको ? '

' मी काढलंय ते स्केच– फोटो वरून ' माली एकदम म्हणाली, ' त्या बदमाष माणसानं मला काढायला लावलं अग मग कोंडून ठेवलंन दोऱ्या बांधून! '

हवालदारसाहेब खो खो हसले. ' यह छोकरी नाटक तो नहीं करती ? '

'खामोश !' आता मात्र मामासाहेब रागाने ओरडले– 'वह नाटक नहीं करती. तुम ही तमाशा कर रहे हो ! इथे आमच्या पोराचे प्राण धोक्यात आलेले आहेत अन् तुम्ही ही मस्करी करता ? बोल, तुझे ड्यूटी ऑफिसर कोण आहेत ?'

हवालदार चमकला अन हलक्या आवाजात म्हणाला, 'आप चले जाईए ! यहां अभी कोई अफसर नही है.'

पण त्याचे वाक्य पुरे होण्याच्या आतच आतून गर्जना झाली, 'क्या गडबड है याकूब ?'

ते कार्बन स्केच पाहून याकूब गांगारला होता, कारण ते कोणत्या फोटोवरून काढलेले आहे हे त्याच्या तेव्हाच लक्षात आले होते. तो फोटो पोलिस ठाण्यावरून हलवण्याचे कारस्थान त्यानेच पार पाडले होते. काम झाल्याबरोबर फोटो परत करा असेही त्याने आपल्या कटवाल्या दोस्तांना बजावले आणि अजून फोटो परत आला नाही म्हणून तो जळफळत होता. आता फोटोऐवजी हे स्केच आलेले पाहून आश्चर्याने नि भयाने स्वारी हबकली. या मंडळींना वाहे-रच्या बाहेर वाटेला लावण्याचा त्याचा बेत होता. त्यासाठी धाकदपटशाने जमले नाही तर बाबापुता करायचीही त्याची तयारी होती. पण आता साहेबांच्या गर्जनेने त्याचे पुरतेच तीन तेरा झाले. तो अक्षरश: थरथरा कापू लागला.

इन्स्पेक्टरसाहेब बाहेर येताक्षणी त्यांना हे विलक्षण दृश्य दिसले. साहेब उंचेपुरे होते. त्यांना भरदार मिशा होत्या. त्यांनी आश्चर्याने विचारले, 'क्या मामला हैं, कॉन्स्टेबल याकूब ?'

'कुछ नही– कुछ नही–' करीत हवालदार ते स्केच खिशात घालतो आहे तोच मामांनी ते त्याच्या हातातून हिसकावून घेतले.

'आँ ? यह तो डिटेक्टिव्ह मन्सूर ! काय भानगड आहे ही ?' ते भुवया उंचावून म्हणाले.

पुन्हा एकवार मालीच्या मदतीने मामांनी सर्व हकीकत सांगितली.

'या मुलीला स्केच काढायला सांगितलं ? कशासाठी ? कोण होते ते लोक ?'

'त्याचा तपास तुम्ही करायचा आहे.' मामा म्हणाले, 'आम्हाला काळजी लागली आहे ती आमच्या दोन मुलांची –म्हणजे आमचा भाचा नि त्याचा मित्र यांची.' आणि मामांनी दोन्ही मुलांचे तपशीलवार वर्णन त्यांच्याजवळ केले.

'ओः ! धिस इज व्हेरी सस्पीशियस ! आणि हवालदार, तू याचं बोलणं ऐकून न घेता यांना घालवून देत होतास ? बुद्दू कहीं का !'

इन्स्पेक्टरसाहेबांनी या मंडळींना आपल्या कचेरीत नेऊन बसायला खुर्च्या दिल्या. ते म्हणाले, 'हे स्केच ज्या गृहस्थाचं आहे ते एक हायली रिस्पेक्टेबल ऑफिसर आहेत ते आज एका गुप्त कामगिरीवर गेले आहेत. इतक्या गुप्त, की त्याची माहिती आम्हालासुद्धा नाही. पण वह रहने दो. हे स्केच ज्या फोटोवरून काढलंय तो फोटो पण तुम्हाला दाखवतो. तो या ड्रॉवरमध्ये असतो.' असे म्हणून त्यांनी चावी लावून टेबलाचा खण उघडला आणि हात घातला. 'अँ ?' फोटो सहज सापडेल अशी त्यांची कल्पना, पण

संबंध खण उपसूनही फोटो सापडला नाही. त्यांनी ताबडतोब घंटी वाजवली.

आत आलेला शिपाई याकूब नव्हता. साहेबांनी रागावून विचारले, 'याकूब किधर हैं ?'

'वह घर गया, साब ! कुछ मेसेज आया उसका.' शिपाई म्हणाला.

'घर गया, और मुझे बोला भी नही? यह पुलिस स्टेशन है या प्लेग्राऊंड ?'

थोडा वेळ ते स्तब्ध झाले. याकूबविषयी गेले कित्येक महिने ज्या अफवा ऐकल्या होत्या त्या खऱ्या तर नसतील अशी एक शंका त्यांच्या मनाला चाटून गेली. पण बाहेरच्या लोकाशी बोलताना आपण जपून वागलें पाहिजे असे लगेच मनात येऊन ते एवढेच म्हणाले, 'खैर ! देखा जाएगा.'

'मग– आमच्या मुलाचं काय ?' मामांनी विचारले.

'हां हां– हम तलाश जारी रखेंगे, मेरा नाम है इन्स्पेक्टर ओमप्रकाश, आप अपना अ‍ॅड्रेस रख दीजिए यहाँ' असे त्रस्त सुरात म्हणून त्यांनी एक नोटबुक त्यांच्या पुढ्यात सारले आणि दोन्ही हातांच्या तळव्यावर हनुवटी टकून ते मालीकडे पाहात राहिले.

त्यांच्या मनात आता अनेक शंका-कुशंका फिरू लागल्या होत्या. पाक हेरांबद्दलच्या बित्तंबातम्या सर्वांआधी अर्थात् त्यांना कळलेल्या होत्या. एक–दोन हेरांना गुप्त पोलिसांनी आधीच पकडले होते आणि संशयित ठिकाणावर नजर ठेवण्यासाठी काही निष्णात डिटेक्टिव्ह सकाळपासून गेले होते त्यातच डिटेक्टिव्ह मन्सूरही होता हेही त्यांना माहीत होते.

.. ही पोरगी सांगते त्याप्रमाणें तिला भेटलेला तो माणूसही हेरच असेल का ? त्याला मन्सूरची शिकार तर करायची नव्हती ? अन् तिचे ते दोघं दोस्त ! ...

ट्रिंग–ट्रिंग, ट्रिंग–ट्रिंग !

इन्स्पेक्टर ओमप्रकाशनी रिसीव्हर उचलला.काही मिनिटे ते आश्चर्यभराने ऐकत राहिले. मधूनमधून 'येस्''नो', 'ऑफकोर्स' करीत होते. मग रिसीव्हर खाली ठेवून ते गडबडीने उठले. आपली युनिफॉर्मची टोपी त्यांनी डोक्यावर चढवली, खण उघडून आतले पिस्तूल खिशात घातले आणि छडी उचलून ते ओरडले, 'मि. वर्धन !'

'येस् सर!' एक पोलिस अधिकारी आत येऊन सलाम करून उभा राहिला,

'जल्दी दो जीप निकालना--दो काम करना हें– शाह स्वीटमार्ट पर फौरन रेड और नये ब्रिज की तरफ फौरन दौड–इन्तजाम करो– दो मिनट में! एकेक गाडी में दसदस कॉन्स्टेबल, और हथियारबंद।'

'येस सर– असे म्हणून सबइन्स्पेक्टर निघून गेला.

इन्स्पेक्टर ओमप्रकाश आमच्या मंडळीकडे वळून म्हणाले, 'फोन था डिटेक्टिव्ह् इन्स्पेक्टर मन्सूर का. उनके साथ एक तेरह चौदह बरसो का लडका हैं– फास्टर क्या बतायाफेन–'

'वो ही वो ही–' मामा एकदम उद्गारले. मामीच्या सद्गदित कंठाने नुसताच एक आवंढा गिळला आणि माली चक्क उभी राहून म्हणाली, 'मी येंते तुमच्याबरोबर.'

'दॅट वुड बी ओ. के. तुमने उस जासूस को देखा है.'

आणि मामांच्याकडे वळून ते म्हणाले, ' आपण दोघं काय करता ? इथं थांबता की घरी जाता ?'

'आम्ही घरीच जातो.' मामी म्हणाल्या, ' मला ही धावपळ सहन होणार नाही. मामीला तुम्ही घेऊन जा.'

' बहोत अच्छा ! तुमचा नाव-पत्ता आहेच. तासाभरानं इथं फोन करा.'

मामा-मामी पुन्हा एक रिक्षा करून हाऊस बोटीकडे निघाली, आणि माली एका जीपमधे बसून पोलिसांच्या तांड्यातून ऐटीत नव्या पुलाकडे रवाना झाली.

□

# ७. पिस्तुलावर मात

शहा स्वीट मार्टमधल्या हेरांना हवालदारांच्या स्वाधीन केल्यावर डिटेक्टिव्ह मन्सूरने फास्टर फेणेचा हात पकडला आणि ते. त्वरेने पश्चिम रस्त्यावरून निघाले. हा रस्ता गावाहेर नदीच्या दिशेने जात होता.

'इकडेच आहे अवंतीपूर ?' बन्याने विचारले.

'आपण अवंतीपूरला नाही चाललो. नव्या पुलाकडे.'

'नवा पूल ? पण मग तुम्ही फोनवर बोलताना ..'

'फोनवर मी अवंतीपूर म्हणालो,' चाचा मन्सूर किंचित हसून म्हणाले, 'पण तो कोडवर्ड होता. इट मींट नयाब्रिज!'

'नया ब्रिज !' फास्टर फेणे पुटपुटला, 'सकाळी आमचा तो उंचाडा हेर पण नया ब्रिजचीच भाषा बोलत होता. तिकडेच त्याला काहीतरी कामगिरी उरकायची होती म्हणे.'

'बऱ्याच लोकांना नया ब्रिजवर कामगिऱ्या उरकायच्या आहेत असं दिसतंय. त्या नष्ट करणं ही आपली कामगिरी आहे. कमॉन !'

दोघेही न थांबता भराभर चालत होते आणि तरी फ़ास्टर फेणेच्या चलाख मेंदूला कसली तरी चाहूल लागली होती, पण ती कसली याचा अजून नीट उलगडा झाला

नव्हता.

मधेंच डोक्यावरून उंच उडत जाणाऱ्या पक्ष्यांच्या थव्या-कडे बोट करून मन्सूरने विचारले, ' मालूम है ये कौनसे पंछी है ?'

बन्या थांबला. त्याने आकाशाकडे पाहात म्हटले, 'बगले ? '

' हेरॉन– या क्रौंच पक्षी. असल्याच एका पक्ष्याला एका व्याधाने मारलंन अन् म्हणून रामायण घडलं.'

बन्याला अर्थात हा सारा इतिहास माहीत होता. पण त्याचे लक्ष मन्सूरच्या बोलण्याकडे नव्हते ते त्यामुळे नव्हे. आकाशमार्गाने जाणारा तो पक्ष्यांचा थवा आता बराच मागे म्हणजे शहराच्या दिशेला गेला होता. आणि त्याच्या-कडे बोट दाखवणाऱ्या मन्सूरने अन् बन्याने पण मागे वळून पाहिले होते. मात्र मन्सूरने क्षणभरच मागे पाहून पुन्हा तिकडे पाठ वळवली होती. तर फास्टर फेणे जरा जास्त वेळ मागे पाहात होता. मग झटक्यात त्याने पुन्हा पुढे पाहिले. मन्सूर दोन पावले पुढे गेला होता. एका उडीत त्यांना गाठून बन्याने त्यांची बाही पकडली आणि तो हलक्या आवाजात पुटपुटला, ' चाचा मन्सूर ! पीछे नहीं देखना– लेकिन सुनो मैं क्या कहता हूं–'

' बोल '

' तो आदमी आपल्या मागनं येतो आहे.'

' कुठचा आदमी ?'

' तो उंचाडा इसम–मी ज्याच्याबद्दल तुम्हाला सांगितलं तो–'

'यू मीन मेरी जान माँगनेवाला ?'

'जी, वो ही. आपल्याला संशय येऊ नये म्हणून तो मुद्दाम अंतर राखून चालत होता; पण मला मघाशीच चाहूल लागली. आता आपण थांबलो ना, तेव्हा तोही थांबला होता. तुम्ही मागं वळलात तेव्हा तुमचा चेहरा त्याला दिसला. पटक खिशातून एक कागद काढून त्याने तुमच्या छबीशी तुमचा चेहरा ताडून पाहिलाय. त्याची खात्री झालेली दिसली.'

'मग आता ?' आपली गती यत्किंचित न मंदावता मन्सूरने विचारले,

'आता काय ? कथा.' बन्या म्हणाला. 'पुढचं तुम्ही पाहा. मी आपली वॉर्निंग दिली.'

बन्याने बोलता बोलता मन्सूरच्या चेहऱ्याकडे पाहिले, तेव्हा तिथे एक स्मिताची रेषा झळकलेली त्याला दिसली. बन्याला त्याच्या या नसत्या धिटाईचे कौतुक वाटले नाही. कारण तो उंचाडा इसम किती भयंकर प्राणी आहे याची कल्पना मैना बोटीत ऐकलेल्या संवादावरून त्याला आलेली होती. त्याला खात्रीपूर्वक असे वाटत होते की मागून येणाऱ्या या इसमाजवळ एखादे हत्यार असणार. चाचा मन्सूरची हत्या हीच त्याच्याकडे सोपवलेली कामगिरी होती, आणि ती पार पाडताना तो कोणत्याही विरोधाला भीक घालणार नाही अशी बन्याला खात्री वाटत होती. पण मन्सूरला ही खात्री कशी पटवावी हे त्याला कळत नव्हते.

बन्या ऊर्फ फास्टर फेणे आता खरोखर घाबरला होता. स्वत:साठी नव्हे, चाचा मन्सूरसाठी.

इतक्यात त्याच्या मनातले हे विचार ओळखूनच की काय, मन्सूर त्याच्या खांद्यावर हात ठेवून चालता चालता त्याला म्हणाला, ' डोंट सपोज आयॅम नॉट सीरियस, फास्टर फेणे. पण तो माणूस एवढ्या गर्दीत आपलं काही वाकडं करू शकणार नाही.'

' अन् गर्दी संपल्यावर ?' बन्या हा प्रश्न विचारतो आहे तो गर्दी खरोखरीच संपली. रस्त्याने एकदम वळण घेतले आणि मग एकदम रस्ता उताराला लागला. या ठिकाणी मन्सूरनेही चपळाईने वळण घेतले. माणसांची गर्दी संपून आता झाडांची गर्दी लागली होती. बाजूच्या त्या गर्द झाडीत मन्सूरने उडी घेतली आणि आपल्याबरोबर फास्टर फेणेलाही ओढले. एक रेखीव पायवाट झाडीत घुसली होती. अन् मग कुठेतरी लुप्त झाली. त्या वाटेवर गुलमोहराच्या परागांचा सडा पडून भांगात घातलेल्या कुंकवाची शोभा त्याला आली होती. त्यावर दवबिंदू पडून चमचम करीत होते. त्यांतले काही थंडीने थिजून त्यांचे मोती बनले होते. पण ही शोभा पाहायला मन्सूर थांबला नाही. रानातून बन्याला ओढीत ओढीत बरेच दूरवर नेले.

' मला वाटतं आपण त्याला टांग दिली.' तो अंमळ थांबून म्हणाला, आणि मग पुन्हा स्वस्थ चित्ताने पण झरझर चालायला लागला.

बन्याचे चित्त तितके स्वस्थ नव्हते.काही मिनिटे मन्सूरप्रमाणे त्याचीही समजूत झाली होती की संकट टळले. पण मग पुन्हा त्याच्या मनात मघासारखी ठुसठुस सुरू झाली. आपला पाठलाग होत असावा असे त्याला पुन्हा

खात्रीपूर्वक वाटले.

फास्टर फेणे थबकला. त्याने पँटीच्या खिशातली गलोल काढून ताणली. मग त्याने मागे वळून पाहिले, त्याला जे दिसले त्यामुळे त्याची जीभ टाळ्याला चिकटली अन तोंडातून पेटंट उद्‌गार निघाला–'ट्टॉक् !'

'क्या हो गया ?' मन्सूरने चालताचालताच विचारले, 'तू कुछ बोला ? मैं समझा बेर टपका तेरे चकोटीपे !'

त्याच्या त्या टणटणीत विनोदाकडे दुर्लक्ष करून बन्याने आपल्या काटकुळ्या हाताने त्याला जोराने बाजूला ओढले होते. ज्या काटेरी झाडांच्या जाळीत दोघे आता घुसले होते त्यांच्या किरट्या फांद्या त्यांना संरक्षण द्यायला अपुऱ्या होत्या, पण शत्रूच्या दृष्टीपासून आपल्याला त्या छपवू तरी शकतील असे बन्याला वाटत होते. त्या जाळीआड दोघे दबा धरून बसले. मग फास्टर फेणे श्वास रोखून म्हणाला, 'वह देखो, चाचा मन्सूर!'

मन्सूरनेही जाळीतून आरपार पाहिले. सुमारे पन्नासएक यार्डांवर अशीच एक जाळी होती आणि त्या जाळीतून पायवाटेकडे निष्ठुरपणे रोखून पाहात होती एक पिस्तुलाची नळी. पिस्तुल धरणारी व्यक्ती जरी जाळीत लपलेली असली तरी तिचा हात तेवढा बन्याला स्पष्ट दिसला.

तो हात हळूहळू हलायला लागला. पिस्तुलाची नळी अर्धवर्तुळाकार फिरली अन् मग स्थिरावली– इकडच्या काटेरी जाळीवर !

'चाचा मन्सूर !'

मन्सूरने शब्दाने उत्तर दिले नाही. त्याने एक धपका



मारून फास्टर फेणेला पालथा पाडला. मन्सूरनेही धाडदिशी भुईवर अंग टाकले.

क्षण–अर्धाक्षणच दोघे निपचित पडून राहिले असतील, तेवढ्यात दोन आवाज जवळजवळ एकाच वेळी झाले–

'थाड्!'

'आय आय आय !'

मन्सूरने अन् त्याच्या मागोमाग लगेच फास्टर फेणेने मान वर केली· दोघांचीही खात्री झाली होती की, हा 'थाड' आवाज म्हणजे पिस्तुलाचा वार नव्हता आणि तो 'आय आय' चा आक्रोशही आपल्यापैकी कुणी केलेला नव्हता. ती किंकाळी पिम्तुलाच्या दिशेने आलेली होती.

दुसऱ्याच क्षणी त्यांना दिलासा देणारे दृश्य दिसले.

'थाड' कन् उडवले गेलेले ते दळभद्री पिस्तूल रानातल्या पायवाटेवर पडले होते आणि उजव्या हाताची बोटे चोखीत एक माणूस मागच्या रानात पसार होत होता.

हा काय चमत्कार झाला म्हणून दोघे पाहात आहेत, तोच बाजूच्या झाडीतून वाट काढीत त्या चमत्काराचे कारण अवचित प्रकट झाले. त्या गोऱ्या गुटगुटीत गलोलधारी हसऱ्या मूर्तीकडे पाहात फास्टर फेणे हर्षभराने ओरडला, 'अन्वर !'

मग उड्या मारीत तो पुढे धावला आणि आपल्या लाडक्या मित्राला घट्ट मिठी मारून मन्सूरकडे पाहात त्याने म्हटले, 'चाचा मन्सूर ! मी तुम्हाला वाचवू शकलो नसतो म्हणून देवाने या माझ्या मित्राला धाडलं बघा!'

मन्सूरचाचा डोळे फोडून त्या जोडगोळीकडे पाहात होते.

मग ते हसून म्हणाले, 'अरी यार! तुम्हा छोकरे लोकांच्या हातात देशाचं भवितव्य सुखरूप दिसतंय. मला उद्याच माझा राजीनामा पाठवायला हरकत नाही!'

फास्टर फेणे नि अन्वर खळखळून हसले.

□

# ८. आता मात्र खराच साप भेटला!

अन्वरचे दोन्ही हात शस्त्रसज्ज होते. उजव्या हातात बंदूक होती आणि डाव्या हातात नव्याने लुटलेले पिस्तुल!

पैकी बंदूक बन्यापुढे उंच धरून तो ऐटीत म्हणाला, 'तू ज्या एअरगनची टवाळी केली होतीस ना, तिचीच ही करामत!' आणि त्याने पुन्हा एकदा जिज्ञासेने आपल्या मित्राबरोबरच्या तरुणाकडे पाहिले.

फास्टर फेणेबरोबरचा हा मन्सूर चाचा म्हणजेच पाकहेरांना हवे असलेले सावज असणार हे अन्वरने आधीच ओळखले होते. चमचमत्या डोळ्यांनी तो मन्सूरकडे पाहात होता. मग पिस्तुल त्याच्या हातात देत तो म्हणाला, 'तुम्हीच ठेवा हे, साहेब. तुमच्या जिवावर उठलेलं हे हत्यार तुमचं यापुढं रक्षण करील!'

मन्सूरचाचा पिस्तुल खिशात घालीत असताना फास्टर फेणेने हसून त्यांच्याकडे पाहिले. 'जसं काही त्यांच्याजवळ स्वतःचं पिस्तूल नसेलच! पण जाऊ द्या. मन्सूरचाचा एक साथ दो पिस्तूल इस्तेमाल करतील, लेकिन हमको नही देंगे.'

'पिस्तूल वास्तूल बच्चे का खेल नहीं!' मन्सूर म्हणाला आणि ते ऐकून फास्टर फेणेने अन्वरकडे पाहात गालातल्या गालात जीभ घोळवली.

त्या जिभेतून 'ट्रॉक' निघण्यापूर्वीच अन्वर घाईघाईने म्हणाला, 'चाचाजी, आपण त्या पाजी माणसाचा शोध नाही करायचा ? आपण तिघं आहोत. तो निःशस्त्र नि एकटा आहे!'

'कशावरून ?' सभोवतालच्या रानाकडे पाहात मन्सूर म्हणाला, 'आणि या झाडीत त्याला धुंडाळीत बसणं योग्य होणार नाही. या क्षणाला तरी मला वाटतं, पूल गाठणं हेच आपलं आद्य कर्तव्य आहे. जें करायचंय ते तिथं.'

डिटेक्टिव्ह मन्सूर फार गंभीरपणे बोलत होता. इतकेच नाही, तर त्या दोघांचे बाहू पकडून त्याने त्यांना पुन्हा रस्त्याला लावले होते. पन्नासएक पावले चालून झाल्यावर ते म्हणाले, 'आपण नव्या पुलाजवळ आलो आहोत. एवढीं चढण चढून झाली की बांधकामाची साइट आपल्याला दिसेल. दरम्यान—' एकदम थबकून ते पुढे म्हणाले, 'तुम्ही दोघं असं करता ? दोघंही पाच मिनिटं इथंच थांबा—' क्षणभर ते पुन्हा थांबले. मग खिशात हात घालून अंमळशाने त्यांनी मघाचे तें पिस्तुल काढले अन ते फास्टर फेणेजवळ देत म्हणाले, 'जस्ट इन केस. पण नुसतं धमकीपुरतं वापरायचं, बरं का ! गोळ्या झाडायच्या नाहीत.' खरं म्हणजे पिस्तुल खिशातून काढण्यापूर्वीच त्यांनी ते रिकामे केले होते. 'मला त्या कामावरच्या माणसांशी काही कानगोष्टी करायच्या आहेत. दहा—पंधरा मिनिटांत मी मोकळा होईन. वाय द वे, हाऊ आर यू अॅट क्लायंबिंग ट्रीज ?'

'अॅज गुड अॅज मंकीज ! — नाही का रे अन्वर ?'

फास्टर फेणेने चटदिशी उत्तर दिले.

मन्सूर हसत म्हणाला, 'त्याबद्दल शंका घ्यायचं कारण नव्हतंच म्हणा. तुमचा एकंदर अवतारच त्याची साक्ष देतोय ! झाडावर चढा. पुलाची वरची आघाडी मी सांभाळणार आहे. पण पुलाचा खालचा भाग मला दिसणार नाही. तो तुम्हाला झाडावरनं दिसू शकेल आणि दुसऱ्याच्या लक्षात न येता ! धिस मेपल इज ए गुड वन. कीप ए क्लोज वॉच... और हाऊ अबाऊट व्हिसलिंग ? शीळ वाजवता येते ? .. श्रिल–कर्कश–अर्ध्या मैलावर ऐकू जाईल अशी ?'

लगेच अन्वरच्या दोन्ही हातांची बोटे तोंडाकडे निघाली. त्याचा हात पकडून मन्सूर म्हणाला, 'आत्ता नको. मला कल्पना आहे, पण तसंच काही संशयास्पद दिसलं तर शीळ वाजवायची. एरवी नाही!'

'हा ट्रॅक करील.' अन्वरने सांगितले. 'व्हिसलिंग से भी बढिया चीज ! यांचेच नुसते कान किटतील असं नाही, हेरांच्या पण चिरफळ्या उडतील कानांच्या ! '

'पुरे, पुरे !' फास्टर फेणे त्याच्या तोंडावर हात दाबीत म्हणाला.

'लक्षात ठेवा– तितकंच काही डेंजर असल्याशिवाय कुठचाही आवाज काढायचा नाही अजिबात. खारीसारखं झाडाला चिपकत चालायचं... बाय बाय !'

डिटेक्टिव्ह मन्सूर झपाट्याने पुढे निघून गेला. त्याच्या दिसेनाशा होणाऱ्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहात अन्वरने खांदे उडवले.

'काय पण ! एकदा म्हणतो बंदर व्हा. एकदा म्हणतो गिलहरी व्हा ! काय काय व्हायचं तरी माणसानं ?'

'बहुरूपी ! बकवास बंद ! काम कर !'

लगेच ही दुक्कल कामाला लागली. मन्सूरने दाखवलेले ते झाड एक मोठा चिडाचा वृक्ष होता. त्याची खाली आलेली फांदी पकडून अन्वरने तंगडचा उचलल्या अन् फांदोला विळखा घातला. दुसऱ्याच क्षणी त्याचा गबदुल देह फांदीवर स्वार झाला. या ठिकाणी कुणाही साहसी पोराला आवडेल अशी एक भली मोठी ढोली होती. पण तिकडे दुर्लक्ष करून तो सरासरा फांदीची चढण चढला. उभ्या उभ्या त्याने वरच्या काही छोटचा शाखांचा आधार घेऊन वरच्या फांदीवर टांग मारली. तिथून तो पुन्हा खोडापर्यंत गेला. खोड या ठिकाणी बारीक झालेले होते. त्याला मिठी मारून तो आणखी वर चढला. एवढचा वेळात फास्टर फेणेनेही त्याचे अनुकरण केले होते.

'उई ! —या ऽ क् !' अन्वर किंचाळला. खोडाच्या एका खोवणीत घातलेला हात त्याने झटक्याने मागे ओढला होता. 'लाल कीडी है—सम्हालना!'

त्याच्या मागोमाग वर येणाऱ्या बन्याने आभारपूर्वक ती सूचना 'नोट' केली आणि एकदम विचारले, 'काय रे अन्वर ! आम्ही या इकडच्या जंगलात आलोत हे तुला कसं कळलं ?'

अन्वरचे उत्तर आले— 'अरे, ती एक मजा आहे. त्या बदमाष हेरांनी पब्लिकला असं भासवलं की आपणच दोघे पाकिस्तानचे हेर आहोत— म्हणजे तू नि मी !'

'हरामखोर !'

'हो ना! आणि काही वेळ त्या वघ्यांतली काही कोवळी पोरं चकलीही अन् आमच्यावर गुरगुरायला लागली त्यांतल्या एका पंधरा वर्षांच्या पोराशी तर माझी फ्री–स्टाइल कुस्ती झाली. मी सरळ अंगातला ओला सदरा काढून त्याच्याशी लढलो. त्याला पुरं भुईसपाट केल्यावर त्याचा सदरा काढून मी अंगात चढवला. माझ्या सदऱ्याचं ओलं गाठोडं त्याच्या पोटावर ठेवलं अन् ओरडलो. 'तुम सब गधे लोग हो, दुष्मन हम नहीं, वे लोग हैं' मग कुठे लोक खऱ्या हेरांच्या मागे लागले. सम्हालना फास्टर फेणे त्या फांदीला टोक आहे. तेवढ्यात उंचाडा सटकून रानात पळालेला दिसला. तो ओठांवर खोटी मिशी चिकटवीत होता. मी त्याच्या मागे लागलो. पँट ओली असली तरी सदरा आता कोरडा होता. त्यामुळे तेवढं हुडहुडलं नाही.'

अन्वरची वडबड चालूच होती. ती ऐकत बन्याही बराच वर चढून आला होता. आता त्याने एक वेगळाच फाटा पकडून 'शॉर्ट–कट' काढला आणि तो अन्वरच्याही आधी शेंड्याकडे जाऊन पोचला. फांदीवर डळमळती वैठक मारून त्याने आसपासचे निरीक्षण चालवले.

इकडे अन्वर सांगतच होता– 'मी त्या हेरामागे जात होतो ना, तेवढ्यात एक बहोत अच्छा सीन मैंने देखा.'

'वह क्या ?' बन्याने कपाळावर हात ठेवून कोवळ्या उन्हातून दिसणारा दूरचा 'सीन' न्याहाळीत विचारले.

'तुझी मामामामी धावत पळत नदीवर येऊन पोचली होती अन् तिथल्या लोकांना काहीतरी विचारीत होती.

त्यांच्याबरोवर तुझी वहीण पण होती.'

'माली !' बन्या उद्गारला, 'माली सुखरूप आहे तर! ओ : ट्रॉक् !'

त्याच वेळी जोरदार वाऱ्याचा एक झोत अंगावर आला, ती नाजूक फांदी गदगदा हलली आणि बन्या झोक जाऊन खालीच पडणार होता, पण मोठ्या हिंमतीने त्याने स्वतःला सावरले.

मालीविषयीच्या या आनंदाच्या वातमीने बन्याला धक्का दिला होता आणि समोरच्या दृश्यावरून त्याचे लक्ष क्षणमात्र उडाले होते. दृश्य तसे फारसे नव्हतेच. कारण समोरच्या झाडांचे उंच शेंडे आड येत होते. त्या झाडांच्या पलीकडे मात्र उतार असावा असे तिथल्या पालवीला आलेल्या खालाटीवरून लक्षात येत होते. म्हणजे नदीचे पात्र न्याहाळायचे तर त्या पुढल्या झाडावर उडी मारणे भाग होते.

'ती सगळीं मंडळी आदमपुऱ्याकडे निघाली असणार.' अन्वरचे चऱ्हाट चालूच होते, 'मी मात्र मागे वळलो नाही किंवा त्यांना हाकाबिकाही मारल्या नाहीत. म्हटलं, माली खुशाल आहे ना ? तो बेश ! जाऊ द्यात त्यांना पोलिस ठाण्यावर. आपण या जासूसचा पिच्छा पुरवू या आणि म्हणून मी इकडे आलो ... ऐकतो आहेस ना वन्या तू ?'

पण बन्याने त्याचे शेवटचे बोलणे खरोखरीच ऐकले नव्हते. तो आता जिथें पोचला होता तिथे दोन झाडांचे शेंडे एकमेकांना बिलगले होते. फास्टर फेणेने चपळाईने दुसऱ्या झाडाची फांदी पकडून एक झोका घेतला होता.

नंतर टारझनप्रमाणे फांदीमागून फांदीवर उड्या घेत अन् मध्येच खाली लटकत तो कितीतरी दूर पोचला होता. तिथल्या एका प्रशस्त शाखेवर स्वार होऊन त्याने गर्जना केली, 'अन्वर, यहाँ से सब कुछ दिखता है– नदी, पूल आणि पुलाखालच्या कमानी अन् खडक साऱ्या गोष्टी मला झकास दिसताहेत !'

त्याची ही घोषणा पानापालवींच्या गचडीतून झिरपत गेली आणि गाळलेल्या स्वरूपात अन्वरच्या कानांत शिरली. फास्टर फेणे काहीतरी सांगतो आहे एवढे त्याला कळले, पण शब्द काही स्पष्टपणे उमगले नाहीत. पायांखालच्या फांदीवर त्याने बैठक मारली अन् फांदी कवटाळून तो धापा टाकू लागला. अन्वरने आत्तापर्यंत खूपच धावपळ केली होती. तो वजनदार पोरगा होता. फास्टर फेणेसारखे त्याचे शरीर हलके-फुलके नव्हते. त्यामुळे त्याला आता दमायला झाले होते.

वऱ्याकडे क्षणभर दुर्लक्ष करून तो मागे रेलला अन् झाडाला पाठ टेकून पडून राहिला. डावा हात एअरगनच्या कातडी वादीत अडकवून त्याच हाताने त्याने खालची फांदी घट्ट धरली होती. त्याचा हात झाडाच्या एका खोबणीत शिरला होता.

काही मिनिटे थकलेल्या श्रांत अवस्थेत निघून गेली. तेवढ्यात सूर्य किंचित् वर आला होता. त्याची उन्हे अन्वरच्या मुखावर पडली होती. त्याने डोळ्याची मिचमिच केली. तो उठून बसला आणि त्याने खाली डोकावले.

रानातल्या पाचोळ्यावर पावले वाजली होती. कुणीतरी



९५८६ . २।५।८

याचं झाडाच्या रोखाने येत होते.

मिनिटभराने एक व्यक्ती येऊन झाडाखाली उभी राहिली. अन्वरने यत्किंचितही आवाज न करता हलकेच ओणवून खाली पाहिले.

तोच तो उंचाडा हेर खाली उभा होता. उजव्या हातावर त्याने रुमाल बांधला होता. रुमालावर रक्ताचे डाग होते.

अन्वरची नजर आपसूक आपल्या डाव्या हातातल्या एअरगनकडे वळली .. या बंदुकीने नुसतंच पिस्तुल पाडलेलं नाही, तर या बदमाषाचा हातही थोडाफार जायबंदी केला आहे म्हणायचा. गुड !

पण—पण यह नापाक आदमी यहाँ खडा होकर क्या कर रहा है ?

एखाद्या पुतळ्यासारखा स्तब्ध उभा होता तो. कुणाची तरी वाट बघत असावा. हात मागे नेऊन त्याने झाडाचे खोड धरले आणि मग पुढे, मागे, डावीकडे, उजवीकडे त्याची नजर घारीसारखी फिरली. नंतर त्याने दृष्टी वर नेली.

अन्वर चटकन् मागे झाला. बंदूक धरणारा हातही त्याने मागे ओढला. फक्त झाडाच्या खोवणीतला उजवा पंजा मात्र त्याने आणखी घट्ट आवळला.

उंचाडा तेवढ्यात झाडापासून दूर झाला होता. अन् सभोवार निरखून पाहात होता. आपली काहीतरी चूक झाल्याचे त्याच्या लक्षात आले असावे. कारण त्याने मान हलवल्यासारखे केले आणि तो दोन्ही बाजूंच्या झाडांकडे

निरखून पाहात पुढे निघून गेला–नदीच्या दिशेने.

तो दृष्टीच्या टप्प्याबाहेर जाताच अन्वरने अंग सावरले अन् झाडाखाली उतरण्याची तयारी केली. चढण्यापेक्षा उतरण्याचे काम अगदीच सोपे होते. दोन तीन झेपांतच त्याने ती सर्वांत खालची आडवी फांदी गाठली. तिथे उभे राहताच त्याची दृष्टी त्या विस्तीर्ण ढोलीकडे गेली आणि क्षणार्धात त्याच्या अंगावर काटा उभा राहिला.

ढोलीतून फणा बाहेर काढून एक काळाकभिन्न साप स्थिर नजरेने त्याच्याकडे पाहात होता. विषारी दातांमागून वातीसारखी बारीक जीभ लवलवत होती.

अन्वरला आता घाम फुटला. उभ्याउभ्याच अंग न हल-वता त्याने बुबुळे खाली करून पाहिले. छट् ! खाली वाकडातिकडा खडक होता आणि उंची पण बरीच होती. जमिनीवर उडी टाकायची तर फांदीवरून आणखी खाली सरकायला हवे होते. आणखी खाली म्हणजे ढोलीच्या दिशेने त्या जिवंत मृत्यूच्या जबड्यात !

अन्वर अन् नाग एकमेकांकडे कितीतरी वेळ निश्चल नजरेने पाहात राहिले.

अन्वरचा सर्पाशी नजरबंदीचा खेळ चालू असताना तिकडे फास्टर फेणेने एक अजब देखावा पाहिला होता. नदीचा आणि पुलाचा नाही. ते दृश्य केव्हाच पाहून त्याने आत्म-सात केले होते. सुमारे फर्लांगभर अंतरावर पुलाचे अर्धवट रचून झालेले ते बांधकाम, नदीच्या उंच काठावर उभ्या असलेल्या प्रचंड यान्त्रा, चुना-खडी–रेतीचे अवाढव्य ढीग. पाण्याचे मोठमोठे हौद, सीमेंट गाळणाऱ्या भल्या मोठ्या

चाळण्या. डोईवर घमेली वाहून इकडे तिकडे नेणाऱ्या स्त्री-पुरुष कामगारांचा तांडा, त्यांच्यावर देखरेख करणारे ते अंमलदार, हे सारे त्याला बघायला मिळाले होतेच. कामगार लोकांच्या आपसांतल्या बोलण्याचे मंद आवाजही अधून-मधून कानांवर पडत होते. शब्द मात्र उमगत नव्हते.

' अन्वर ! ' त्याने हाक मारली, पण अन्वरकडून उत्तर आले नाही.

बन्याची चपळ नजर खूप भिरभिरली, पण मन्सूरचाचा मात्र त्याला अजून कुठे दिसले नव्हते. डोळ्यांवर येणारा सरळ उन्हाचा तडका टाळून त्याची नजर त्यांना शोधायचा पुन्हा पुन्हा प्रयत्न करीत होती.

पुलाखालच्या कमानीकडे त्याने पुन्हा पुन्हा रोखून पाहिले, पण तिथे त्याला संशयास्पद असे काही आढळले नाही. नदीच्या पात्रातून कितीतरी नावा ये-जा करीत होत्या. दोन्ही तीरांना टेकून हाऊसबोटी उभ्या होत्या. पण हे दृश्य झेलम नदीत नित्याचे होते.

नदीचा अलीकडचा काठ त्याला इथून स्पष्ट दिसत नव्हता. पण काठालगत डुंबणारी माणसे दिसत होती. आणि प्रवाहात काही धोतरे-पातळे तरंगत होती. त्यावरून तिथे आंघोळीचा नि धुण्याचा राडा सुरू असावा असा अंदाज करणे कठीण नव्हते.

किंचित् कंटाळून बन्याने खाली नजर वळवली आणि तो एकदम चपापला.

ज्या झाडाच्या शेंड्यावर तो बसला होता त्याच्या तळाशी काहीतरी खसबस होत होती. एक माणूस झपा-

टचानें या वृक्षाकडे येत होता. झाड ओळखल्याचा भाव त्याच्या मुखावर झळकला होता. मग ताबडतोब आपली गती वाढवून तो झाडाखाली येऊन उभा राहिला.

वन्याने पटदिशी मान मागे घेतली आणि एक आवंढा गिळला.

' उंचाडा !' तो आपल्याशी पुटपुटला, ' अन्वर का नाही आला अजून ? ' पण अन्वरबद्दल विचार करायला वेळ नव्हता. खाली उभा असलेला उंचाडा काय करतो हे पाहणे अधिक महत्त्वाचे होते.

झाडाला टेकून उंचाड्याने दोन्ही हात डोक्यामागे नेले, तेव्हा त्याच्या उजव्या पंज्याभोवती गुंडाळलेले रुमालाचे बॅंडेज वन्याला स्पष्ट दिसले.

' गुड ! ' असे म्हणून वन्याने खालचा ओठ दातांनी दाबला.

' कुणाची तरी वाट बघतोयसं दिसतंय. ' तो पुटपुटला आणि तो स्वतःही आता पुढे काय घडते याची वाट बघू लागला.

पाचदहा मिनिटांत सभोवतालच्या झाडीतून एक एक करीत पाचसहा माणसे लपत छपत या वृक्षाकडे आली आणि उंचाड्यासमोर निमूटपणे उभी राहिली.

त्यांतले दोन चेहरे फास्टर फेणेला पाहिल्यासारखे वाटले. बरोबर ! शहाच्या मिठाईच्या दुकानात कामाची चौकशी करून आलेले ते बेकार इसम होते. म्हणजे पहिल्यापहिल्या नगांपैकी दोन. नंतरच्या बहुतेकांना मन्सूरचाचांनी पोलिसांना हवाली केले होतेच.

त्या सहाजणांना उद्देशून उंचाडा आता भाषण करीत होता. पण त्यातला शब्दन् शब्द फास्टर फेणेच्चा टवकारलेल्या कानांना ऐकू गेला.

'होश में रहना. पोलिसांना संशय आलेला आहे. तुम्हांला सावध राहून काम करायला हवं. फत्ते केलीत तर बक्षिशी दुप्पट देऊ, पण दगाफटका केलात तर तुमची गय करणार नाही...'

हे बोलताना त्याने डाव्या हाताचे एक बोट सफाईने स्वत:च्या गळ्यावरून फिरवले. त्या सहाही भाडोत्री इसमांनी ते पाहिले, पण कोणाच्याही चेहऱ्यावर काही फरक पडला नाही. एकतर ते पक्के बेडर असावेत, किंवा भीतीने आधीच त्यांना ग्रासलेले असावे.

'माल आणलात ?' उंचाड्याने एकदम सवाल फेकला.

'आणला.' एक आवाज.

'ठीक. लपवलाहेत ना ठीक ? झडती होईल बरं.'

'हां हां !' एक दोन आवाज.

'अच्छा. जा तर. कंत्राटदाराला भेटा. तो तुम्हांला काम देईल. तुम्ही आमचं काम करा! याद रखना–झडती होईल, तेव्हा माल नीट लपवायला हवा.'

जमलेल्या लोकांनी एकमेकांकडे अर्थपूर्ण नजरेने पाहिले. एक दोन डोळे मिचकलेही. पण त्या नजरानजरीचा अर्थ बन्याला कळण्यासारखा नव्हता.

'ठीक आहे. जा तुम्ही लवकर भरती व्हा नाही तर तुमचा नंबर हुकेल.'

सहाही जण आले तसे निघून गेले. फास्टर फेणेचा ऊर

धपापत होता तरी त्याने डोळे फाडून, मान पुढे वाकवून त्या सहा माणसांच्या छब्या आपल्या मनाच्या कॅमेऱ्यात टिपण्याचा प्रयत्न केला. मग तो झराझर झाड उतरून खालच्या फांदीपर्यंत गेला, आणि आणि उंचाडा इसम झाडाखालून दूर होण्यापूर्वीच एक माकड उडी मारून त्याच्या खांद्यावर स्वार झाला. लगोलग त्याच्या गळ्याभोवती आपल्या हडकुळ्या तंगड्यांची जबरदस्त मिठी त्याने आवळली. त्याच वेळी त्याच्या डाव्या खांद्यावरून आपले डोके पुढे नेऊन बन्याने त्याच्या डाव्या हाताचा कडकडून चावा घेतला. अगदी विंचवाचा दंशच जसा काही !

' ऑऽ यू ऑऽयू ! ' या आकस्मिक हल्ल्याने बावचळलेल्या उंचाड्याचा तो डावा हात हल्लेखोराची तंगडी पकडण्यासाठी पुढे झाला होता, पण त्या झोंबऱ्या दंशाने क्षणात रक्तबंबाळ होऊन तो थरथरत मागे झाला.

बन्याचा उजवा हात स्वस्थ नव्हता. पँटीच्या खिशातून त्याने पिस्तूल बाहेर काढले होते आणि क्षणाचीही उसत न खाता त्याच्या डोक्यावर रट्टे हाणायला सुरुवात केली होती.

' आऽय् आऽय् ! छोड दो शैतान !'

' मला सैतान म्हणतोस हलकटा ?'

उजव्या हाताने फटके मारीत असताना फास्टर फेणेच्या तंगड्यांची मगरमिठी मात्र यत्किंचितही सैल झाली नाही.

' छोड–छोड बोलता हूँ साला ! '

'पहिले यह बता दो कि माल किधर छिपाया है ? कुठे लपवलाहेस माल ? बोल !'

' बताता हूँ. पहले छोड दो.'

' नही ! पहले बताव, फिर छोडता हूँ. बोल-बोल-बोल! ' आणि प्रत्येक 'बोल' बरोबर एकेक रट्टा.

' बदमाष माणसा ! तुझंच पिस्तूल आहे हे. अन् ते वापरायचं नाही असं मन्सूरचाचांनी बजावलं असलं, तरी ते असंही वापरायचं नाही असा त्याचा अर्थ नाही.'

फास्टर फेणेने हात दुखेपर्यंत थडाथडा मारा चालू ठेवला. मग मात्र खरोखरीच त्याचा वाळकुडा हात दुखू लागला.

' बोल– बोल– बोल–'

' अच्छा– तो सुन. त्या लोकांनी घातलेल्या कपडयांच्या शिवणीत कडेकडेने भरल्या आहेत डायनामाइटच्या कांडया.'

' ठीक ! ' बन्याने तंगडयांची मिठी सैल करीत म्हटले. आणि त्याच क्षणी त्याची नजर पळण्याची वाट शोधू लागली.

बन्या ऊर्फ फास्टर फेणे याला आपल्या शक्तीचा अंदाज नव्हता असे नाही. फार वेळ या धटिंगणाला आपण रोखू शकणार नाही हे तो पुरते जाणून होता. फार कशाला ? आत्ताच त्याचे हात अन् पायही चिकार दुखू लागले होते. आणि तो धटिंगणही या बाळाची ताकद पुरती ओळखून होता. या वाह्यात पोराने आपला गळा कितीही दाबला अन् त्यामुळे आपलं थोबाड कितीही काळंनिळं झालं अन् डोळे बैदुलांसारखे बाहेर आले, तरी आपला जीव घ्यायला हे पोर धजणार नाही हे त्याला पुरते माहीत होते. उलट याच्या मगरमिठीतून सुटलो की आपणच याला आवळून याचा पुरेपूर बदला घेऊ. त्याला जिवेच मारू आपण. मनाशी ही योजना पक्की आखूनच बेदरकारपणे त्याने

आपले गुपित फोडून टाकले होते. त्यामुळे आता फास्टर फेणेने पाय मोकळे करून त्याच्या खांद्यावरून उडी मारली. तेव्हा तो पूर्ण सावध होता. त्याच्या मठ्ठ डोक्याने बराच मार खाल्ल्यामुळे डोळ्यांपुढे काजवे चमकले होते खरे, पण पुरती अंधारी काही आलेली नव्हती. बन्याच्या झटपट पलायनाने तो चुकला नाही. बन्या पळणार एवढी कल्पना त्याला होतीच; फक्त कोणत्या दिशेने पळणार एवढेच पाहायचे होते.

आता क्षणार्धात त्याने बऱ्याच गोष्टी केल्या. आपले भणभणारे मस्तक हलवून ताळ्यावर आणले, झिणझिण-णारे हात थडाथड झटकले आणि फास्टर फेणे गेला होता त्या दिशेने वाघासारखी उडी टाकली.

पण फास्टर फेणे हरणासारखा पळाला होता. त्याने पाच सहा झाडांना पटापट प्रदक्षिणा घालून उंचाड्याला चक्रावले. दोन तीन मिनिटे या लपंडावात निघून गेली. मग एक झडप घालून उंचाड्याने आपल्या रक्ताळलेल्या हातांनी बन्याला सरळ उचलले आणि मघाशी त्याने त्याला आव-ळले होते तसे आता त्याला उराशी घट्ट आवळून तो उड्या मारीत नदीकाठाकडे निघाला.

काठापर्यंत म्हणजे कड्यापर्यंत. होय—नदीचा हा काठ नदीच्या पात्रापासून जवळजवळ सत्तर फूट उंचीवर होता. उघडाबोडका काळाकभिन्न कडाच होता तो. खाली पाहिले तर डोळे फिरतील अशी ती भयानक उंची होती. खाली नदीचे पाणी झुळूझुळू वहात होते. त्यात काही माणसे आंघोळी करीत होती, काही कपडे धूत होती. वारा घो घो



वाहात होता. काही काटेरी झाडे उंच कड्याला मध्येच कुठे-तरी बिलगलेली दिसत होती. त्या झाडावर चार दोन बगळे हवा खात बसले होते. वाऱ्याचा मोठा झोत आला की काटेरी फांद्या वाकत, पुन्हा वर येत अन् बगळ्यांना त्या झोक्यांची मजा वाटे.

पण फास्टर फेणेचे काय ? त्याला थोडीच मजा वाटत होती ? उंचाड्याने त्याला हातांवर उंच धरून उचलले, तेव्हा त्याच्या गोठत चाललेल्या काळजालाही असेच हेलकावे बसले. दोन्ही ओठ त्याने घट्ट मिटले.

'बडे बहादूर समझते हो नहीं ? अब ले लो तेरी बहादूरी का बदला !' उंचाडा खिदळला. 'अब ले लो तेरे भगवान का नाम ! आता आमचं सीक्रेट सांग तुझ्या या झेलम मातेला !'

बन्याला कुणी सांगायला नको होते. त्याला अगोदरच मारुती आठवला होता. शेवटच्या हेलकाव्याबरोबर उंचाड्याने ते शेवटचे वाक्य उच्चारले. ते पुरे होण्याच्या आतच त्या राक्षसाने फास्टर फेणेची मुटकुळी करून कड्याखाली भिरकावून दिली.

☐

# ९. फास्टर फेणेचा आपटबार

इन्स्पेक्टर ओमप्रकाश दोन शिपायांना घेऊन मालीसह झपाट्याने नव्या पुलाकडे निघाले होते. मघाशी फोनवरून मन्सूरने सांकेतिक शब्दांत जे सांगितले त्यावरून हा मामला फार भयंकर होता. पाकिस्तानी हेर या नव्या बांधकामात हिरीरीने गुंतलेले होते. आणि त्यांचा वेळीच बंदोबस्त केला नाही तर प्रकरण भलत्या थराला जाईल, अनेक जण तर प्राणाला मुकलीतच, पण काश्मीरच्या संरक्षणाला तडा जाईल हे स्पष्ट दिसत होते. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन ओमप्रकाशनी तातडीने पावले उचलली होती. शहा स्वीट मार्टवर छापा घालण्याची कडेकोट व्यवस्था करून ते निघाले होते. शहाबद्दल त्यांना पूर्वीपासून संशय होताच, आज तो खरा ठरला. मात्र पुरावा मिळवून देण्याचे श्रेय शेवटी मन्सूरलाच मिळाले.

‘ कोई बात नहीं आपण आता रिटायरमेंटला आलोत. आता सूत्रं तरुण पिढीकडेच सोपवायला हवींत. ’

मनात हे विचार गर्दी करीत असतानाच इन्स्पेक्टरसाहेबांनी बाजारच्या गर्दीतून गाडी काढली होती. आता शहरातली वर्दळ मागे टाकून ते झाडीत शिरले होते. त्यांच्या शेजारी बसलेली माली घारीच्या नजरेने दुतर्फा न्याहाळीत होती.

' मन्सूरसाब भी ब्रिज की तरफ गये है–कहते थे. ' ओमप्रकाश आसपास बघत म्हणाले.

' जी साब ' मागे बसलेला एक हवालदार म्हणाला, ' लेकिन उन्होंने शॉर्टकट काटा होगा. '

' शिवाय त्यांनी वेष पण पालटला असेल. ' मालीने आपला तर्क सांगितला.

मोटारची सडक बरीच वळणे घेऊन गेली होती. अखेरीस ती सारी वळणे पार करून जीप एकदाची बाहेर पडली आणि नदीचे पात्र दिसू लागले. आणि मग जीप नदीच्या काठाकाठाने जाऊ लागली. उजवीकडे चाललेले नव्या पुलाचे बांधकाम आता दृष्टीच्या टप्प्यात आले, डावीकडे रानच रान पसरले होते. नदीचा काठ म्हणजे उच्च नि भव्य कडा होता. मधूनच त्याला मातीचे ढेपाळ उतार होते. त्या उतारावर मधूनमधून काटेरी झुडपांचे पुंजके होते

' ओ ऽऽ! '

रस्त्यातल्या एका खड्ड्यात घुसलेली जीप बडूक–उडया घेत पुढे चालली तेव्हा ते धसके सर्वांनाच जाणवले. माली तर इन्स्पेक्टरांच्या अंगावरच कोसळली, त्यामुळे क्षणभर त्याच्या हातातले स्टीअरिंग निसटले. पण दुसऱ्याच क्षणी सफाईने चाक फिरवून त्यांनी जीप खड्ड्याबाहेर काढली. पण या प्रकरणात गाडीचा वेग एकदम मंदावला.

' सॉरी ' म्हणण्यासाठी मालीने तोंड उघडले होते. पण ' सॉ ' वरच तिचा जबडा वासलेला राहिला. किती वेळ? जेमतेम अर्धा क्षण. लगेच ती घाईघाईने म्हणाली–

' साहेब, मला काहीतरी दिसलं. '

' काय दिसलं ? भूत ?

' भूतच म्हणायचं. भारताच्या मानेवर बसलेलं भूत! तो बदमाष हेर दिसला मला. दिसतोय अजून. थांबवा, गाडी थांबवा. पण नको, मान खाली घाला इन्स्पेक्टरसाहेब !'

इन्स्पेक्टर ओमप्रकशनी मान खाली घातली. आपण एका टीचभर पोरीचे हुकूम बिनतक्रार पाळतो आहोत याची जाण त्यांना अंमळ उशिराच आली आणि मग त्यांना जरा ओशाळल्यासारखे झाले.

त्यांनी जीप उभी केली होती. खालच्या मानेनेच त्यांनी हलक्या आवाजात प्रश्न केला, ' व्हॉट्स द मीनिंग ऑफ धिस ?'

' इन्स्पेक्टरसाहेब, ' मालीनेही खालच्या मानेनेच उत्तर दिले. ' मघाशी मला जे भूत दिसलं त्याचा चेहरा माझ्या ओळखीचा होता. पाकिस्तानातून मुद्दाम आलेला जाडचा हेर आहे तो. '

रिअली ? ' इन्स्पेक्टरांचा हात कंबरेच्या पिस्तुलावर होता.

' आणि मग तो चेहरा झाडीत लपला अन् दुसरंच काही दिसलं मला. '

' काय दुसरं ? '

' नळी ! बंदुकीची नळी. आपल्या जीपवर रोखलेली. '

' पण मग इतका वेळ काय करतोय तो ? आपल्याला जर त्यानं कव्हर केलं असेल तर एव्हाना त्याची काही हालचाल व्हायला हवी होती. '

मागे बसलेल्या हवालदारांपैकी एक त्यांच्याप्रमाणेच नतमस्तक झाला होता. दुसरा मात्र ताठ होता. बाजूच्या त्या झुडुपाकडे तो रोखून पाहात होता. आता त्याला एकाएकी हसू फुटले.

' काय झालं ?' ओमप्रकाशनी झटक्यात मान वर केली.

' साहेब, ती बदुकीची नळी नाही, ती एक काळी वाळकी शेंग आहे.'

इन्स्पेक्टरांनी आवंढा गिळला, आपली फजिती गिळली आणि त्या अपराधी झुडुपाच्या दिशेने पाहिले.

' ओ: ! ' ते उद्‌गारले.

' लेकिन यह ताअज्जुब है, या छोटया झुडुपाला असल्या शेंगा कधीपासून लागायला लागल्या ? '

' ती मुद्दाम कुणीतरी तरी ठेवलेली आहे. आपल्याला बनवण्यासाठी. साहेब, पिस्तूल काढा.'

इन्स्पेक्टर ओमप्रकाशनी पिस्तुल काढले. त्या झुडुपाच्या दिशेने त्यांनी ते अर्धचंद्राकार फिरवले.

' मुद्दाम ठेवलीय, म्हणजे ठेवणारा असणारच तिथं. ' ते पुटपुटले

आणि क्षणातच त्यांना तो माणूस दिसला, झुडुपामागच्या रानात काहीतरी सळसळत होते. एका वृक्षाच्या खोडाआड एक मनुष्यकृती उभी होती.

' हँड्स् अप ! ' ओमप्रकाश ओरडले, ' और आगे आ जाव फौरन ! '

पांढरी आकृती हलली. विद्युत्‌गतीने एका झाडाआडून दूसऱ्या झाडाआड गेली. मग तिने मागे वळून न पाहता

तिथून झाडीत पळ काढला.

'डॅम्ड चीक !'

इन्स्पेक्टर ओमप्रकाशनी पिस्तूल झाडले. सटासट तीन गोळ्या उडाल्या. एक किंकाळी फोडून पांढरी आकृती जमिनीवर कोसळली.

इन्स्पेक्टरसाहेबांनी जीपमधून उडी मारली आणि ते रानात धावले. दोन्ही हवालदारांनी त्यांचे अनुकरण केले. माली दोन्ही हातांच्या मुठी वळून दातओठ दाबून वटारल्या डोळ्यांनी तो प्रकार पाहात जीपमध्येच बसून राहिली.

'साहेब, खबरदारीसे रहना, वह जिंदा है, उसके पास पिस्तूल भी होगा.'

'पिस्तुल होता तो ऐसी ट्रिक करनेकी क्या जरूरत थी ?' इन्स्पेक्टर म्हणाले. तरी पण ते सावधगिरीनेच चालले होते.. कारण हा माणूस जरी निःशस्त्र असला तरी न जाणो, त्याचा एखादा साथीदार आसपास असला तर ?

पण तसे काही झाले नाही इन्स्पेक्टर नि त्यांचे दोघे मदतनीस जवळ येऊन पोचले तेव्हा तो माणूस कण्हत पडलेला होता. त्यांना जवळ येताना पाहताच त्याने सरपटत जाण्याचा यत्न कला. पण त्याला ते जमले नाही. त्याच्या पोटरीत जखम झालेली असून तीतून भळभळा रक्त वाहात होते. बाजूला ढेपेच्या आकाराची त्याची उंच काळी टोपी पडलेली होती.

'मैं–मैं–मरता हूँ' तो कण्हला आणि त्याने डोळे मिटले.

'मरनेवाला नहीं यह बहोत बहोत जिंदा है' इन्स्पेक्टर ओमप्रकाशनी ग्वाही दिली 'इसको उठा के गाडी में

बिठाना और बँडेज बांधना.'

लगेच दोघा शिपायांनी त्याला उचलून जीपकडे चालवले.

पाठीमागच्या भागात सीटपुढे खालच्या जागेत त्यांनी त्याला निजवले अन् बाटलीतले कसलेसे लोशन ओतून फडक्याने त्याची जखम बांधली. तोपर्यंत तो बेशुद्ध झाला होता. एकाने त्याला आमोनिया हुंगवून शुद्धीवर आणण्याची कोशिश चालविली तर दुसऱ्याने त्याचे हात पाय काढण्यांनी करकचून बांधले.

पुढे बसलेली माली सीटवरून ओळंगून ते दृश्य पाहत होती. तिच्या छातीत धडधडत होते. किंचित कापऱ्या आवाजात ती म्हणाली, 'या जाडचाला मी तेव्हाच ओळखलं, सर! हाच तो दोन नंबरचा पाकिस्तानी हेर.'

जीप पुन्हा भर वेगाने रस्त्याला लागली.

नवा पूल जवळ येत चालला तशी मालीच्या मनाला एकच चिंता ग्रासू लागली. बन्या नि अन्वर काय करीत असतील ? पाक हेरांना पकडण्याच्या नादात ते स्वतःच त्यांच्या जाळ्यात सापडले नसतील ना ? □

बन्या ऊर्फ फास्टर फेणे फार मोठ्या उंचीवरून फेकला गेला होता, खाली सरळसोट उभा कडा होता. आणि मधून मधून पुढे आले होते उघडे बोडके खडक. अशा अवस्थेत तो जिवंत राहणे शक्य होते का ? खडकावर आपटून ठिकऱ्या उडणे हेच त्याच्या नशिबात नव्हते का ?

पण भिऊ नका. बालमित्रांनो, तसे काही झाले नाही. तुमच्या या वाळकुड्या पण शूर मित्राचे नशीब तसे लेचे-

पेचे नव्हते. खरे म्हणजे फास्टर फेणे तुमच्यासारखाच एक साधा मुलगा. तो कोणी भीमबीम नव्हता किंवा सुपरमॅन नव्हता. सत्तर फूट उंचीवरून पडताना कुणाही माणसाची होईल तशीच दारुण अवस्था त्याच्याही मनाची झाली होती. त्याने ओठ नि डोळे घट्ट मिटले होते अन् मनही मिटून घेण्याचा त्याचा आटोकाट प्रयत्न चालला होता.

पण त्याचे नशीब बलवत्तर होते. त्यामुळे हजारांत एखादाच व्हावा तसा चमत्कार या वेळी झाला. कड्याखाली निम्म्या उंचीवर वाकड्यातिकड्या फांद्यांचे एक फताडे झाड होते. झेलमकडे नॉनस्टॉप झेप घेणारी बन्याची तुफान मेल त्या झाडाला अडली. तिला खाडकन् ब्रेक दाबणे भागच होते. कारण सिग्नल दिलेला नव्हता.

झाडाची एक लांबच लांब फांदी आडवी आली होती आणि त्या फांदीला भरपूर काटे होते.

त्यांतले अर्धा डझन काटे बन्याच्या सुप्रसिद्ध चौकडी शर्टात घुसले. सदरा टरकला, पण पुरता फाटला नाही बन्याचे रोडके शरीर फांदीला लटकत राहिले.

बन्याने आपले मस्तक गदगदा हलवले. डोळे आपसूक उघडले, कारण त्याच्या मिटलेल्या डोळ्यांपुढे जी चांदण्यांची सर्कस चालली होती ती त्याला बघवेना. क्षणभर त्याला वाटले हे यमाच्या दरबारातले दिवे तर नाहीत ? आणि आपण शुद्धीत आहोत की बेशुद्धीत ?

आणि मग हां हां म्हणता ट्यूबलाईट पेटली

फास्टर फेणेला मिळालेला तो दुसरा टेलिग्राम होता. पहिल्या तारेने आपण मृत्यूच्या दारात पोचण्याचा संदेश

त्याला मिळाला होता. ही दुसरी एक्सप्रस तार त्याला बजावत होती, ' बन्या, तू जिवंत आहेस.'

हो, आपण जिवंत आहोत, पण पण महाभयंकर अवस्थेत आहोत, एका फांदीला आपण अधांतरी लटकत आहो, आणि ती फांदी मोठीशी मजबूत नाही. आणि ज्या आधाराने आपण तिला लोंबतो आहोत तो तर बिलकुल तकलादू आहे.

हे सारे विचार इतक्या तातडीने बन्याच्या मनात येऊन गेले, की मला ते कागदावर मांडायला, किंबहुना तुम्हांला ते वाचायलासुद्धा दसपट वेळ लागला असेल. फारच त्वरेने बन्या सावध झाला होता आणि त्याच्या मेंदूतली चक्रे विद्युद्गतीने फिरू लागली होती. पुढे काय करायला हवे हे जणू एखादा कॉम्प्युटर त्याला सांगत होता.

बन्याने पहिली कृती केली ती म्हणजे आपले दोन्ही हडकुळे हात ती फांदी पकडण्यासाठी वर उचलले. पण ते वर चढवेचनात. तो जितका जास्त जोर करी तितका सदरा आणखीच टर्रकन वाजे. शेवटी त्याने दोन्ही तंगड्या वर फेकल्या आणि त्यांच्याच चिमटीत फांदी आवळून धरली. हे करताना त्या पायांना अनेक ओरखडे उठले. वेदना झाल्या पण त्यांची त्याने पर्वा केली नाही. ते दु:ख विसरणे त्याला भागच होते. आपला टरटरा फाटत आलेला सदरा म्हणजे आपल्या नाकाशी धरलेले सूत आहे हे त्याला स्पष्ट दिसत होते. म्हणूनच फांदीचा त्यातला त्यात आशादायक आधार त्याने घाईघाईने पकडला होता.

पण त्यानंतर मात्र बन्याची पंचाईत झाली. पायांत किती

वेळ फांदी धरणार ? त्यांना रग लागली असती. डोक्यात रक्त उतरले असते तेव्हा आपले वाळकुडे अंग अलगद वर उचलून हातांनी फांदी धरण्यासाठी पुन्हा पुन्हा धडपड केली. पण त्याचे शरीर पुरते वळेचना एक तर ते आधीच चिकार ठेचकाळलेले होते. आणि हात वर करायचे म्हणजे पायांची पकड अधिक पक्की करायला हवी. सारी ओढ पायांना बसली असती आणि पायांकडून फांदीला. एवढे वजन फांदीला झेपेल की फांदीबाई मध्येच राम म्हणतील याची खात्री नव्हती. यामुळे काही क्षण बन्या नुसता खाली डोके वर पाय करून वाघळासारखा लोंबकळत राहिला. आणि भ्यालाही खूप !

त्याची भयभीत नजर आता खाली वळली. खाली पायथ्याशी पसरल्या आहेत ओबडधोबड दगडांच्या राशी. पाय सुटले तर आपल्या टकुऱ्याची टक्कर होणार त्या दगडांशी आणि ते टकुरे आतून छान नारळासारखे पाणीदार असले तरी त्याची बाहेरची बाजू– करवंटी-फारशी मजबूत नाही. बन्याला हे कळत होते. मती कुंठित होऊन त्याने बुबुळे फिरवली. वर पाहिले. वर पसरलाय तो काळाकभिन्न कडा !

पण थांबा त्या कड्यावरून खाली काय बरे वाकले आहे ? –एक डोके. कुणाचे ! आपल्या लाडक्या मित्राचे.

अन्वर !

बन्याच्या कातर मुखातून एक अस्फुट उद्गार निघाला, " अन्वर !"

ती हाक अस्फुट होती तरी अन्वरने ऐकली. तो वरून

सारे पाहातच होता. अर्थात तोही विलक्षण गांगरला होता; पण त्याची बुद्धी ताळ्यावर होती तो एकदम ताठ झाला. त्याने नदीकाठावरून दृष्टी फिरवली.

नदीवर त्या वेळी आंघोळी करणा-या नि धुणी धुणाऱ्या लोकांची बरीच गर्दी होती. त्यांत धंदेवाईक धोबीही होते. मोठेमोठे गालिचे नि सतरंज्या त्यांनी धुवायला आणल्या होत्या.

अन्वरने पटापट टाळ्या पिटल्या. त्यावरोबरच त्याने तोंडाने बोंबाबोंब सुरू केली.

' जल्दी करो ! मेरा दोस्त गिर रहा है– उसको बचाओ कालीन गालिचा–' आणि बोलता बोलता त्याने दोन्ही हात पसरले.

अन्वरने केलेला धावा कारणी लागला. जनताजनार्दनाने त्याची हाक ऐकली आणि फास्टर फेणेच्या सुटकेचे प्रयत्न जारीने सुरू झाले.

नदीत पोहणाऱ्या दोनतीन मुलांनी वन्याच्या अधःपत-नाचा देखावा यापूर्वीच पाहिला होता. त्यांच्या तोंडून भीतीचे नि आश्चर्याचे उद्‌गार निघाले होते. किनाऱ्यावर येऊन त्यांनी घाबऱ्या घाबऱ्या ती खबर वडीलधाऱ्यांना दिली होती. आणि त्यांचे लक्ष वर वेधले होते.

कड्याखाली झाडाला लटकत असलेला पोरगा त्यांना दिसत होता. त्याला वाचवावे कसे हे त्यांना कळत नव्हते म्हणा किंवा तेवढे चापल्य त्यांच्याजवळ नव्हते म्हणा– नुसतेच वावरल्यासारखे ते वर पाहात होते. मग एकाच्या डोक्यात प्रकाश पडला होता. झाडापासून खाली उभट



कडा असला तरी पायथ्यापासून दगडगोटे तुडवीत जाण्याइतकी थोडीशी चढण होती. पण वाट अती अवघड. आणि तरी त्या अवघड वाटेने जाऊन पोराला वाचवण्याची कोशिश करणे हे आपले कर्तव्य आहे एवढे त्यांना कळत होते.

दोन इसम कातळावरून उड्या मारीत धडपडत वर निघालेही होते. पण आता भीती ही होती की, तिथे पोचायच्या आतच पोराच्या पायांची पकड सुटून त्याचा कपाळमोक्ष होतो की काय ?

यामुळे अन्वरने सुचवलेली युक्ती सर्वांना ' ए वन ' वाटली.

—दहाबारा धोब्यांनी लगेच धावत जाऊन एक भली मोठी सतरंजी उचलली. पळत येऊन ते पुन्हा कड्याच्या पायथ्याशी पोचले. सर्वांनी आत अंतराअंतरावर मोर्चे धरले. पाचसहाजण दगडगोटयांची वाट चढून आधीच वर पोचलेल्या गड्यांना मिळाले. प्रत्येकाने सतरंजीचा काठ आपल्या बळकट हातांनी घट्ट धरला होता. सतरंजी ताणली गेली होती आणि सर्वांच्या तापलेल्या नजरा वर लागल्या होत्या.

बऱ्याची नजर खाली लागली होती. आपल्याला वाचवण्यासाठी ही फौज जिवाची शर्थ करीत आहे हे त्याला कळले होते आणि त्याच्या मरगळलेल्या मनगटात नवी ताकद आली होती. आणखी मिनिटभर तरी फांदीला चिकटून राहण्याची हिंमत त्याच्यात आता आली होती.

तिकडे काळपुरुष जणू ' काऊंट ..डाऊन ' करीत होता-

दहा–नऊ–आठ सात–सहा–पाच.

बन्या पण मनात आकडे मोजीत होता. सतरंजीवाली सेना आपापल्या मोर्च्यांवर खंबीरपणे उभी आहे अशी खात्री होताच त्याने फांदी सोडली.

'नाहीतरी आणखी चार सेकंदात ती सुटणारच होती.' कालपुरुष आपल्याशी हसत म्हणाला, 'पण या लोकांनी माझ्यावर मात केली.'

बन्या ऊर्फ फास्टर फेणे फुटबॉलसारखा खाली आला आणि सतरजीवर आपटून व्हॉलीबॉलसारखा उडाला. पुन्हा खाली– पुन्हा वर–

दोन तीन आपटचा खाल्ल्यावर ती बन्याचा चेंडू स्थिरावला आणि दोनतीन मिनिटे बाळ पाळण्यात गप्प राहिले.

आपला पुनर्जन्म झाल्याची बातमी कुणालाही एकदम खरी वाटत नाही. कुणी झाला तरी काही मिनिटे गप्पच बसतो.

मग धोबीलोकांना भलतीच शंका येऊ लागली... इतकं सगळ करून हा पोरगा जिवत तरी आहे ना?

सतरंजी आवळून तिची झोळी करीत ते सर्वजण जवळ जवळ आले.

'कैसे हो बेटा? कैसा लगता है?' एकाने प्रश्न केला.

'लगता है कि मै सर्कस में काम कर रहा हूं!' बन्या उठून म्हणाला,

' माझ्या मित्रांनो!' तो एकदम गदगदून म्हणाला. 'तुम्ही आज माझे प्राण वाचवलेत. मी कित्ती केलं तरी हे उपकार फिटायचे नाहीत. पण सध्या' एकदम त्याला आठ-

वण झाली होती अन् त्याचा हात खिशात गेला होता,
' सध्या तोंड गोड करा !'

मन्सूरचाचांनी घेऊन दिलेली ती मिठाई होती. आत्तापर्यंतच्या घालमेलीत चेचून ठेचून, तिचा लगदा झाला होता.

पण त्याच्या धोबी मित्रांनी तो लगदा हसतमुखाने मिटक्या मारीत खाल्ला.

□

# १०. अन्वरचा अनावर विक्रम

कितीतरी वेळ अन्वर कड्यावरून डोकावत होता. त्याचे चित्त ठिकाणावर असते तर स्वत:च्या छातीत चाललेली धडधडसुद्धा त्याने स्पष्ट ऐकली असती. पण त्याचा जीव गुंतला होता फास्टर फेणेच्या त्या फाटक्या शर्टात. धोब्याची धावाधाव नि ताणाताण त्याने कंठात प्राण आणून पाहिली होती अखेर त्या लोकांना यश मिळाले अन् फास्टर फेणे सतरंजीवर मजेने उड्या मारू लागला, तेव्हा कुठे अ वरचा जीव खाली पडला. हो ! खरोखरीच खाली पडला असता–इतका बेभान होऊन तो कड्याखाली पाहात होता. आता सावध होऊन तो चार पावले मागे हटला अन् हर्षभराने ओरडला, ' जीते रहो फास्टर फेणे !'

खाली बन्याने मिठाईची वाटणी पुरी केली आणि हातापायांना झालेल्या वेदना विसरून टुणदिशी पाळण्याबाहेर उडी टाकली. त्याच्या अगात आता नवेच वारे संचारले होते. सकटसमाप्ती झाली होती. करुणरसाबरोबर थोडा हास्यरसही उधळून झाला होता. आता बन्याला जाणीव होत होती कर्तव्याची.

बन्या ताठ उभा राहिला. मान माग नेऊन त्याने वर कड्याकडे पाहिले. अन् दोन्ही हातांचा कर्णा करून तो

ओरडला, ' छलांग मारना अन्वर ! फोरन दौडना ! एक अर्जंट काम कर दो ! मन्सूरचाचा से–'

एवढेच बोलून त्याने जीभ चावली. त्याच्या एकदम लक्षात आले की आपल्याला जो संदेश देणे आहे तो बोंबाबोंब करीत देण्यासारखा नाही. तो खास जासूसी संदेश आहे– टॉप सिक्रेट. पब्लिकच्या कानांसाठी नाही तो.

पण तो तातडीने पोचवायला तर हवाच, नाहीतर भलतीच आफत गुदमरणार होती.

काय करावं? कशा रीतीने हा संदेश ' पासॉन ' करण्यासाठी अन्वरला द्यावा ? ... बन्याने डोके खाजवले. त्याची नजर इतस्ततः भिरभिरली. पण त्याला काही सुचेना. बेचक्यात घालून चिठ्ठी उडवावी तर चिठ्ठी लिहायला कागद नव्हता. अन् जवळ बेचके पण नव्हते. शेवटीं एखाद-दुसरा शब्द नि बन्याचशा खाणाखुणा यांचा उपयोग करण्याचे त्याने ठरवले आणि मग नदीवरच्या बघ्यांना काही क्षण एक मजेदार ' टॅब्लो ' पाहायला मिळाला.

पुलाचे बांधकाम चालू होते त्या दिशेला डाव्या हाताचे बोट नाचवीत बन्याने अन्वरवर डोळे वटारले आणि चेहरा असा भयंकर केला, की जसा काही नरसिंहाचा अवतार ! मग ' वर्कर्स–वर्कर्स ' अशी दोन–तीन वेळा गर्जना करून आपल्या पँटीच्या शिवणीवरून दोन बोटांची चिमटी अर्थपूर्ण रीतीने फिरवीत तो ओरडला,

' समझा ?'

' बहुत कुछ समझा ! ' अन्वर ओरडला आणि आपला उजवा हात त्याने अशा सफाईने फिरवला की जणू तल-

वारीचा वार करून आपण शत्रूचा निकला लावतो. तू काही काळजी करू नकोस, असेच त्याला सुचवायचे होते. मग, आपल्याला मुद्द्याची गोष्ट कळली आहे हे दाखवण्यासाठी त्यानेही आपल्या पॅटीचे काठ चिमटीत धरले अन् एकदम सोडून दिले. मग त्याने स्फोट झाल्यासारखी जागच्या जागी ताडकन् उडी मारली. मग प्रश्नार्थक मुद्रा करून उत्तरासाठी फास्टर फेणेंकडे पाहात तो उभा राहिला.

'य गॉट इट्!' फास्टर फेणे ओरडला. 'नाऊ रन मॅन! भाग पहिले यहाँ से !'

अन्वर पुलाच्या दिशेने उड्या मारीत निघाला.

पाचच मिनिटांत तो त्या कर्मभूमीवर पोचला. यंत्रकामाचा केवढा प्रचंड रगाडा त्या ठिकाणी चालू होता ! बुलडोझर जमीन सपाट करीत होते. अर्थमूव्हर मातीचे ढीग उपशीत होते, कॉंक्रीट–मिक्सर खडीरेतीचा मसाला भरडीत होते. ट्रकलॉऱ्याची आवजाव सारखी सुरू होती. शेकडो मजूर घमेली भरभरून इकडून तिकडे धावत होते. ओव्हरसीयर नि सुपरवायझर मधूनच कुणावर तरी गुरकावत होते. एका जागी कॉंक्रीटचे टोकदार खांब जमिनीत घुसवण्याची कामगिरी करण्यात पाईल ड्रायव्हर गुंतला होता. नदीकाठची मोकळी जागा असल्यामुळे आवाज फारसा जाणवत नव्हता; नाहीतर यंत्राच्या नि माणसाच्या त्या संमिश्र गोंगाटाने कान किटले असते.

मुलांच्या नजरा खिळवून ठेवील असे पुष्कळ काहीतरी तिथे घडत होते पण अन्वर ते पाहण्यात रमला नाही. त्यान धावत पळत जाऊन आधी मन्सूरचाचांना गाठले. नव्या मजु-

रांची रिक्रूटभरती ज्या ठिकाणी चालू होती, तिथे कंत्राटदाराशी बोलत डिटेक्टिव्ह मन्सूरचाचा उभे होते. अन्वरने त्यांचा बाहू पकडून त्यांना मागे ओढले आणि तो त्यांच्या कानात कुजबूज करू लागला.

'क्या कहते हो ?' मन्सूरने डोळे वटारले.' त्याच्या कपड्यांची झडती घेतोच आहोत आम्ही. पण .. पण एवढी कल्पना नव्हती–मैमनसिंग !'

पलीकडे उभा असलेला साध्या वेषांतला हवालदार लगेच पुढे झाला आणि त्याने मन्सूरकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले. पोलिसी कारवाई इतक्या गुप्त पद्धतीने चाललेली होती की हवालदाराने वरिष्ठाला सलामसुध्दा ठोकला नाही.

नव्या मजुरांना अगोदर नोंदणीसाठी म्हणून एका राहुटीत नेले जाई. तिथे त्यांच्या नाव–पत्त्याची तर नोंद होईच, पण संपूर्ण झडतीं घेतली जाई आणि मगच ते बाहेर पडून मुकादमाच्या स्वाधीन होत. मुकादम मग त्यांना ताबडतोब कोणते तरी काम नेमून देई.

डिटेक्टिव्ह मन्सूरने आता हवालदार मैमनसिंगाशी घाईघाईने बातचीत केली आणि मैमनसिंग तडकाफडकी कामाला लागला. त्याने आपल्या हाताखालचे पाच सहा साध्या पोशाखातले शिपाई गोळा केले आणि मुकादमाशी चर्चा करून त्या लोकांना निरनिराळ्या ठिकाणी पिटाळले. मग मैमनसिंग स्वत: त्वरेने नोंदणीकाम जिथे चालू होते त्या राहुटीकडे गेला. आतून नुकतेच दोन इसम बाहेर पडत होते. त्यांना धरून त्याने परत राहुटीत नेले. तिथे त्यांच्या पँटीचे काठ नि धोतरांच्या गाठी तपासून पाहिल्या. संशयास्पद

काही आढळलें नाही. तेव्हा त्याने त्यांना जाऊ दिले. राहुटीत प्रवेश मिळवणाऱ्या नव्या उमेदवारांची आता कसून तपासणी सुरू झाली.

' यह कडक क्या लगता है ? कांडी काहे क्या ? ' एका इसमाला हवालदाराने दरडावून विचारले.

' कुछ नही सरकार ! वह तो.. त ..' तो त–त–प–प करायला लागला, तेव्हा टेबलावरचा चाकू घेऊन हवालदाराने चक्क त्याच्या चड्डीचे काठ टरकावले. आतून निघाली पेन्सिलीच्या थोटकाएवढी एक कांडी.

' क्या चीज है यह ? और छुपा के क्यों रखी थी ? ' हवालदार गुरकावीत होता आणि त्या माणसाच्या अंगातून घामाच्या धारा वाहात होत्या. तोंडातून तर अक्षर निघणे शक्य नव्हते, एवढी त्याची बोबडी वळली होती.

' डायनामाइट की कांडी. '

टेबलाशी बसलेला सार्जंट पोलिसी गणवेषात होता. तो आता उठला आणि पुढे येऊन त्याने त्या ' वावळट ' इसमाच्या फाडदिशी मुस्काटात दिली. त्याच्या डोळ्यांपुढे काजवे चमकू लागले. गाल चोळीत अन् कण्हत कुंथत तो बाजूला झाला. तेव्हा सार्जटने त्याला एक धक्का मारून हवालदाराकडे ढकलले अन् हुकूम सोडला, ' ले जाव इसको थानेपर.'

हवालदाराने तावडतोब त्याची बाहेर उभ्या असलेल्या व्हॅनकडे रवानगी केली.

त्याच्या मागच्याकडे सार्जंटचे बारीक लक्ष होते. पँटीच्या शिवणीवरून तो काहीतरी फिरवतो आहे ही गोष्ट त्याच्या मघाशीच ध्यानात आली होती. बहुतकरून पुरावा नष्ट

करीत असावा. आता त्याने त्या माणसाचे मनगट धरून हिसकलें. त्याच्या हातातली ब्लेड चिमटीत धरून त्याने बाजूला केली. मग चिमटी तशीच हवेतून फिरवीत तो खेकसला, 'जी चाहता है, इसी ब्लेड सें तेरा गला काटूं! गद्दार! लेकिन यह मैं नही कर सकता. कानून से काम होना चाहिये.'

तो इसम जास्त बेरकी होता. तो पुटपुटला, 'यह हमे कुछ मालूम नहीं साब. जिस दर्जी ने यह पँट सिलाई उसनेही कुछ कारवाई की होगी.'

यावर त्याला बक्षीस मिळाले एक सणसणीत लाफ्याचे आणि गाल चोळीत तोही पोलिस व्हॅनकडे रवाना झाला.

झडतीचे सत्र पुढे चालू झाले. आलेल्या उमेदवारांत सर्व प्रकारचे लोक होते. कुणी साधे निष्कपटी गरीब मजूर, तर कुणीं कटवाल्यांकडून लाच घेतलेले बदमाष. सार्जंट उग्र प्रवृत्तीचा माणूस होता. गैरशिस्तपणा त्याला बिलकुल खपत नसे आणि बदमाषी नि गद्दारीचा तर त्याला अतोनात तिटकारा होता. इन्साफ करणे त्याच्या हातात असते तर त्याने तमाम फितुरांना एकत्र करून त्यांच्याच डायनामाइ-टांनी त्यांची होळी केली असती. पण सुदैवाने कायद्याची सूत्रे त्याच्याकडे नव्हती. अपराध्यांना पकडून देणे एवढेच त्याचे कर्तव्य होते. झडत्यांचे नि धरपकडीचे हे एक सत्र एका झाडाआडून चलाख डोळ्यांची एक दुक्कल निरखून पाहात होती हे कुणाच्याही लक्षात आले नाही.

रिक्रूटभरती संपली तेव्हा एकूण दहा 'उमेदवारां'ना पोलिसांनीं अटक केली होती. स्फोटक द्रव्याच्या पन्नास एक

कांड्यांची रास टेबलावर साठली होती. अन्वरने ही खास 'टिप' देण्यापूर्वी ज्या लोकांना उडत उडत झडती घेऊन कामावर दाखल केले त्यांची पुन्हा फेरतपासणी करण्यात आली. त्यासाठीच मघाशी हवालदाराने शिपाई पिटाळले होते. या फेरझडतीत आणखी तीन अपराधी सापडले. त्यांनाही कडक बंदोबस्तात पोलिस व्हॅनकडे नेण्यात आले. पण तत्पूर्वी त्यांनाही सार्जंटच्या वखवखणाऱ्या हाताचा खुराक मिळाला होता.

एक इसम धरपकडीचा वास येताच रानात पळाला होता. त्याला दंडुकाधारी पोलिसांनी धावत जाऊन तीन बाजूंनी घेरले. दंडुक्यांचा तिहेरी प्रसाद तर त्याला मिळालाच, पण सार्जंटसाहेब वाटीत असलेली खिरापतही मिळायची चुकली नाही.

आपली कामगिरी फत्ते झालेली पाहून खूष झालेला अन्वर मन्सूरचाचांचा निरोप घेऊन आता उंच गवताच्या गर्दीतून नदीकडे पळाला होता. कडेलोट झालेल्या मित्राला केव्हा जाऊन गाठतो अन् त्याने कुशल कधी पुसतो असे त्याला झाले होते.

पळता पळता तो मध्येच थबकला. बाजूच्या गवतात काहीतरी खसबस झाल्यासारखी त्याला वाटली. तो खाली वाकून दबकत दबकत निघाला. गवतातली सळसळ आता चाळीस एक फुटांवरच्या एका किरट्या झाडापर्यंत पोचली होती आणि गवतातून वर आला होता एका माणसाचा हात. त्या हाताने झाडाचे खोड धरले आणि मग गवतातून हळू-हळू उभे राहिले रक्ताने माखलेले एक डोके. तो चेहरा

दृष्टीला पडला मात्र, अन्वरच्या क्रुद्ध मुखातून उद्‌गार निघाला– ' हरामखोर !'

तो उंचाडा हेर होता आणि त्याच्या दुसऱ्या हातात होतें एक पिस्तूल. ज्या पिस्तुलाच्या मुठीचे रट्टे फास्टर फेणेने त्याच्या निब्बर डोक्याबर सणासण हाणले होतें तेच ते पिस्तूल, फास्टर फेणेच्या कडेलोटानंतर साहजिकच उंचाड्याच्या हातात आले होते ते.

अन्वरच्या तोंडून अचानक निघलेला उद्‌गार त्याने ऐकला आणि झटकन् मागे वळून पाहिले. अन्वर दिसताच 'बंदर नंबर दो–आँ ! ' असे म्हणून त्याने पिस्तूल ताठ धरले अन् सटासट दोन गोळ्या झाडल्या. त्या गोळीबाराने अन्वर इतका घाबरला की त्याची मान थडथडा हलली. दोन्ही गोळ्यांपैकी एकही त्याला लागली नाही, किंवा चाटून गेली असली तरी त्या वेळी तरीं त्याला कळले नाही. एक डावीकडून तर दुसरी उजवीकडून ' सूं ' करीत निघून गेली खरी. त्याच्या गुटगुटीत मानेला जाणवला फक्त गरम गरम वारा.

त्या वाऱ्याबरोबरच त्याने एक दारुण किंकाळी फोडून अंग खाली फेकून दिले. अन्वर गवतात पालथा पडला आणि निपचित पडून राहिला.

त्याची मर्मभेदक किंकाळी उंचाड्याने ऐकली होती. तत्क्षणी त्याची खात्री झाली की एक तर पोरगा गोळी लागून मेला असावा किंवा मूर्च्छित पडला असावा.

' कुछ भी हो, वह बेकार बन गया है ' तो आपल्याशीच पुटपुटला, ' और उसकी फिक्र करने के लिये मुझे टाइम भी



नहीं. मेरे सब साथी पकडे गये हैं और अब यह काम फतेह करनेंका जिम्मा है खास मेरे कंधोंपर. '

त्याने नदीउताराकडे धाव घेतली न घेतली तोच अन्वर उठून उभा राहिला. तसे करताना त्याला कष्ट पडले, कारण कुठेतरी काहीतरी दुखत खुपत आहे असे त्याला जाणवू लागले होते.

उंचाडद्याने नदीकडे धाव घेतलेली त्याने पाहिली. त्याने आ वासला आणि त्याच्या तोंडातून जोरजोराने उच्छ्वास निघू लागले.

अन्वरला चक्रावल्यासारखे झाले होते. त्याने कशीवशी मान फिरवून उजवीकडे पाहिले. इथेही नदीकाठाला उतार होता. त्या उतारावरून मोटरची सडक सापासारखी वळणे घेत गेलेली होती. आणि आता या क्षणाला एक जीपगाडी त्या वळणावरून नुकतीच बाहेर पडलेली नजरेच्या टप्प्यात आली होती. जीप चालवीत होते कुणीतरी पोलिस अधिकारी आणि त्याशिवाय गाडीत शिपाई पण होते. आणि...

माली ! ...फास्टर फेणेची बहीण माली !

' माऽऽ ली ! ' अन्वरने सर्व शक्तीनिशी हाक मारली.

माली वळून आपल्याकडे पाहते आहे अन् बोट दाखवते आहे हे अन्वरला कळले, पण दुसऱ्याच क्षणी गाडीने द्रुतगतीने एक वळण घेतले आणि ती दिशेनाशी झाली.

इकडे अन्वरला अकस्मात् काहीतरी तडतडलेसे वाटले. आपली कानशिले सपाटद्याने तापताहेत आणि काहीतरी झणझणत आहे... मुंग्या चावाव्यात तसं काहीतरी आणि— आणि आपल्याला गरगरतं आहे, चक्कर येत आहे. काय

होतंय ते कळत नाही...

अन्वर धाडदिशी गवतात कोसळला. □

'थांबा – थांबा ! ' माली ओरडली, ' त्या झाडीत मला कुणीतरी दिसलं ! '

'कुणीतरी ? कोण कुणीतरी ? '

'अन्वर होता तो. अगदी नक्की अन्वर ! आमचा काश्मिरी दोस्त आणि त्याला काहीतरी झालंय हो साहेब!'

फास्ट चाललेल्या जीपला ब्रेक लागले. ती खाडदिशी उभी राहिली. इन्स्पेक्टर ओमप्रकाशनी उडी मारली. दुसरे अधिकारी नि हवालदारही उतरले. माली त्याआधीच उडी टाकून बाजूच्या रानात पळाली होती.

'क्या तेज लडकी है ! ' ओमप्रकाश उद्गारले. ' इसको भी एक नाम देना चाहिये – फास्टर माला या महिला ! '

तिथले खुरटे रान तुडवल्यावर चांगले कंबरभर उंचीचे गवत त्यांनी गाठले होते. इथे अतरावर उंच झाडे पण होती. चीड, पॉपलर अन् चंदेरी ओक.

अशाच एका वृक्षाआडच्या हिरवळीवर माली वाकली होती.

'अन्वर– अन्वर ! काय झालं रे तुला ? फार लागलं का ? '

' माला, यहाँ टाईम वेस्ट नही करना ' अन्वर कण्हत म्हणाला, ' मला फार लागलेलं नाही. पण आधी त्या बद-माषाला गाठा. तो पुलाखाली चाललाय. '

' आर यू ओ के, माय बॉय ? ' तेवढ्यात तिथे आलेल्या

ओमप्रकाशनीही विचारले.

‘ मैं अच्छा हूँ साब. पहिले उसको गिरफदार करना ! वह बहुत खतरनाक आदमी है. मुझे उसीने गोली मारी. ! ’

‘ हवालदार, याला पट्टी वगैरे बांधून गाडीत ठेवा. और बाकी लोक मेरे साथ चलना. ’

इन्स्पेक्टरसाहेब आता ताठ होऊन पुलाच्या दिशेनें पाहात होते.

‘ उसी दिशा में गया, साब. ’ अन्वर उठता होऊन म्हणाला. त्याचे लक्ष इन्स्पेक्टरांच्या नजरेकडे होते.

‘ और–और–फास्टर फेणे खतरे में है. त्याला त्याने बरतून नदीत फेकलंय. ’

‘ काय सांगतोय. ? ’ माली ओरडली.

‘ सच बात है. लेकिन वह बचा है, और पहले से ज्यादा दौड रहा है. पण – पण तरी तुम्ही जल्दी करा, साहेब. ’

अन्वर एक आवाक्यात इतके बोलला होता की त्याच्या कानशिलाजवळ झालेली बारीकशी जखम फाटली होती आणि तीतून भळभळा रक्त वाहात होते. एका धट्टाकट्ट्या हवालदाराने त्याला ताबडतोब उचलून जीपकडे नेले. तिथे त्याने अन् मालीने अन्वरवर मलमपट्टी केली. तोपर्यंत पुन्हा त्याला ग्लानी आली होती.

मालीने जीपमध्ये हात पाय बांधून ठेवलेल्या दुसऱ्या हेराकडे डोळे वटारून पाहिले. याला ओमप्रकाशनी खूप छेडले होते, पण त्याने दाद दिली नव्हती. आणि त्याला जास्त छळावे तर तेवढा आता वेळ नव्हता.

इकडे ओमप्रकाश आपल्या धष्टपुष्ट देहानिशी विलक्षण

चतुराईने रानातून उताराकडे धावत होते. बरोबरच्या चार पाच शिपायांना त्यांनी इशारा करून अंतराअंतरावरून पण त्या एकाच दिशेला पिटाळले होते. शिपाई झपाट्यानें रांगत सरपटत गवतात लुप्त झाले होते. चार पाच ठिकाणी सळसळ झालेली मालीने पाहिली होती. पण ते सगळे पोलिस असणार असा तिचा तर्क होता. होय, होतेच. कारण मधूनच त्यांची खाकी पागोटी वर डोकावताना दिसत. मधूनच एखाद्या बंदुकीचे टोक गवताबाहेर निघे. पण अन्वरवर गोळी झाडणारा तो हेर मात्र कुठे लुप्त झाला होता, कुणास ठाऊक ! अद्यापि कुणाला त्याचे नखही नजरेला पडले नव्हते.

आणि मग –

एकाएकी उंच माणूस नदीकिनाऱ्यावर खडकावरून कुदलेला मालीला दिसला. तोच तो उंचाडा हेर ! तिला दुसरेही काहीतरी दिसले अन् त्यामुळे तिचे हृदय आनंदाने उडाले. खडकावरून उडी मारताना त्याच्या हातातली एक वस्तू उडाली होती, दगडांच्या गोंधळात कुठेतरी पडली होती. आकाशाच्या पार्श्वभागावर त्या काळ्या वस्तूची ओळख मालीला तेव्हाच पटली. पिस्तूल !

किंचित थबकून तो माणूस मागे वळून पाहात उभा राहिला होता. भिरभिरत्या नजरेने त्याने शोधले होते. मग त्याने मान हलवून सरळ उडी मारली होती. अधिक थांबण्याइतका त्याला वेळ कुठे होता ?

' वह देखो आदमी ! ' माली ओरडली.

अर्थात् तिचे ओरडणे खूप पुढे गेलेल्या पोलिसांना ऐकू

जाणे शक्य नव्हतें. पण त्यांना त्या सूचनेची गरज नव्हती. त्यांच्यापैकी एका हवालदाराने त्या माणसाला स्पष्ट पाहिले होते.

हवालदार लगेच उड्या मारीत उंचाड्याच्या दिशेने निघाला. दोघांमध्ये शंभर यार्डांचे अंतर राहिले.

हवालदार एकदम थबकला. बंदूक झाडावी की नाही, या विचारात त्याचे काही सेकंद निघून गेले. तेवढ्यात मागच्या बाजूने ' झूंऽ ' आवाज होऊन एक पिस्तुलाची गोळी सुटली. हेराच्या ती पाठीतच घुसली असती, पण तो तेवढ्यात एक छलांग मारून खडकाआड झाला होता.

पिस्तूल ओमप्रकाशनी झाडले होते.

बऱ्याच खोल खड्यात त्या इसमाने उडी मारली असावी आणि मग दगडधोंड्याच्या आडोशाने सखल जागेतून लपत छपत तो पळाला असावा. कारण पुन्हा बराच वेळ तो दिसला नाही.

' उसके हात में कुछ है, साब ' जवळ आलेल्या ओमप्रकाशना हवालदाराने सांगितले.

' मुझे मालूम है. ' ते न थांबता म्हणाले. दोघेही त्वरा करून चालत होते. ' त्याला काय वाट्टेल ते करून रोखलंच पाहिजे.. ओ हेल् ! '

इन्स्पेक्टरसाहेबांनी तो चिडका उद्गार काढला. कारण त्यांचे पाऊल एकदम एका काटेरी झुडपात अडकले होते. ते सोडवून घेण्यात दीडएक मिनिट गेले.

' ठहरिये साब—मै—' म्हणत त्यांच्या मदतीला धावलेल्या हवालदाराला त्यांनी ' तू कशाला इथं कडमडतोयस ?

बेवकूफ ! पहिले उसका पीछा कर ' म्हणून हाकलून दिले होते.

हवालदार बाजूला झाला अन् खाली धावण्यासाठी त्याने एक उडी मारली. ती नेमकी एका डवक्यात पडली. स्वतःला सावरून उभे राहण्यात अन् बिनकाटच्याची नि बिनचिखलाची वाट शोधण्यात त्याचीही दोन बहुमोल मिनिटे गेली.

दोघे कॉन्स्टेबल एव्हाना उड्या मारीत खाली नदीच्या वाळवंटात पोचले होते.

' वह देखो – दौड रहा है ! ' एकाने बोट दाखवीत म्हटले.

उंचाडा वाळवंटातून पुलाच्या कमानीकडे धावला होता. तो आता पूर्णपणे वेडापिसा झाल्याप्रमाणे वाटत होता. आपले बिंग उघडकीला आले आहे अन् लवकरच आपल्या हातापायात बेड्या पडणार आहेत हे त्याला चक्क दिसत होते. आणि तरी आपले दुष्ट कारस्थान तडीला न्यायचे, त्यात मृत्यू आला तरी बेहत्तर अशा निर्धाराने तो धावत होता.

नदीवर आता एकच गडबड उडाली होती. पाण्यात आंघोळीसाठी नि कपडे धुण्यासाठी आलेले लोक आपली कामे टाकून, धावा मारून किनाऱ्यावर चढले होते. पण त्यांच्यापैकी कुणीही त्याला माणसाला अडवू शकले नव्हते. उलट एकमेकांच्या पायांत कडमडून अन् मध्येच आडवे येऊन त्यांनी त्या हवालदारांची मात्र कुचंबणा केली होती.

' हट जाव ! मरना है तुम्हे ? बाजू हो जावा ! ' एक हवालदार ओरडला.

पण लोक बाजूला हटण्यात आणखी वेळ गेला. तेवढ्यात उंचाडा माणूस कमानीच्या भितीआड झाला होता. तोंडाने शिव्या हासडीत अन् एका हाताने लोकांना बाजूला सारीत (दुसऱ्या हातात बंदूक होती ना!) मोठमोठ्या खडकांवरून उड्यांची कसरत करीत दोघे हवालदार कमानीकडे निघाले. कमानीच्या भितीवर पाण्याचा लोंढा आपटत होता. त्याचा खळबळाट अकस्मात त्यांच्या कानात शिरला.

सारा प्रकार फारच द्रुतगतीने घडत होता आणि लोकांच्या आरडाओरडीमुळे त्याला पार्श्वध्वनीचीही जोरदार साथ मिळत होती. त्यामुळे अन्वरदेखील उठून बसला. जीपच्या खिडकीतून त्याने नदीकडे पाहिले, पण त्याला काही दिसले नाही.

माली मुळी जीपमधून उतरलीच अन् नदीकाठच्या कड्यावर जाऊन उभी राहिली. तिच्या हातात पोलिसांची छोटी दुर्बीण होती. तिने ती नदीपात्रात घडत असलेली घटना बाल्कनीतून सिनेमा पाहावा तशी पाहिली.

उंचाड्या हेराने पुलाची कमान गाठली होती. भितीच्या आड होऊन तिथल्या धोंड्याच्या गर्दीत तो खाली वाकला होता.

'आई ग !' माली किंचाळली.

उंचाडा हातांनी काय करीत असेल ते तिला दिसत नव्हते. पण ती कल्पना करू शकत होती. तो कमानीखाली फ्यूज ठेवीत होता. स्फोटक दारूची फ्यूज.

मालीच्या अंगावर सरसरून काटा उभा राहिला.

'मारा त्याला ! मारा कुणीतरी ! वह ब्रिज को

उडा देता है ! '

हेही तिने सांगण्याची गरज नव्हती. इन्स्पेक्टर ओमप्रकाशनी ते पाहिले होते आणि हवालदाराकडून हिसकून घेतलेली बंदूक त्यांनी रोखली होते. उंचाडा आता वाळवंटातल्या कॉन्स्टेबल–जोडीच्या दृष्टीआड झालेला असला, तरी चढणीवर उभ्या असलेल्या इन्स्पेक्टरसाहेबांना तो चांगला दिसत होता. त्यांच्या बंदुकीच्या टप्प्यातच होता तो.

आणि तरी पुन्हा माशी शिंकली. बंदुकीचा चाप ते ओढणार इतक्यात दुसरीच काहीतरी घटना घडली आणि त्यांचे बोट थवकले.

पुलाच्या कमानीखाली पलीकडच्या बाजूने बेसुमार वेगाने कुणीतरी धावत येत असलेले त्यांना दिसले. ती चिमुकली किडकिडीत मूर्ती कुणाची हे त्यांनी तेव्हाच ओळखले आणि म्हणूनच चापावरचे बोट ओढण्याचे सहन त्यांना करवले नाही.

' माय गॉड ! फास्टर फेणे ! '

होय, तो फास्टर फेणेच होता. तुफान वेगाने दौडत तो कमानीकडे आला होता. त्यानेही उंचाड्याची दुष्ट कृती पाहिली होती आणि आपल्या दणकलेल्या मणक्यांची किंवा तडकलेल्या तंगड्यांची पर्वा न करता तो कांगारूसारख्या टांगा टाकीत येत होता.

' बन्या ! ' फड्यावर उभा असलेल्या मालीने दबलेल्या ओठांतून उद्‌गार काढला.

काय करणार होता बन्या ऊर्फ फास्टर फेणे ? कुणास ठाऊक ! त्याचे त्याला तरी कुठे माहीत होते ? एखाद्या

प्रचंड जात्यात धान्य दळले जावे तसे अनंत पर्याय त्याच्या मेंदूत भरडून निघत होते. पिस्तूल बिस्तूल आपल्यापाशी नाही. साधं गलोलसुद्धा नाही. लांबून कसं टिपायचं याला? नाही, आणखी पुढे जायलाच हवं. जरा पुढे जाऊन मग थांबू, वाकू, एखादा धोंडा उचलू आणि घालू त्याच्या टाळक्यात. नकोच पण. ते करवेल की नाही कोण जाणे! त्यापेक्षा असेच खूप खूप जवळ जाऊ. मागे वळून पाहिल्याशिवाय काही आपण त्याला दिसणार नाही आणि त्याचं सारं लक्ष हातातल्या कामाकडे अन् पुढच्यातल्या पोलिसाकडे आहे. त्यामुळे तो मागे वळून पाहणारही नाही. आपण शेवटची उडी बेडूकउडी टाकू आणि त्याच्या मानेवर स्वार होऊ मग परीक्षितीचा गळा जसा त्या तक्षकानं दाबला तसा त्याचा गळा दाबू. हे साप असेच आवळून मारले पाहिजेत! अरेच्या! दृष्टान्त चुकला जरासा. गळा आवळणारा तक्षक सापच होता नाही का ?...अरे, पण हे काय डॅम! तो उठला की! आणि पळाला! खाली डोकं घालून पाण्यात सूर मारावा तसं कुठे चाललाय हा जमिनीवरून? एखाद्या धोंड्यावर डोचकं आपटलं म्हणजे? अरेच्या! हातात वायर आहे, नाही का? ... आय मस्ट स्टॉप हिम . स्टॉप हिम...

हे वाचायला तुम्हाला जितका वेळ लागला असेल त्याच्या शतांश वेळात विचारांच्या या फैरी बन्याच्या डोक्यात झडल्या होत्या.

आता विचार टाकून तो कृतीला लागला.

पुन्हा पाच सात लांब लांब उड्या मारून त्याने उंचा-

ड्याला गाठले. उंचाड्याने दोन दगडांच्या एका बेळक्यात उडी मारली होती आणि खाली वाकून तो वायराचे टोक आत ठेवीत होता.

हीच वेळ चाप ओढण्याची आहे असे ठरवून इन्स्पेक्टर ओमप्रकाशनी बंदूक स्थिर केली. आज त्यांना मुहूर्तच लागत नव्हता. उंचाड्याचे शरीर एकाएकी बेळक्यात अंतर्धान पावले आणि त्यांच्या जागी अवतरला बन्या ऊर्फ फास्टर फेणे.

'ओ हेल !' त्यांनी आपला पेटंट चिडका उद्गार काढला आणि हातातली बंदूक तशीच रोखलेली ठेवून ते चपाचप उड्या मारीत त्या बेळक्याकडे निघाले.

याच वेळी फास्टर फेणेनेही 'ट्रॉक !' हा आपला पेटंट उद्गार काढला आणि बेळक्यात उडी मारली.

आता उंचाड्याने खिशातून लायटर काढला होता. एक दोनदा 'चर्र' झाले होते, पण फ्यूज पेटली नव्हती. एक दोन शिव्या हासडीत त्याने पुन्हा 'चर्र' केले आणि फ्यूट पेटली. पण त्याच वेळी त्याच्या काळजातही कुठेतरी 'चर्र' झाले अन् मानेभोवती दोन वाळकुड्या तंगड्या आवळल्या गेल्या.

'हरामखोरा !' असे म्हणून बन्याने आपल्या वळलेल्या मुठीची पेरे—म्हणजे बोरूची टोकेच ती !—थडाथड त्याच्या नाकावर हाणली. मग आणखी पुढे वाकून नाक दातांत दाबून त्याने कडाकडा चावले.

'ओय्—ओय्' करून उंचाडा दोन्ही हात चेहऱ्यावरून जोरजोराने चोळू लागला, आणि त्यामुळे शेंदूर फासलेल्या

दगडासरिखा दिसू लागला. मात्र देव नाही दैत्य !

फास्टर फेणेने मग पायांची मिठी सैल केली आणि पलीकडच्या खडकावर उडी टाकली. ओठांवरून जीभ फिरवताना त्याने कडू तोंड केले.

' झाली एवढी रक्ताची टेस्ट पुरे झाली. ' तो वाहीनें तोंड पुणीत म्हणाला. ' आपण काही कॅनिबॉल नाही किंवा नरसिंह नाही ! उलट जास्त वेळ त्याच्या नरड्यावर बसलो असतो तर त्यानेच आपली वाट लावली असती. अन् पुन्हा वेळ कुणाला आहे ?

त्याची भिरभिरती नजर चटकन् एका ठिकाणी स्थिर झाली. एव्हाना वायर दीड एक फूट जळाली होती. फुलबा-जीसारख्या ठिणग्या उडवीत मृत्यू तिच्यावर स्वार होऊन कमानीकडे निघाला होता.

ठिणग्या इतक्या भयोत्पादक होत्या, की त्यांच्यावर बुटाचा पाय देण्याचीसुद्धा फास्टर फेणेची छाती झाली नाही. त्याऐवजी त्याने दुसराच प्रकार केला.

बेडकासारखा टणाटण उड्या मारीत तो मुळी कमानी-कडेच धावला, फ्यूजचे ते कमानीखाली गाडलेले टोक त्याने ओढून काढले. त्याबरोबर टोकाला जोडलेले डायनमाइटच्या कांड्याचे डबडे त्यांच्या हातात आले.

डबड धरणारा हात खूप खूप मागे नेऊन त्याने अंगा-तल्या सर्व शक्तीनिशी डबडे नदीच्या पाण्यात दूर दूर फेकून दिले. डबड्याबरोबरची वायरही पाण्यात लडबडू लागली.

फ्यूजने मोर्चा बदलला होता. वायरवर ठिणग्यांचा

फुलोरा उडवीत ती प्रवाहात गेली. पाण्यावर रांगोळी काढलेली लोकांनी बघितलेली होती. पण क्षणभर का होईना पाण्यावर फुलबाज्या ठिबकत असलेल्या काश्मीरच्या बघ्यांना प्रथमच बघायला मिळाल्या. मग झेलममाईने त्या फडतूस फ्यूजची फुरफुर बंद पाडली आणि तिच्या सर्व अपराधांसह तिला पोटात घेतले,

' ट्रॅाक् ! ' फास्टर फेणे उद्गारला आणि दगडधोंड्यां वर कोसळणार, तोच –

त्याच वेळी जवळ आलेल्या ओमप्रकाशनी त्याला पोटाशी धरले.

' माय ब्रेव्ह ब्रेव्ह, बॅाय ! ' ते उद्गारले.

□

# १२. शेवट गोड...क्रीम केक !

मालीच्या वडिलांनी हाऊस बोटीला कुलूप लावले आणि ते मामींना म्हणाले, 'चला. फोनबीन करण्याच्या भानगडीत न पडता आपण सरळ आदमपुऱ्यालाच जाऊ. या खेपेस शिकाऱ्यातून जाऊ या.

'चलावं.'

ती दोघे शिकाऱ्यात बसली त्या वेळी गारठा चांगलाच भासत होता. मामींनी आपली शाल अंगाभोवती लपेटून घेतली आणि मामांनी वुलन कोटाची कॉलर बंद करून पट्टीचे बटन लावले. ते म्हणाले, 'एव्हाना संपूर्ण पत्ता लागला असेल अशी आशा आहे.'

'लागायलाच हवा. काय तरी बाई ! या बन्याला स्वस्थ म्हणून बसवत नाही. जिथं तिथं नाक खुपसतो अन् बरोबर त्या पोरीला अडकवतो.'

मामा हसून म्हणाले, 'तो मुळीच तिला बोलवत नव्हता. बन्या नि अन्वर जात होते. ही चित्रं काढायला म्हणून गेली अन् आपण होऊन कडमडली ! माली कसली ? माल्या आहे तो ! टॉमबॉय !'

'पुरे, पुरे ! अन् मला तिची एकटीचीच काळजी वाटते अन् बन्याबद्दल काहीच वाटत नाही असं समजू नये, बरं का ?'

‘ मालीबद्दलच्या काळजीचा प्रश्नच उरलाय कुठे आता ? मामा म्हणाले. ‘ काळजी फक्त त्या दोघांची आहे. माली तर पोलिसांना मदत करतीय.’

‘ ते तर झालंच. ’ मामीचे मातृहृदय खूष झाले आणि जरा वरमलेही. मालीपेक्षा बन्याची काळजी केव्हाही जास्तच. कारण माली एक वेळ स्वतःच्या जिवाला जपेल अन् वेळ-प्रसंगी बन्याला पण. हा पोरटा म्हणजे बारा पिंपळावरचा मुंज्या ! त्याला कशाची कधी शुद्ध असते का ? नकोत त्या गोष्टी ओढवून घेतो अन् हापटच्या खातो. काय मेले बॉंब काय. पॅराशूट काय अन हेर काय ! .. सगळंच ! चोर नि हेर पकडणं ही पोरासोरांची का कामं असतात ? पोलिसांनीच करावीत ती.’

बन्या केव्हाच कड्यावरून हापटी खाऊन वचावला आहे हे सुदैवाने यांना अजून कळलेले नव्हते, नाहीतर मामींची शिकाऱ्यातच शिकार.झाली असती !

‘ पण आता पोलिसच करताहेत की सगळं. बन्याने त्यांना फक्त दिशा दाखवून दिली एवढंच. ’ मृदू नि मिस्किल हसत मामा म्हणाले.

मऊ मऊ शब्दात एखाद्याला चिमटे घ्यावेत तर ते मामांनीच. पोलिस त्यातून कसे निसटतील ? मामीना हे माहीत होते. त्यांच्याही मुखावर एक क्षीण स्मितरेखा उमटली, पण लगेच ती मावळली. कारण त्यांचे मन खरो-खरीच धास्तावले होते. मालीला आदमपुरा पोलिस स्टेशन-वर सोडून त्या पतिराजांबरोबर ‘ घरी ’ आल्या. दोघांनी जेवण वगैरे केले. पण मामींना क्षणभरही चैन पडत नव्हते.

त्यांचा जीव टांगल्यासारखा झाला होता. मामींनी एक डुलकी घेऊन बाहेर पडण्यासाठी मामींना हाक मारली तेव्हा सर्व तयारीनिशी शालबील गुंडाळून खुर्चीत त्या वाटच पाहात बसलेल्या त्यांना दिसल्या.

लवकरच शिकाऱ्याने त्यांना आदमपुऱ्याच्या किनाऱ्यावर पोचवले आणि दोघे उतरून पोलिस स्टेशनच्या वाटेला लागली.

आदमपुऱ्यात या वेळी बरीच गडबड उडालेली होती. पोलिस ठाण्याचे आवार पोलिसांच्या वर्दळीने गजबजून गेले होते. एक जाडा आणि एक उंचाडा असे पाकिस्तानी हेर पोलिसांच्या जाळ्यात सापडले आहेत आणि तिघा हुशार मुलांची बहादुरी या यशाच्या मुळाशी आहे हे वृत्त कसे कुणास ठाऊक, एव्हाना वाऱ्यासारखे श्रीनगरात पसरले होते. वाटेत ज्याच्या त्याच्या तोंडी तोच एक विषय होता.

‘ कहते है इन तीनों में एक लडकी भी है. ’

‘ और एक चेकशर्टवाला लडका उनका लीडर है. ’

‘ जी ? मेड इन महाराष्ट्र! फास्टर फेणे उसका नाम. ’

‘ फास्टर आँ ? क्या अजीब नाम है ! ’

‘ जी. लडका भी अजीब है, फास्ट फास्टर फास्टेस्ट ! मोटर के माफक चलते हैं उसके पैर, हाथ और मगज भी ! ’

‘ यह बात है ?’

संभाषणाचे हे तुकडे मामा मामींच्या कानांनी जाता जाता आत्मसात केले.

मामा उद्गारले—

' काहीतरी झालेलं दिसतंय. '

' म्हणजे ? '

' म्हणजे फायनल. आता हे विजेते वीर ठाण्यापर्यंत आले की नाही एवढंच पाहायचंय.'

' आणि आले असले तर कशा स्थितीत आलेत हेही पाहायचंय. '

तसे म्हटले तर बन्याला मनोमन मामींनी केव्हाच ठाण्याला पोचवले होचे म्हणा ! पण मगज शाबूत नसला तरी त्याचे शरीर तरी शाबूत आहे ना याची त्यांच्या मातुल हृदयाला आता चिंता लागलेली होती.

पोलिस स्टेशनच्या पायऱ्या चढून गेल्याबरोबर त्यांना एक विलक्षण दृश्य दिसले. खुद्द एका पोलिस कॉन्स्टेबलला हातकड्या घालून एक जमादार बाहेर आणीत होता. ते पाहून मामा–मामी इतकी चकित झाली, की आपल्या मुलांचाही क्षणभर विसर पडून त्या दृश्याकडेच त्यांचे डोळे लागले.तेवढ्यात त्यांच्याजवळ आलेल्या एका अस्वस्थ कारकुनाने अनाहूतपणें त्यांना हळूच बातमी दिली–' गद्दार ! कॉंस्टेबल याकूब पाकिस्तान को शामिल था. '

' लेकिन हातकडियाँ ?

' तो क्या हुवा ? इन लोगो को खाली हाथकडिया नहीं-इनकी नरडियाँ तोड डालनी चाहिये ! '

मामा पाहात राहिले. त्यांची मान आपसूक होकारार्थी झुकली. या देशद्रोह्यांचे गळे दाबून जरी नाही, तरी गोळ्या झाडून प्राण घ्यायला हवेत असे त्यांचेही मत होते. पण एका साध्या लेखणीबहाद्दर कारकुनाने तळतळून काढलेले

ते उद्गार त्यांना सूचक वाटले. जम्मू काश्मिरातल्या सर्व-सामान्य माणसांमध्येसुद्धा या घरभेद्यांविरुद्ध केवढा संताप उसळलेला आहे याची ती एक निशाणीच होती.

याकूवला पोलिसव्हॅनमध्ये चढवण्यात आले आणि व्हॅन स्टेशनचे आवार सोडून बाहेर पडली.


मामा-मामी उंबरठा ओलांडून ऑफिस रूममध्ये पाय ठेवीत होते त्याच वेळी डिटेक्टिव्ह मन्सूर आपली शेवटची नोंद करून कागद साहेबांपुढे सारीत होता, मन्सूरचे शब्द यांच्या कानांवर पडले–' एकंदर सोळा जणांना अटक केलेली आहे. पाक हेरांच्या एका फार मोठ्या कारस्थानाचं आपण उच्चाटन केलं आहे असं समजायला काही हरकत नाही. '

' या ' आपण ' शब्दाच्या मर्यादा फार व्यापक आहेत. 'मन्सूर,' इन्स्पेक्टर ओमप्रकाश चिरूट शिलगावीत म्हणाले, ' केवळ तू नि मी किंवा पोलिसखातं त्यात समाविष्ट नाही. त्या बालवीरांनाही जरूर ते श्रेय आपण दिलंच पाहिजे. ओः! आप आये ? पधारिये !' हे शेवटचे शब्द त्यांनी खुर्चीतून उठत उच्चारले होते, कारण फास्टर फेणेचे मामा–मामी तेवढ्यात आत प्रविष्ट झालेले त्यांना दिसलें होते.

' मैं कहता था–'

त्यांना मध्येच थोपवून मामा म्हणाले, ' मैंने सब सुना है. पहले हम बताए हमारे बहादूर बच्चें किधर हैं ?'

' आइये मेरे साथ ' असे हसत म्हणून मन्सूरने त्यांना आतल्या एका खोलीत नेले. तिथे एका प्रशस्त आरामखुर्चीत एक मानवी पार्सल पडलेले होते. बन्या ऊर्फ फास्टर फेणे ! अक्षरशः तो एक पार्सल दिसत होता. पोस्टांच्या तिकिटां-



प्रमाणे चिकटपटच्यांची अनेक लेवले त्याला आपादमास्तक शोभा आणीत होती. यापूर्वी केव्हाच तो धुतला पुसला गेला असूनही पोस्टाच्या काळचा शिक्क्यांप्रमाणे अजूनही काही ठिकाणी चिखलामातीचे डाग तो मिरवीत होता. म्हणजे हे पार्सल सरळ या मुक्कामावर आले नव्हते. अनेक ठिकाणाहून मार खाऊन री - री - री - री - डायरेक्ट होऊन आता ते योग्य ' मालका ' च्या हाती पडले होते म्हणा ! '

बन्याचा डावा हात तर चक्क फळी बांधून कापडपट्टीने गळ्यात अडकवलेला होता. सुदैवाने हाड मोडले नव्हते नुसतेच सरकले होते. बन्या ऊर्फ फास्टर फेणे या मंडळी-बरोबरच आता बाहेर पडला.

बन्याने प्रसंगाबरोबर वाहत जाऊन आज एवढे वीरकृत्य केले खरे, पण त्याचा परिणाम नंतर त्याच्या वाळकुड्या देहाला जाणवल्याशिवाय राहिला नाही. उंचाड्याच्या भीषण बाँबबाजीचे आकर्षक आतषबाजीत रूपांतर करून फास्टर फेणे वाळवंटातल्या दगडगोट्यांत कोसळण्यापूर्वीच त्याला इन्स्पेक्टर ओमप्रकाशनी सावरून धरले होते, म्हणून बरे झाले. पण त्यांच्या तोंडचे कौतुक ऐकायला मात्र तो शुद्धीवर राहिला नाही. ओमप्रकाशनी त्याला ताबडतोब उचलून जीपपर्यंत नेले. तिथे अन्वर नि माली यांनी त्याला आपल्या ताब्यात घेतले आणि प्रथमोपचार साहित्यानिशी त्याची सेवा केली. ओमप्रकाश यांच्या सूचनेनुसार जीप लगेच हॉस्पिटलकडे पुढील उपचारासाठी निघून गेली.

इन्स्पेक्टर ओमप्रकाश तातडीने डिटेक्टिव्ह मन्सूरकडे धावले. त्यांनी बांधकामाच्या जागेवर झडतीसत्र पुरे केले

असून गिरफदार केलेल्या लोकांना व्हॅनमध्ये चढवण्याचा सपाटा लावला होता. व्हॅनभोवती हत्यारबंद पोलिसांचे कडे होते.

इकडे फास्टर फेणे आणि मंडळी इस्पितळात पोचली. तिथे बन्यावर उपचार झाले. नर्स डॉक्टरांनी त्याचे अल्पावधीत जे रूपांतर केले त्यामुळे बन्या आता कसा दिसत होता ते आपण वर पाहिलेच आहे. बन्याने शुद्धीवर येताक्षणीच विवळत उद्गार काढले होते, ' कुठाय मी ? आयाई ! '

' बन्या, अरे तू इथे पोलिस स्टेशनवर आहेस. हा बघ अन्वर.' माली म्हणाली. ' अंग फार ठणकतंय का रे ? '

' काही नाही. तसं विवळण्याइतकं फार नाही.' बन्या पुन्हा विवळत म्हणाला. ' पण-पण अन्वर, तुझ्या कपाळाला काय झालं ? '

' अरे, कुछ नही यार ! मामुली गोली है वह. मला गोळ्या चाखायला आवडतात ना! आज गोळीने मला चाटलं.'

फास्टर फेणे खुशीत येऊन हसला. अशी उत्तरे त्याला एकदम आवडायची. अन्वरच्या अशा वागण्यामुळेच बन्याला तो सख्ख्या भावाइतका प्रिय झाला होता.

' आणि माले, तू कोंडवाड्यातून केव्हा बाहेर पडलीस ? कसं वाटलं तिथे ? '

' ते सगळं मग सांगू. अरे बन्या, आपण कोंडवाड्यात फार काळ राहणंच शक्य नाही. कोंडवाडा मेंढरांसाठी नि चोरांसाठी असतो – '

' आणि हेरांसाठी ! ' बन्या म्हणाला, ' ते कोंडले ना सगळे ? '

' वन अँड ऑल ! ' त्याच वेळी आत आलेले मन्सूर-चाचा हसत म्हणाले. ' फास्टर फ़ेणे, तू ठीक असशील तर व्हीलचेअरमधे घालून तुला थोडा वेळ चहापानासाठी आमच्या कचेरीत न्यावं म्हणतो. '

' चहा विथ क्रीम केक, मन्सूर चाचा ! '

' अफकोर्स ! ' मन्सूरचा म्हणाले. ' अरे, नुसती केकच नाही, भरपूर स्वीट्स् आणली आहेत शहा स्वीट मार्टमधून. सरकारी माल—अन् तुम्ही आहात सरकारी पाहुणे ! '

' अर्थात त्या सरकारी पाहुण्यांपेक्षा वेगळ ! ' माली म्हणाली.

बन्या एकाच अटीवर यायला तयार झाला— म्हणजे एका पायांवर. चाकांच्या खुर्चीची कल्पना त्याने ठ्करावून दिली. ताडदिशी उभा राहून तो म्हणाला, ' झालंय काय मला ? चला, मी चालत येतो. '

त्याचा बाहू पकडून माली अन्वरला एकीकडे म्हणाली, ' ही क्रीम केक बोलतेय. '

मामा—मामींना आता बन्याला पाहिले तेव्हा तो आराम-खुर्चीतच पहुडलेला असला तरी फार फार खुषीत होता. आणि याला कारण त्याने नकतीच रिचवलेली त्याची अव-डती क्रीमकेक !

मामींनी बन्याला पाहिले मात्र, ' बन्या ! ' असे म्हणून त्यांनी आरामखुर्चीच्या हातावर बैठक मारली आणि त्याच्या क्यावरून त्या निःशब्दपणे हात फिरवू लागल्या त्यांच्या ळ्यातून प्रेमाश्रू ओघळत होते. मामांच्या चेहऱ्यावर ीप्रमाणे प्रसन्नतेची स्मितरेषा झळकत होती.

‘ मामासाब, लीजिये अपना पार्सल ! ’ डिटेक्टिव्ह मन्सूर त्यांना म्हणाला, ‘ अगर ये बच्चे इस जंजाल में आज न कूदते तो मैं आज शायद जिंदा भी नहीं होता. फास्टर फेणे यह बाजी तुम्हारी है, और आज का दिन मेरे ख्याल में जिंदगी भर रहेगा.. तू काश्मीरचं खोरं दणाणून सोडलंस. आम्ही हा प्रसंगी कदापि विसणार नाही. ’

‘ आम्ही पण तुम्हांला विसरणार नाही, मन्सूरचाचा.’ फास्टर फेणे मोठाल्या जलभऱ्या डोळ्यांनी त्यांच्याकडे पाहात म्हणाला.

आणि त्याच्या खांद्यावर हात ठेवून मामांनी भाच्याला जग अनुमोदन दिले.

• • •

BVBK-0401596

BVBK-0401596